| a) | PSUs | 0 | 0 |
| b) | FIs | 0 | 0 |
| c) | Banks (co-op. bank shares) | 1362 | 1362 |
| d) | Private Corporates | 0 | 0 |
| e) | Subsidiaries / Joint Ventures | 5000 | 0 |
| f) | Others (mutual Fund) | 0 | 0 |
| g) | Provision held towards depreciation | (1261) | (1261) |
| | **Total** | **5101** | **101** |

**Assets quality**

| Ratio (in percent) | Current Year 2024 | Previous Year 2023 |
|---|---|---|
| Gross NPA to Gross Advances | 3.59 | 2.70 |
| Net NPA to NET Advances | 1.49 | 0.56 |
| Provision coverage ratio | 59.43 | 79.65 |

**a) Classification of advances and provision held** (Amount In Rs Thousand)

| | Standard | Non-Performing | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Total Standard Advances | Sub-Standard | Doubtful | Loss | Total Non-Performing Advances | Total |
| **Gross Standard Advances and NPAs** | | | | | | |
| Opening Balanace | 3165647 | 45701 | 42018 | 0 | 87719 | 3253366 |
| Add : Addition during the year | 881976 | 101657 | 44144 | 0 | 145801 | 1027777 |
| Less : Reductions during the year* | 682521 | 105390 | 2994 | 0 | 108384 | 790905 |
| Closing balance | **3365102** | **41968** | **83168** | | **125136** | **3490238** |
| *Reduction in Gross NPA due to : | | | | | | |
| Upgradation | | | | | | |
| Recoveries (excluding recoveries from upgraded accounts) | | | | | 0 | 0 |
| Write-offs | | | | | 0 | 0 |
| **Provisions(excluding Floating Provisions)** | | | | | | |
| Opening balance of provisions held | 13500 | 4570 | 22552 | 0 | 27122 | 40622 |
| Add : Fresh provisions made during the year | 0 | 0 | 17251 | 0 | 17251 | 17251 |
| Less : Excess provision reversed / Write-off loans | 0 | 357 | 0 | 0 | 357 | 357 |
| Additional Provision during the Year | | | | | | 30353 |
| Closing balance of provisions held | **13500** | **4213** | **39803** | **0** | **44016** | **87869** |
| **Net NPAs** | | | | | | |
| Opening Balance | | | | | 17850 | 17850 |
| Add : Fresh additions during the year | | | | | 32917 | 32917 |
| Less : Reductions during the year | | | | | 0 | 0 |
| Closing balance | | | | | **50767** | **50767** |
| **Floating Provisions** | | | | | | |
| Opening Balance | | | | | | |
| Add : Additional provisions made during the year | | | | | | |
| Less : Amount drawn down[15] during the year | | | | | | |
| Closing balance of floating provisions | | | | | | |

**b) Sector - Wise Advances and Gross NPAs** (Amount In Rs Thousand)

| Sr. No. | Sector | Outstanding Total Advances | Gross NPAs | Percentage of Gross NPAs to Total Advances in that Sector | Outstanding Total Advances | Gross NPAs | Percentage of Gross NPAs to Total Advances in that Sector |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 2024 | | | 2023 | | |
| i) | Priority Sector | | | | | | |
| a) | Agriculture & Allied Activities | 215369 | 33818 | 0.97 | 16124 | 179 | 0.01 |
| b) | Advances to Industries sector eligible as priority sector lending | 404132 | 219 | 0.01 | 339871 | 219 | 0.01 |
| c) | Services | 611557 | 17731 | 0.51 | 614030 | 1734 | 0.05 |
| d) | Personal Loan | 50689 | 14259 | 0.41 | 76559 | 23882 | 0.73 |
| | **Sub Total (i)** | **731432** | **66027** | **1.90** | **518949** | **0** | **0.00** |
| | | 2013179 | | | 1711533 | 26014 | 0.80 |
| ii) | Non-Priority Sector | | | | | | |
| a) | Agriculture & Allied Activities | | | | 0 | 0 | 0.00 |
| b) | Advances to Industries sector eligible as priority sector lending | | | | 0 | 0 | 0.00 |
| c) | Services | 1468188 | 55465 | 1.59 | 1515917 | 61705 | 1.90 |
| d) | Personal Loan | 8871 | 3644 | 0.10 | 10161 | 0 | 0.00 |
| | **Sub Total (ii)** | **1477059** | **59109** | **1.69** | **1541833** | **61705** | **1.90** |
| | **Total (i+ii)** | **3490238** | **125136** | **3.59** | **3253366** | **87719** | **2.70** |

3) **Exposures**

a) Exposure to real estate sector

(Amount In Rs Thousand)

| Category | Current Year 2024 | Previous Year 2023 |
|---|---|---|
| i) Direct exposure | | |
| a) Residential Mortgages – Lending fully secured by mortgages on residential property that is or will be occupied by the borrower or that is rented. Individual housing loans eligible for inclusion in priority sector advances shall be shown separately. Exposure would also include non-fund based (NFB) limits. | 144775 | 138303 |
| b) Commercial Real Estate- Lending secured by mortgages on commercial real estate (office buildings, retail space, multipurpose commercial premises, multifamily residential buildings , multi tenanted commercial premises, industrial or warehouse space , hotels , land acquisition, development and construction, etc.). Exposure would also include non-fund based (NFB) limits; | 248544 | 229855 |
| c) Investments in Mortgages-Backed Securities (MBS) and other securities exposures- I . Residential ii. Commercial Real Estate | - | - |
| ii) Indirect Exposure Fund based and non-fund-based exposures on National Housing Bank and Housing Finance Companies. | - | - |
| **Total Exposure to Real Estate Sector** | **393319** | **368158** |

b) Unsecured advances

(Amount In Rs Thousand)

| Particulars | Current Year 2024 | Previous Year 2023 |
|---|---|---|
| Total unsecured advances of the bank | 74218 | 100653 |
| Out of the above, amount of advances for which intangible securities such as charge over the rights, licenses, authority, etc. have been taken | 0 | 0 |
| Estimated value of such intangible securities | 0 | 0 |

4) **Concentration of deposits, advances, exposures and NPAs**

a) Concentration of Deposits

(Amount In Rs Thousand)

| Particulars | Current Year 2024 | Previous Year 2023 |
|---|---|---|
| Total deposits of the twenty largest depositors | 1417323 | 1216371 |
| Percentage of deposits of twenty largest depositors to total deposits of the bank | 25.66 | 24.08 |

b) Concentration of Advances

(Amount In Rs Thousand)

| Particulars | Current Year 2024 | Previous Year 2023 |
|---|---|---|
| Total advances to the twenty largest borrowers | 686549 | 671630 |
| Percentage of advances of twenty largest borrowers to total advances of the bank | 19.67% | 20.64% |

c) Concentration of exposures

(Amount In Rs Thousand)

| Particulars | Current Year 2024 | Previous Year 2023 |
|---|---|---|
| Total exposures to the twenty largest borrowers / customers | 750500 | 702000 |
| Percentage of exposures to the twenty largest borrowers/customers to total exposures of the bank on borrowers/customers | 21.50 % | 21.58 % |

d) Concentration of NPAs

(Amount In Rs Thousand)

| Particulars | Current Year 2024 | Previous Year 2023 |
|---|---|---|
| Total Exposures to the top twenty NPA accounts | 106755 | 74483 |
| Percentage of exposures to the twenty largest NPA exposures to the total Gross NPAs | 85.31 % | 84.91 % |

**5) Transfers to Depositer Education and Awareness Fund (DEA Fund)**

(Amount In Rs Thousand)

| Sr.No. | Particulars | Current Year 2024 | Previous Year 2023 |
|---|---|---|---|
| i) | Opening balance of amounts transferred to DEA Fund | 5832 | 4646 |
| ii) | Add : Amounts transferred to DEA Fund during the year | 1460 | 1219 |
| iii) | Less : Amounts reimbursed by DEA Fund towards claims | 82 | 33 |
| iv) | Closing balances of amounts transferred to DEA Fund | 7210 | 5832 |

**6) Other Discolsures**

a) Business ratio (Amount in Rs thousand)

| Particular | Current Year 2024 | Previous Year 2023 |
|---|---|---|
| i) Interest Income as a percentage to Working Funds | 8.30 | 7.68 |
| ii) Non-interest income as a percentage to Working Funds | 0.34 | 0.39 |
| iii) Cost of Deposits | 6.70 | 6.20 |
| iv) Net Interest Margin | 2.83 | 3.17 |
| v) Operating Profit as a percentage to Working Funds | 1.04 | 1.18 |
| vi) Return on Assets | 0.63 | 0.57 |
| vii) Business (deposits plus advances) per employee | 56342 | 51259 |
| viii) Profit per employee | 229 | 179 |

b) Provisions and contingencies (Amount in Rs thousand)

| Provision debited to Profit and Loss Account | Current Year 2024 | Previous Year 2023 |
|---|---|---|
| i) Provisions for NPI | 0 | 20518 |
| ii) Provision towards NPA | 4500 | 0 |
| iii) Provision made towards Income tax | 19410 | 14005 |
| iv) Other Provisions and Contingencies (with details) | - | - |
| a) Std. Assets Provision | 0 | 1500 |
| b) Defferd Tax | 1500 | 250 |
| c) Spl. Reserve Fund sec.36(1)(viii)of Income tax | 1500 | 600 |
| **TOTAL** | **26910** | **36873** |

c) Payment of DICGC Insurance Premium (Amount in Rs thousand)

| Particulars | Current Year 2024 | Previous Year 2023 |
|---|---|---|
| i) Payment of DICGC Insurance Premium | 6301 | 5394 |
| ii) Arrears in payment of DICGC premium | 0 | 0 |

d) Disclosure of facilities granted to directors and their relatives

(Amount in Rs. Thousands)

| Particulars | Director | Relatives | Total |
|---|---|---|---|
| Outstanding amount for the beginning of the financial year | 131 | 90446 | 90577 |
| Loan amount disbursed during the financial year | 100 | 209300 | 209300 |
| Interest charged during the financial year | 8 | 11887 | 11895 |
| Repayment made during the financial year | 45 | 37372 | 37317 |
| Outstanding amount at the end of the financial year | 194 | 274261 | 274455 |
| Overdue Amount | Nil | Nil | Nil |

As per our Report of even date
For L S N & Co.
Chartered Accountants, FRN 103925W

LSN & CO. FRN 103925W CHARTERED ACCOUNTANTS

**CA Santosh S. Samdadiya-Partner**
M. No : 122998, Co-op. Panel No. 10123
UDIN - 24122998BKDDTT5686

# उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक

## सन २०२४-२५

### खर्च

(रक्कम रुपये लाखात)

| खर्चाचा तपशील | २०२३-२४ चा अंदाज | २०२३-२४ चा प्रत्यक्ष खर्च | वाढ/घट | २०२४-२५ चा अंदाज |
|---|---|---|---|---|
| **ठेवींवर द्यावे लागणारे व्याज** | **३०६८.०७** | **३५३८.४८** | **४७०.४१** | **३६६४.७९** |
| **कर्जावर द्यावे लागणारे व्याज** | **५.००** | **०.००** | **-५.००** | **५.००** |
| **पगार व भत्ते** | **६०१.८०** | **५६५.६६** | **-३६.१४** | **६४१.१५** |
| **प्रशासकीय खर्च** | **५०६.४६** | **४५९.३२** | **-४७.१४** | **४९६.०७** |
| **घसारा** | **७५.१६** | **७१.७०** | **-३.४६** | **७४.५७** |
| **तरतुदी** | **२२५.००** | **७५.००** | **-१५०.००** | **१०५.००** |
| स्टॅण्डर्ड ॲसेट (उत्तम जिंदगी) | ५०.०० | ०.०० | -५०.०० | १५.०० |
| संशयित व बुडित कर्ज निधी | १००.०० | ४५.०० | -५५.०० | ४५.०० |
| गुंतवणूक घसारा निधी तरतूद | ४०.०० | ०.०० | -४०.०० | १५.०० |
| विशेष राखीव निधी | २५.०० | १५.०० | -१०.०० | २०.०० |
| डेफर्ड टॅक्स | १०.०० | १५.०० | ५.०० | १०.०० |
| **आयकर** | **१७५.००** | **१९४.१०** | **१९.१०** | **१७५.००** |
| **निव्वळ नफा** | **३३३.७१** | **३६६.३०** | **३२.५९** | **४०२.९३** |
| **एकूण खर्च** | **४९९०.२०** | **५२७०.५६** | **२८०.३६** | **५५६४.५१** |

### उत्पन्न

(रक्कम रुपये लाखात)

| उत्पन्नाचा तपशील | २०२३-२४ चा अंदाज | २०२३-२४ चा प्रत्यक्ष उत्पन्न | वाढ/घट | २०२४-२५ चा अंदाज |
|---|---|---|---|---|
| **कर्जावर मिळणारे व्याज** | **३३७४.९६** | **३६४९.१८** | **२७४.२२** | **३८०४.५१** |
| **गुंतवणुकीवर मिळणारे व्याज** | **६२.२४** | **१२०.९०** | **५८.६६** | **१२९.६३** |
| **सरकारी रोखेवर मिळणारे व्याज** | **१२८८.६९** | **१२९४.८७** | **६.१८** | **१४३१.५७** |
| **इतर उत्पन्न** | **२६४.३१** | **२०५.६१** | **-५८.७०** | **१९८.८०** |
| सर्व्हिस चार्जेस | २१५.३१ | १५६.५१ | -५८.८० | १६७.८० |
| कमिशन व एक्सचेंज | ९.०० | ९.२५ | ०.२५ | १०.०० |
| सरकारी रोखे विक्रीवरील नफा | ४०.०० | १६.४३ | -२३.५७ | २१.०० |
| गुंतवणूक घसारा निधी तरतुद | ०.०० | २३.४२ | २३.४२ | ०.०० |
| **एकूण उत्पन्न** | **४९९०.२०** | **५२७०.५६** | **२८०.३६** | **५५६४.५१** |

## Director and Staff Training
for the year of 2023-2024 Information

## संचालक व कर्मचारी प्रशिक्षण

| Sr. No. | Training Programme Subject | | Training Period | Training Member Name | Place | Training Organization/ Center |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Payment and Settlement System | Apr-23 | 20-04-2023 TO 21-04-2023 | ATUL PRABHAKAR GAIKWAD | ONLINE | Reserve Bank Of India (CAB) |
| 2 | IMPLEMENTATION OF RISK BASED INTERNAL AUDIT (RBIA) IN UCBs : ROLE OF THE BOARD & AUDIT COMMITTEE OF THE BOARD (ACB) | Apr-23 | 27-04-2023 | SARIKA SAMEER DESHPANDE, RAMESH BHIKA BAGUL, MILIND GAJANAN ADHE, KAILAS DADARAO AVHAD | ONLINE | Reserve Bank Of India (CAB) |
| 3 | TEAM BUILDING AND MENTORING PROG FOR CEO | May-23 | 29-05-2023 TO 31-05-2023 | RAMESH BHIKA BAGUL | ONLINE | Reserve Bank Of India (CAB) |
| 4 | CYBER SECURITY FOR OFFICERS & EMPLOYEES (NON - TECHNICAL) (AVTU) | May-23 | 31-05-2023 TO 01-06-2023 | JITENDRA BHIKAPPA NILKANTH, MANOJ DATTATRAY KULKARNI, AMIT DILIP AMBILWADE, SUNIL HIRAMAN LOHKARE, PRATHAMESH INDRAJEET KANSARA, PRAJAKTA VAIBHAV GHANEKAR | ONLINE | Reserve Bank Of India (CAB) |
| 5 | MAXIMISATION OF RETURNS ON SLR/NON SLR & OTHER INVESTMENT PRODUCTS & EFFICIENT MANAGEMENT INFORMATION SYSTEM FOR UCB | May-23 | 29-05-2023 | PRASAD VIJAY PATIL, RAMESH BHIKA BAGUL, JITENDRA BHIKAPPA NILKANTH, SUHAS BALKRUSHNA KOTHAWADE | ONLINE | NATIONAL FEDERATION OF URBAN COOPERATIVE BANKS & CREDIT SOCIETIES LTD. NEW DELHI (NAFCUB) |
| 6 | MANAGEMENT DEVELOPMENT PROGRAMME FOR BRANCH MANAGERS | Jun-23 | 19-06-2023 TO 21-06-2023 | SAMEERA PRITISH KULKARNI PRAJAKTA VAIBHAV GHANEKAR | PUNE | Reserve Bank Of India (CAB) |
| 7 | VALUE ADDED GOVERNANCE | Jul-23 | 08-07-2023 | SARIKA SAMEER DESHPANDE, RAMESH BHIKA BAGUL, MILIND GAJANAN ADHE, MAHENDRA GOVIND PAWAR, JITENDRA BHIKAPPA NILKANTH | ONLINE | MAHARASHTRA STATE COOPERATIVE BANKS ASSOCIATION, MUMBAI |
| 8 | INCIDENT RESPONSE AND CYBER SECURITY IN COLLABORATION WITH CERT-IN FOR IT & INFORMATION SECURITY OFFICIALS | Aug-23 | 21-08-2023 TO 23-08-2023 | JAYANT DINKAR GAWALI | ONLINE | Reserve Bank Of India (CAB) |
| 9 | COMPLIANCE MANAGEMENT OF UCBs | Sep-23 | 11-09-2023 TO 15-09-2023 | JITENDRA BHIKAPPA NILKANT, KALPESH WAMAN ACHAT | PUNE | Reserve Bank Of India (CAB) |
| 10 | NATIONAL CONFERENCE ON CYBER SECURITY | Oct-23 | 02-10-2023 | JAYANT DINKAR GAWALI, UMESH SANJAY AHIRE | PUNE | SAHKAR BAHARTI, PUNE |
| 11 | STRATEGIC PRACTICAL NPA RECOVERY WORKSHOP (SARFAESI, DRT & OTHER RELATED MATTERS) | Oct-23 | 27-10-2023 | MAHENDRA GOVIND PAWAR, MAHENDRA BHIKCHAND KEDARE | NASHIK | THE NASHIK DISTRICT URBAN COOPERATIVE BANKS ASSOCIATION, NASHIK |
| 12 | INVESTMENT AND TREASURY MANAGEMENT | Nov-23 | 18-11-2023 | JITENDRA BHIKAPPA NILKANTH | WADALA, MUMBAI | THE MAHARASHTRA URBAN COOPERATIVE BANKS' FEDERATION LTD |
| 13 | EARLY WARNING SIGNAL (EWS)TOOL FOR CREDIT MONITORING | Nov-23 | 25-11-2023 | SARIKA SAMEER DESHPANDE, MAHENDRA GOVIND PAWAR, GANESH SHASHIKANT SOMWANSHI KAILAS DADARAO AVHAD, ALL LOAN DEPT STAFF | ONLINE | THE MAHARASHTRA COOPERATIVE BANKS ASSOCIATION LTD., MUMBAI |

| Sr. No. | Training Programme Subject | | Training Period | Training Member Name | Place | Training Organization/ Center |
|---|---|---|---|---|---|---|
| 14 | KNOW YOUR CUSTOMER (KYC) & ANTI MONEY LAUNDERING (AML) | Dec-23 | 09-12-2023 | SARIKA SAMEER DESHPANDE, MILIND GAJANAN ADHE | ONLINE | THE MAHARASHTRA STATE COOPERATIVE BANKS' |
| 15 | ENHANCING CORPORATE GOVERNANCE IN UCBs, ROLE OF BOARD OF DIRECTORS & BOARD OF MANAGEMENT. SIGNIFICAT DEFICIENCIES IN INSPECTION REPORT ATTRACTING PENALTIES. | Dec-23 | 21-12-2023 | SARIKA SAMEER DESHPANDE, RAMESH BHIKA BAGUL | NASHIK | RESERVE BANK OF INDIA (DOS, NAGPUR) |
| 16 | PRIORITY SECTOR LENDING & MISCLASSIFICATIN OBSERVED DURING INSPECTIONS. EXPECTATIONS FORM SA & RECENT RBI CIRCULARS AND ITS IMPACT ON UCB SECTOR | Dec-23 | 21-12-2023 | BANK STATUTARY AUDITORS - LSN Co.<br>CHARTERED ACCOUNTANTS<br>CA SANTOSH SURESH SAMDADIYA<br>CA NIKHIL NENSUKH SABADRA | NASHIK | RESERVE BANK OF INDIA (DOS, NAGPUR) |
| 17 | COMMONLY OBSERVED NON COMPLIANCE OF RBI GUIDELINES / NORMS BY UCBS | Dec-23 | 22-12-2023 | SACHIN OMKAR MAKODE, MANOJ DATTATRAY KULKARNI | NASHIK | RESERVE BANK OF INDIA (DOS, NAGPUR) |
| 18 | CYBER SECURITY - MAJOR OBERSVATIONS DURING INSPECTION | Dec-23 | 22-12-2023 | VIKAS LAXMAN NAIK<br>JAYANT DINKAR GAWALI | NASHIK | RESERVE BANK OF INDIA (DOS, NAGPUR) |
| 19 | IRAC NORMS, PROVISIONING & RESTRUCTURING OF ADVANCES | Dec-23 | 22-12-2023 | MAHENDRA GOVIND PAWAR, GANESH SHASHIKANT SOMWANSHI | NASHIK | RESERVE BANK OF INDIA (DOS, NAGPUR) |
| 20 | PRIORITY SECTOR REPORTING | Dec-23 | 22-12-2023 | GANESH SHASHIKANT SOMWANSHI | NASHIK | RESERVE BANK OF INDIA (DOS, NAGPUR) |
| 21 | SFT FILING AND E-VERIFICATION SCHEME 2021-REG | Dec-23 | 07-12-2023 | MILIND GAJANAN ADHE<br>SUHAS BALKRUSHNA KOTHAWADE<br>MANOJ DATTATRAY KULKARNI | NASHIK | INCOME TAX OFFICER (INTELLEGENCE & CRIMINAL INVESTIGATION), NASHIK |
| 22 | NPCI PRODUCT TRANING TO COOPERATIVE BANKS & RRBs | Feb-24 | 08-02-2023 | BHUSHAN SUNIL BHOSALE<br>JAYANT DINKAR GAWALI | JALGAON | NPCI |
| 23 | INVESTMENT IN COOPERATIVE BANKING | Feb-24 | 10-02-2024 | SARIKA SAMEER DESHPANDE<br>RAMESH BHIKA BAGUL<br>JITENDRA BHIKAPPA NILKANTH<br>SUHAS BALKRUSHNA KOTHAWADE | ONLINE | THE MAHARASHTRA STATE COOPERATIVE BANKS' ASSOCIATION, MUMBAI |
| 24 | WEBINAR ON CYBER SECURITY FOR OFFICERS AND EMPLOYEES (NON-TECHNICAL) OF UCBs UNDER MISSION AVTU | Feb-24 | 13-02-2024 | JUNIOR EXECUTIVE TO ASST. EXECUTIVE (TOTAL 40 STAFF) | ONLINE | Reserve Bank Of India (CAB) |
| 25 | WEBINAR ON CYBER SECURITY FOR OFFICERS AND EMPLOYEES (NON-TECHNICAL) OF UCBs UNDER MISSION AVTU | Feb-24 | 08-02-2024 | ALL BRANCH MANAGERS | ONLINE | Reserve Bank Of India (CAB) |
| 26 | IT VENDOR RISK MANAGEMENT OF IT OFFICERS | Feb-24 | 20-02-2024 TO 22-02-2024 | JAYAND DINKAR GAWALI | ONLINE | Reserve Bank Of India (CAB) |
| 27 | DATA SECURITY & DATA CENTER MANAGEMENT. FINANACIAL YEAR CLOSING AS PER RBI INSPCTION | Feb-24 | 27-02-2024 | SARIKA SAMEER DESHPANDE<br>JAYANT DINKAR GAWALI | NASHIK | THE NASHIK DISTRICT URBAN COOPERATIVE BANKS ASSOCIATION, NASHIK |
| 28 | ENSURING EFFECTIVE COMPLIANCE WITH EXPOSURE NORMS BY UCBS | Feb-24 | 26-02-2024 | CHANDAKANT SANKLECHA - DIRECTOR<br>PRASHANT PATIL - MEMBER (BOM)<br>VIJAY LAGAD - MEMBER (BOM) | ONLINE | Reserve Bank Of India (CAB) |
| 29 | BANKING FINANCIAL MANAGEMENT | Mar-24 | 11-03-2024 TO 13-03-2024 | ASHOK SHANKAR THAKUR<br>GANESH SHASHIKANT SOMWANSHI | PUNE | Reserve Bank Of India (CAB) |

# पोटनियम दुरुस्ती

| सध्याचा पोटनियम क्रमांक | पोटनियमाची विद्यमान वाक्यरचना | दुरुस्तीनंतरचा पोटनियम क्रमांक | पोटनियम दुरुस्तीनंतर वाक्यरचना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|---|
| ०७ | **कर्जे उभारण्याची मर्यादा :** कोणत्याही आर्थिक वर्षामध्ये बँकेची बाहेरील कर्ज उभारण्याची मर्यादा कायदा, नियम यानुसार नियंत्रित राहील व निबंधक यांचे परवानगीनुसार राहील.<br>बँकेस बाहेरून कर्ज उभारण्याची मर्यादा २५ पट पर्यंत वाढविण्याची परवानगी देण्यात येत आहे. | ०७ | **कर्जे उभारण्याची मर्यादा :** बँकेची बाहेरील कर्ज उभारण्याची मर्यादा कायदा, नियम यानुसार नियंत्रित व निबंधक यांचे परवानगीनुसार राहील.<br>बँकेस बाहेरून कर्ज उभारण्याची मर्यादा भागभांडवल, राखीव निधी, विशेष राखीव निधी व इमारत निधी या एकत्रित रकमेच्या १०० पट कायमस्वरूपी वाढविण्यात येत आहे. | बँकेच्या व्यवसायात वाढ होत असल्याने |





## मा.विश्वास ठाकूर यांना टाईम्स एक्झेम्पलरी लीडरशिप ॲवॉर्ड

विश्वास बँकेच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल बँकेचे संस्थापक अध्यक्ष मा.श्री. विश्वास ठाकूर यांना टाईम्स एक्झेम्पलरी लीडरशिप ॲवॉर्डने छत्रपती संभाजीनगर येथे नुकत्याच झालेल्या विशेष कार्यक्रमात गौरवण्यात आले. मा.श्री. ठाकूर यांच्यावतीने मा.श्री. नीलेश राऊत, सभासद यांनी प्रसिद्ध अभिनेते व दिग्दर्शक कबीर बेदी यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार स्वीकारला.

# विश्वास को-ऑप. बँकेच्या १२ व्या सातपूर शाखेचा शुभारंभ

**सोमवार, ०१ जानेवारी २०२४**

सर्वसामान्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी तळागाळातील जनतेपर्यंत विश्वास को-ऑप. बँकेने नाळ जोडली असून त्यांना सहकार बँकिंगच्या प्रवाहात आणण्यासाठी नवनवीन ग्राहक योजनांच्या माध्यमातून त्यांचे आर्थिक सबलीकरण करण्यासाठी कटीबद्ध आहोत. असे प्रतिपादन बँकेचे संस्थापक अध्यक्ष मा. विश्वास ठाकूर यांनी केले.

बँकेच्या सातपूर येथील १२ व्या शाखेचा शुभारंभ मा.विश्वास ठाकूर यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. याप्रसंगी ते बोलत होते. बँकेने कायमच आधुनिक व्यवस्थापन प्रणालीचा स्वीकार केल्यामुळे बँकेची विकासात्मक प्रगती होत आहे. त्यासाठी सर्व सभासद, हितचिंतकांचा प्रतिसाद बँकेसाठी मोलाचा आहे. याप्रसंगी बँकेचे उपाध्यक्ष अजित मोडक, मानद कार्यकारी संचालक मंगेश पंचाक्षरी, जनसंपर्क संचालक घनःशाम येवला, संचालक विलास हावरे, डॉ. वासुदेव भेंडे, डॉ.चंद्रकांत संकलेचा, वैशाली होळकर, डॉ.सुभाष पवार, शशिकांत पारख, विक्रम उगले, मंगला कमोद, कैलास पाटील, व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. प्रशांतकुमार पाटील, विजय लगड, ॲड. दत्तप्रसाद निकम, प्रभारी मुख्य कार्यकारी सौ. सारिका देशपांडे व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश बागुल आदी उपस्थित होते.




## विश्वास को-ऑप. बँकेला बँकिंग फ्रंटीअर्सचे दोन पुरस्कार

बँकिंग फ्रंटीअर्स, मुंबईतर्फे बँकिंग क्षेत्रात नेत्रदीपक प्रगती करणाऱ्या बँकांसाठी देण्यात येणारे दोन पुरस्कार विश्वास को-ऑप. बँकेला प्राप्त झालेले आहेत. त्यात बेस्ट एन.पी.ए. मॅनेजमेंट व बेस्ट ऑडिट इनिशिएटीव्ह या दोन विभागात हे पुरस्कार देण्यात आले. बँकेने आधुनिक व्यवस्थापन प्रणाली व उत्कृष्ट ग्राहकसेवा देऊन व्यवसायात वाढ केली आहे. त्यामुळे आर्थिक विकासात घोडदौड सुरू ठेवलेली आहे.

कॉर्पोरेट व्हिजन आणि प्रभावी वापर विश्वास बँकेने केला आहे. त्यामुळेच गुणवत्तापूर्ण बँकिंग करत आहे. सर्व सामान्य लोकांपर्यंत बँकिंग सेवा पुरविण्याचे महत्त्वाचे काम विश्वास बँक सातत्याने करत आहे. सहकार आणि सामाजिक जाणीव यांची सांगड घालून बँकेची वाटचाल यशोशिखराकडे होत आहे.

# विश्वास बँक उत्तम ग्राहक सेवेबरोबरच समाजाशी नाळ जोडून विश्वास बँकेच्या म्हसरूळ शाखेचा लोकार्पण सोहळा संपन्न - डॉ. विजय सूर्यवंशी (भा.प्र.से.)

**मंगळवार, ०२ जानेवारी २०२४**

''विश्वास को-ऑप. बँकेची प्रगती देदीप्यमान होत असून महाराष्ट्राच्या सहकार क्षेत्रात व्यवस्थापन, आर्थिक पारदर्शकता, शिस्त, आधुनिकतेचा स्वीकार यामुळे बँकेने जनमानसांत आदर्श नागरी सहकारी बँक म्हणून नावलौकिक संपादन केला आहे. बँकेचे संस्थापक अध्यक्ष विश्वास ठाकूर यांची अभ्यासू व दूरदृष्टी व संचालक मंडळाचे योगदान यांचा बँकेच्या विकासात मोलाचा वाटा आहे'', असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले.

विश्वास को-ऑप. बँकेच्या म्हसरूळ शाखेच्या नूतनीकरण लोकार्पण सोहळा संपन्न झाला त्याप्रसंगी डॉ. विजय सूर्यवंशी बोलत होते. डॉ. सूर्यवंशी पुढे म्हणाले की, ''विश्वास बँक उत्तम ग्राहक सेवेबरोबरच विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजाशी नाळ जोडून आहे तसेच सर्वसामान्यांच्या आर्थिक सबलीकरणाचा विचार ही खऱ्या अर्थाने पुढे नेत आहे. संस्थेचा उत्कर्ष हा एकप्रकारे समाजाचा उत्कर्ष असतो. त्यामुळेच सर्व थरातील जनतेपर्यंत परिणामकारक बँकिंग पोहोचवण्याचा विश्वास बँकेचा प्रयत्न आहे. सर्वांच्या सर्वोत्तम सकारात्मक प्रयत्नांतून बँकेची यशोशिखराकडे वाटचाल सुरु आहे.''

माईंडफूल हार्ट कन्सल्टन्सीच्या संचालिका डॉ. आरती विजय सूर्यवंशी म्हणाल्या की, ''विश्वास बँकेच्या प्रगतीशील, विकास, विस्तार व वाटचालीची मी एक साक्षीदार आहे. बँकेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्या कौशल्यविकासासाठी माईंडफूल हार्ट कन्सल्टन्सीने प्रशिक्षण कार्यशाळा घेतल्या आहेत. प्रशिक्षणातून ध्येयपूर्ण विकासाचे वर्तुळ पूर्ण होते हे विश्वास बँकेने प्रत्यक्षात आणले आहे, हे निश्चितच कौतुकास्पद आहे.''

बँकेचे संस्थापक अध्यक्ष विश्वास ठाकूर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी ते म्हणाले की, ''संचालक मंडळ, कर्मचारी, सभासद, ठेवीदार यांच्या बळावर बँकेची आर्थिक विकासाकडे वाटचाल सुरू आहे. नवनवीन ग्राहकाभिमुख योजना, दर्जेदार आधुनिक सेवा, विश्वासार्हता व संचालक मंडळ हे बँकेच्या प्रगतीचे महत्त्वाचे घटक आहेत. सर्वसामान्य माणूस हा बँकेचा केंद्रबिंदू असून सर्वसामान्यांपर्यंत बँकिंग सेवा पोहचावी हे बँकेचे मुख्य उद्दिष्ट आहे. लोकाभिमुख बँकिंग सेवेचा कृतीशील विचार आपल्या बँकेने रुजवला आहे. सर्वसामान्यांच्या हितासाठी व सेवाभावी वृत्तीने आम्ही काम करत आहोत.''

याप्रसंगी बँकेचे उपाध्यक्ष अजित मोडक, मानद कार्यकारी संचालक मंगेश पंचाक्षरी, संचालक विलास हावरे, डॉ. सुभाष पवार, डॉ. वासुदेव भेंडे, डॉ. चंद्रकांत संकलेचा, विक्रम उगले, कैलास पाटील, व्यवस्थापकीय मंडळ सदस्य विजय लगड, ॲड. अजय (दत्तप्रसाद) निकम, डॉ. प्रशांत पाटील, सौ.ज्योती ठाकूर, ऋचिता ठाकूर, सौ. अनघा मोडक, सौ. माधुरी हावरे, डॉ.सौ. शितल पवार, सौ.लता भेंडे, सौ. मधुरा पंचाक्षरी, सौ. निलम पाटील, सौ.मिना परूळकर-निकम, सह मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. सारिका देशपांडे, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश बागुल, वरिष्ठ व्यवस्थापक कैलास आव्हाड आदी मान्यवर उपस्थित होते.



# विश्वास को-ऑप. बँकेच्या १३ व्या नाशिकरोड शाखेचा शुभारंभ

**बुधवार, ०१ मे २०२४**

विश्वास को-ऑप. बँकेची प्रगतीशील वाटचाल सभासद व ग्राहकांच्या बळावर सुरू असून कॉर्पोरेट बँकिंगच्या युगात आधुनिक सेवा-सुविधा देण्यासाठी विश्वास बँक कटिबद्ध आहे. बँकेने ९०० कोटींचा मिश्र व्यवसायाचा टप्पा पूर्ण केला असून १००० कोटींचा व्यवसाय नजिकच्या काळात निश्चितच पार करेल असा आम्हाला विश्वास आहे, असे प्रतिपादन विश्वास को-ऑप. बँकेचे संस्थापक अध्यक्ष विश्वास जयदेव ठाकूर यांनी केले.

विश्वास को-ऑप. बँकेच्या १३ व्या नाशिकरोड शाखेचा शुभारंभ बुधवार १ मे २०२४ रोजी करण्यात आला त्याप्रसंगी ते बोलत होते. शॉप नं. ११ व १२ हनुमंता नगर, लोखंडे मळा, जेलरोड, नाशिकरोड येथे ही शाखा सुरू करण्यात आली आहे.

विश्वास ठाकूर यांनी बँकेच्या २८ वर्षांच्या वाटचालीचा व प्रगतीशीलतेचा आढावा घेतला ते पुढे म्हणाले की, सभासद व ग्राहकांच्या सहकार्याने सहकाराची मूलतत्त्वे पाळून विश्वास को-ऑप. बँकेची वाटचाल यशोशिखराकडे होत आहे. सहकार आणि सामाजिक जाणीव ह्या दोन गोष्टी बँक जाणीवपूर्वक जोपासत आहे. स्वच्छ व पारदर्शी कारभारामुळेच बँक सर्वांच्या विश्वासाला पात्र ठरली आहे. तत्पर आणि विनम्र ग्राहकसेवेचे व्रत विश्वास को-ऑप. बँकेने कायम जोपासले आहे. त्यामुळे ग्राहकांना जोडणे हा एकप्रकारे बँकेचा सामाजिक बांधिलकीचाच भाग आहे. कॉर्पोरेट व्हिजन आणि मिशनचा नागरी सहकारी बँकांनी स्वीकार करणे ही काळाची गरज आहे आणि ते विश्वास बँकेने स्वीकारले आहे, म्हणूनच गुणवत्तापूर्ण बँकिंगचा आदर्श विश्वास बँकेने टिकवून ठेवला आहे. अत्याधुनिक सेवा व पारदर्शक व्यवस्थापन बँकेच्या आधुनिक वाटचालीचे वैशिष्ट्य आहे.

संस्थेचा उत्कर्ष हा एकप्रकारे समाजाचा उत्कर्ष असतो. त्यामुळेच सर्व थरातील जनतेपर्यंत परिणामकारक बँकिंग पोहोचवण्याचा बँकेचा प्रयत्न आहे. सर्वांच्या सर्वोत्तम सकारात्मक प्रयत्नांतून बँकेची यशोशिखराकडे वाटचाल सुरु आहे. सर्वसामान्यांच्या हितासाठी व सेवाभावी वृत्तीने विश्वास बँक काम करत आहे, असेही विश्वास ठाकूर म्हणाले.

नाशिकरोड शाखेच्या शुभारंभाप्रसंगी उपाध्यक्ष अजित मोडक, मानद कार्यकारी संचालक मंगेश पंचाक्षरी, संचालक विलास हावरे, सौ. मंगला कमोद, व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. प्रशांतकुमार पाटील, ॲड. दत्तप्रसाद निकम, माजी संचालक डॉ. कैलास कमोद, सौ. ज्योती विश्वास ठाकूर, सौ. अनघा अजित मोडक, सौ. मधुरा मंगेश पंचाक्षरी, सौ. माधुरी विलास हावरे, माजी मुख्य कार्यकारी अधिकारी प्रसाद पाटील, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. सारिका देशपांडे व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश बागुल, शाखाधिकारी स्मिता पवार, सुरेश वाघ, किशोर त्रिभुवन, कैलास आव्हाड, मिलिंद आढे, ऋचिता ठाकूर, प्रशांत पवार, राजेंद्र जाधव, ईश्वर जगताप, सुनिल ढगे, शेखर गायकवाड, सतीश लोखंडे, प्रतिक्षा देवरे आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# विश्वास को-ऑप. बँकेला पद्मभूषण कै. वसंतदादा पाटील उत्कृष्ट नागरी सहकारी बँक पुरस्कार

### शनिवार, ०९ सप्टेंबर २०२३

दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबई तर्फे दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठेच्या रौप्य महोत्सवी पुरस्कारात विश्वास को-ऑप. बँकेला २५० ते ५०० कोटींच्या ठेवींच्या गटात पद्मभूषण कै. वसंतदादा पाटील उत्कृष्ट नागरी सहकारी बँक पुरस्कार प्रदान करण्यात आला. माजी केंद्रीय मंत्री व राष्ट्रीय सहकार धोरण समितीचे अध्यक्ष मा. सुरेश प्रभु यांच्या हस्ते हा पुरस्कार नाशिक येथे देण्यात आला. याप्रसंगी दि महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबईचे उपाध्यक्ष मा. वसंतराव घुईखेडकर, सहकार भारतीचे अध्यक्षा डॉ.शशिताई अहिरे, विश्वास को-ऑप. बँकेचे संस्थापक अध्यक्ष विश्वास जयदेव ठाकूर व उपाध्यक्ष अजित मोडक, मानद कार्यकारी संचालक मंगेश पंचाक्षरी, जनसंपर्क संचालक घन:श्याम येवला, संचालक विलास हावरे, डॉ. सुभाष पवार, डॉ. वासुदेव भेंडे, कैलास पाटील, विक्रम उगले, व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. प्रशांत पाटील ॲड. दत्तप्रसाद निकम, विजय लगड, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रसाद पाटील आदी उपस्थित होते.




## अतुल शिरीष खैरनार यांना कै. बापूरावजी देशमुख उत्कृष्ट नागरी सहकारी बँक कर्मचारी पुरस्कार प्रदान

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबईतर्फे दरवर्षी दिले जाणारे प्रतिष्ठेचे २०२२-२०२३ चे 'कै.बापूरावजी देशमुख उत्कृष्ट सहकारी बँक कर्मचारी' पुरस्कार नुकतेच प्रदान करण्यात आले असून, विश्वास को-ऑप. बँकेचे वरिष्ठ अधिकारी अतुल शिरीष खैरनार यांना नुकताच नाशिक येथील गुरूदक्षिणा हॉल, कॉलेजरोड, नाशिक येथे शानदार समारंभात प्रदान करण्यात आला.



पुरस्कार वितरण माजी केंद्रीय रेल्वे मंत्री सुरेश प्रभु यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. याप्रसंगी असोसिएशनचे अध्यक्ष विश्वास ठाकूर, उपाध्यक्ष वसंतराव घुईखेडकर, महाराष्ट्र अर्बन को-ऑप. फेडरेशन लि.मुंबईचे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा, सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशच्या अध्यक्षा डॉ. शशिताई अहिरे आदी मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबईतर्फे महाराष्ट्र राज्यातील सहकारी बँकांमध्ये कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना दरवर्षी विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात येते. सहकारी बँकांतील व्यवस्थापन प्रणालीमध्ये गुणवत्तापूर्ण व विकासात्मक वाटचालीत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना हा पुरस्कार देण्यात येतो.

# डॉ. सुभाष पवार यांची गिर्यारोहणातील उल्लेखनीय कामगिरी

डॉ. सुभाष पवार (वय ६८) ह्यांनी २०२३ मध्ये वयाच्या ६७ व्या वर्षी आयर्न मॅन व अल्ट्रामॅन ह्या स्पर्धा जिकल्यानंतर गिर्यारोहण ह्या क्षेत्रात सहभागी झाले व सह्याद्री भ्रमंती केल्यानंतर २४ सप्टेंबर २०२३ रोजी एव्हरेस्ट बेस कॅम्पपर्यंतचे शिखर यशस्वीरीत्या पार पाडण्याची अवघड कामगिरी केली आहे.

डॉ. पवार यांनी नेपाळमधील सर्वोच्च एव्हरेस्ट शिखराच्या (८,८५० मीटर/२९,०३२ फुट) एव्हरेस्ट बेस कॅम्प (५,३६४मीटर/१७,५९८फुट) वर यशस्वी चढाई केली. दि. १७ ते २७ सप्टेंबर २०२३ या कालावधीत त्यांनी हा टप्पा गाठला.

नेपाळची राजधानी काठमांडू येथून, समूहाने खाजगी विमानाने लुक्ला येथे हिमालयातील एक लहान विमानतळावर गेले, जे जगातील सर्वात उंच विमानतळ आहे जिथून अधिकृत ट्रेक साहस सुरू झाले. एकूण १५१कि.मी./९० मैलांच्या थरारक अनुभवात, त्यांनी अनेक आव्हानांवर मात केली जसे की चक्कर येणे, उष्णता, वारा, मुसळधार पाऊस, विरळ ऑक्सिजन यांसारख्या अनेक आव्हानांवर तोंड देत ते पर्वत चढत राहिले. २४ सप्टेंबर रोजी तो शेवटी बर्फाच्छादित एव्हरेस्ट बेस कॅम्प वर पोहोचले.

हे पुरेसे नाही म्हणून की, परतीच्या प्रवासात, २५ सप्टेंबर रोजी, डॉ. पवार आणि इतर गिर्यारोहकांनी एव्हरेस्ट बेस कॅम्प पेक्षा उंच असलेल्या काला पत्थर (५६४४.५० मीटर/१८,५१९ फूट) शिखरावर जाण्याचा निश्चय करून स्वतःची चाचणी घेण्याचे ठरवले. प्रबळ इच्छाशक्ती आणि दृढनिश्चयाने त्यांनी पहाटे ३ वाजता हेडलाइटसह अंधारात सुरुवात केली व 'काला पत्थर' हा पर्वत सर केला. एव्हरेस्ट पर्वतावर सकाळी सूर्याचे पडणारे किरणे ही समोरच दिसत असल्याने जीवनातील सर्वात सुंदर दृश्यांपैकी एका दृष्याचे ते साक्षीदार बनले व परतीच्या प्रवासात एकाच दिवसात २६ कि.मी ट्रेक करून ग्रुप मध्ये सामील झाले. ग्रुपमधील १३ गिर्यारोहकांपैकी त्यांच्यासह फक्त १ जण 'काला पत्थर' सर करू शकला.

शेवटी, ते थेट ३ दिवस चढ-उतारावरून खाली उतरून लुक्ला (नेपाळ) ह्या छोट्या विमानतळावर पोहोचले. डॉ. पवार हे सर्वात धाडसी गिर्यारोहकांपैकी एक गिर्यारोहक बनले व पृथ्वीवरील स्वर्गीय दृश्याचा 'ह्याची देही ह्याची डोळा आनंद' घेतला.

**६८ वर्षीय डॉ सुभाष पवार यांची मेरा पर्वत शिखरावर यशस्वी चढाई**

नेपाळमधील हिमालय पर्वत रांगेत एव्हरेस्ट पर्वताच्या जवळ असलेले (६४७६ मीटर/२१२४६ फूट) उंचीवर असलेले मेरा पर्वतचे शिखर दि. १८.४. २०२४ रोजी सकाळी ८:३० वाजता डॉ. सुभाष पवार ह्यांनी सर केले. त्यामुळे ते भारतातील हे शिखर सर करणारे एकमेव सर्वात वयोवृद्ध गिर्यारोहक ठरले आहेत. दि. ११ एप्रिल रोजी चढाईला सुरूवात केली. (-१०) इतक्या कमी तापमानांत, ऑक्सिजन ची कमतरता व वेगाचे वाहणारे वारे, हिमवृष्टी व क्षणांत बदलणारे हवामान ह्याचा सामना करीत गाईड २ शेर्पांसह एकट्यानेच हे यश संपादन केले. मागील वर्षी त्यानी एव्हरेस्ट बेस कॅम्प (५३६४ मीटर) सर केले होते. आता त्यापेक्षा ११०० मीटर जास्त उंच असलेले ६४७५ मीटर उंचीचे शिखर सर केले. पुण्याचे गिरिप्रेमी एडवेंचर फाउंडेशन व नेपाळचे पिक प्रमोशन ह्या संस्थांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. त्यानंतर ते पोखरा येथील दि. २८ एप्रिल ते १३ मे हया कालावधीत 'अन्नपूर्णा सर्किट ट्रेक' पूर्ण केले. हा ट्रेक १४० कि. मी. लांबीचा असून ५४१९ मीटर उंच असून अवघड श्रेणीत समाविष्ट आहे. तो जगातील सर्वात लांब व उच्च श्रेणीचा व अवघड ट्रेक समजला जातो. त्यामध्ये 'टिलीचो लेक' व 'थोरांग ला' हे दोन्ही जवळपास १००० मीटर चढ चढून सर केले. मेरा पिक व 'अन्नपूर्णा सर्किट ट्रेक' मिळून एकून ३४ दिवस सलग गिर्यारोहण केले. बर्फाचा रस्ता (-१०) पेक्षा कमी तापमान, जोराचा वारा व विरळ ऑक्सिजन ह्या संकटाना तोंड देत प्रतिकुल परिस्थितीत ही पण चढाई केली. सुभाष पवार ह्यांचे वय ६८ वर्षे असून त्यानी मागील दोन वर्षात आयर्नमॅन व अल्ट्रामॅन ह्या स्पर्धा जिंकल्या असून एव्हरेस्ट शिखर सर करण्याचे त्यांचे स्वप्न आहे.



# बनावट लोन ॲपमुळे समस्या वाढू शकतात

लोकांना आर्थिक मदत करण्यासाठी मोबाइल लोन ॲप्स आहेत, जे अगदी सहज लोन देतात. बँका उघडण्याचे तास निश्चित असतात आणि प्रक्रियेला वेळ लागतो. परंतु आणीबाणीच्या परिस्थितीत हे ॲप्स कधीही, अगदी लहान रकमेचेदेखील कर्ज प्रदान करतात आणि अर्जाची प्रक्रिया सामान्यतः पारंपरिक बँकेपेक्षा खूप वेगवान असते. या सर्व सुविधा पाहून काही लोक या ॲप्सची मदत घेतात. लोकांच्या या गरजा लक्षात घेऊन फसवणूक करणारे बनावट ॲप्सद्वारे लोकांना त्यांच्या फसवणुकीचे बळी बनवतात.

यामुळे अडचणी आणखी वाढतात हे बनावट कर्ज ॲप्स डेटा चोरण्यासाठी आणि आर्थिक असुरक्षिततेचा फायदा घेण्यासाठी डिझाइन केलेले असतात. आपल्याला त्यांच्याद्वारे कर्ज मिळाले तरी छुपी फी त्वरित आपल्याला कर्जात अडकवू शकते. कर्ज घेतल्यानंतर रक्कम खात्यात येईलच असे नाही. एका प्रकरणात त्या व्यक्तीला रक्कम मिळाली नाही. उलट त्याला दुप्पट रक्कम भरण्यास सांगणारे कॉल आले. फसवणूक करणारे धमकीचे फोन कॉल्स आणि मेसेज करतात. चोरी केलेला डेटा तिसऱ्या कोणाला किंवा इतर सायबर गुन्हेगारांना विकला जाऊ शकतो. काही बनावट कर्ज ॲप्समध्ये मालवेअर असू शकतात. जे मोबाइल फोनला संक्रमित करतात आणि बँक लॉगिन आणि पासवर्डसारखी आपली संवेदनशील माहिती चोरतात. छायाचित्रांमध्ये फेरफार करून ब्लॅकमेल करू शकतात.

खऱ्या- बनावटमधील फरक जाणून घ्या वास्तविक कर्ज केफएसमधील व्याजदर, परतफेडीच्या अटी आणि संबंधित शुल्क स्पष्टपणे प्रदर्शित करेल (मुख्य तथ्य विधान हे एक दस्तऐवज आहे, जे कर्जाच्या अटी आणि शर्ती स्पष्टपणे स्पष्ट करते). अस्पष्ट किंवा छुपे नियम हे संकटाचे लक्षण आहेत.

आपल्याला डिजिटल स्वाक्षरी केलेले दस्तऐवज दिले जात असल्याची खात्री करा.

कर्ज ॲप नेहमी अधिकृत स्रोतावरूनच डाऊनलोड करा. बनावट ॲप्सचा धोका कमी करण्यासाठी यामध्ये तपासणी प्रक्रिया आहेत. अविश्वसनीय स्रोतांकडून डाऊनलोड केल्याने नुकसान होऊ शकते. apk इन्स्टॉलेशन फाइल मेसेंजरवर शेअर केलेली असेल असे कोणतेही कर्ज देणारे ॲप डाऊनलोड करू नका. वेबसाइट 'http'ने सुरू झाली पाहिजे. वेबसाइट http ने सुरू होत असेल तर ती सुरक्षित नाही.

व्याकरणातील चुका, अव्यावसायिक डिझाइन आणि कार्यक्षम वेबसाइटचा अभाव ही बेकायदेशीर पणाची लक्षणे आहेत.

कर्ज वाटप करण्यापूर्वीच आपल्याला पेमेंट करण्यास सांगणारे ॲप्स बनावट असू शकतात. तसेच हे ॲप इन्स्टॉल केल्यानंतर ते अनावश्यक परवानग्या मागतील.

**अशा प्रकारे निवडा योग्य ॲप**

कोणतेही कर्ज ॲप डाऊनलोड करण्यापूर्वी कर्जदाताबद्दल माहिती मिळवा. त्या आरबीआयद्वारे नियंत्रित एनबीएफसी केलेल्या (नॉन बँकिंग वित्तीय कंपन्या) बँका आहेत याची खात्री करा. नोंदणीकृत एनबीएफसीच्या वेबसाइटला भेट द्या.

अधिकृत ॲप स्टोअरमध्ये वापरकर्त्यांनी दिलेली पुनरावलोकने, मौल्यवान माहिती दिलेली असू शकते. रेड फ्लॅग आणि नकारात्मक अभिप्राय पाहा. स्कॅमर अनेकदा बनावट कर्ज ॲप्सचा प्रचार करण्यासाठी सोशल मीडिया, कॉल आणि संदेश वापरतात. लिंकवर क्लिक करू नका किंवा अज्ञात स्रोतांकडून अटॅच्डमेंट डाऊनलोड करू नका.

आपले कोणतेही बनावट कर्ज आढळल्यास स्टोअर्स आणि आरबीआय आणि स्थानिक सायबर गुन्हे कार्यालयासह संबंधित अधिकाऱ्यांकडे त्याची तक्रार करा. याद्वारे तुम्ही इतरांना स्कॅमचे बळी होण्यापासून वाचवू शकता.

साभार : दैनिक दिव्य मराठी



# ‘सिबिल’ स्कोअर कसा सुधाराल?

स्वीकारार्ह ‘सिबिल’ स्कोअर असण्याचे महत्त्व आणि फायदे यांचा आढावा (अर्थ वृत्तान्त, ११ मार्च २०२४) घेतल्यानंतर, आता काही कारणांनी ‘सिबिल स्कोअर’ खराब झाल्यास काय. उपाययोजना करावी हेही जाणून घेऊ. वाचकांना माहीत असेल की, ‘सिबिल स्कोअर’ ७५० च्या वर असल्यास तुमचा ‘क्रेडिट स्कोअर’ चांगला समजला जातो. थोडक्यात, तुम्ही एक चांगले कर्जदार असता. जेव्हा तुम्ही कर्ज (किंवा क्रेडिट कार्ड) घ्यायला जाता तेव्हा तुम्हाला चांगल्या अटी-शर्तींसह कमी दराने कर्ज मिळू शकते.

जरी तुमचा ‘क्रेडिट स्कोअर’ ७५०च्या वर असणे आदर्श समजला जात असला तरी प्रत्येक कर्ज प्रदात्याचे निकष वेगळे असू शकतात. तुम्ही तुमच्या ‘क्रेडिट स्कोअर’ मध्ये अल्पावधीत सुधारणा करू शकत नाही. तुमचा ‘क्रेडिट स्कोअर’ ७५० पेक्षा कमी असल्यास, तो कमी का आहे, याचा विचार करणे आवश्यक आहे.

**‘क्रेडिट स्कोअर’ कसा सुधारावा**

१. सिबिल स्कोअर कमी असण्याची कारणे तपासण्यापूर्वी, तुम्ही तुमचा ‘क्रेडिट रिपोर्ट’ पाहायला हवा. तुमच्या क्रेडिट रिपोर्टची वार्षिक एक प्रत तुम्हाला मोफत मिळते, तुमचा स्कोअर कमी असण्यास तुमच्या क्रेडिट हिस्ट्री अर्थात अहवालात काही विसंगती कारणीभूत असू शकतील. शक्य असेल तर या विसंगतीचे निराकरण केल्याने तुमचा क्रेडिट स्कोअर सुधारू शकतो. स्कोअरवर नकारात्मक परिणाम करणाऱ्या सर्व बाबींचे पुनरावलोकन केले गेले पाहिजे. ग्राहकांनी त्यांच्या वैयक्तिक तपशिलांशी संबंधित चुका शोधून त्यात सुधारणा केल्याने स्कोअर सुधारला जाऊ शकेल.

२. तुम्ही फार पूर्वी फेडलेल्या कर्जासाठी आणि अनाकलनीय खात्यांसाठी क्रेडिट रिपोर्टची तपासणी करा. त्रुटी असतील तर त्या त्रुटींचे निराकरण करा.

३. मोठी कर्जे फेडा आणि तुमच्या क्रेडिट कार्ड वापराचे प्रमाण पत- मर्यादेच्या ३० टक्के किंवा त्याहून कमी सीमित ठेवा.

४. तुमच्या कर्जाचा मासिक हप्ता (ईएमआय) वेळेवर भरा हप्ता वेळेवर न भरल्यास तुमचा ‘क्रेडिट स्कोअर’ घसरू शकतो. जर तुमच्याकडे वाहन, गृहोपयोगी वस्तू किंवा घर अशी मोठी कर्जे असतील तर या कर्जांची परतफेड करण्यास प्राधान्य द्या. तुमच्या क्रेडिट कार्डचे हप्ते वेळेवर भरा. तुमचे क्रेडिट रेटिंग मोजताना सिबिल किंवा इतर क्रेडिट ब्युरो ज्या महत्त्वाच्या गोष्टींकडे लक्ष




देतात त्यापैकी क्रेडिट कार्डाचे हप्ते हे महत्त्वाचे मोजमाप आहे.

५. तुमच्या क्रेडिट रिपोर्टमध्ये तुमच्या घरगुती वापराची बिले (वीज, पाणी, गॅस किंवा फोन ) भरण्याची माहिती अंतर्भूत नसली तरीही, ही बिले देय तारखेपूर्वी अदा करणे महत्त्वाचे आहे. ते वेळेत न दिल्यास तुमचा कर्ज प्रदाता तुमचे कर्ज एखाद्या वसुली वितरकाकडे पाठवू शकतो. त्यांना तुमच्या क्रेडिट अहवालावर ‘डिफॉल्ट रेकॉर्ड’ करण्यास सांगू शकतो.

६. क्रेडिट कार्डच्या वापराचे प्रमाण (क्रेडिट युटिलायझेशन रेशो) कमी ठेवा. प्रत्येक खरेदी केलेल्या गोष्टीसाठी क्रेडिट कार्ड वापरू नका. क्रेडिट कार्डचे पत वापर प्रमाण (क्रेडिट युटिलायझेशन रेशो) ३० टक्के किंवा त्यापेक्षा कमी ठेवणे कधीही चांगले. म्हणजेच जर तुमची कार्ड वापर मर्यादा १ लाख रुपये असेल तर ३० हजारांच्या वर त्याचा वापर जाऊ न देणे कधीही हिताचे असते. असे केल्याने क्रेडिट स्कोअरवर सकारात्मक परिणाम होईल. तुमची मासिक देय शिल्लक कमी ठेवल्यास सुदृढ सिबिल किंवा क्रेडिट स्कोअर दिसून येईल.

७. जेव्हा तुम्ही तुमच्या बँकेला तुमची क्रेडिट मर्यादा वाढवण्यास सांगता, विशेषतः क्रेडिट कार्डसाठी, याचा अर्थ असा नाही की तुम्हाला तुमच्या क्षमतेपेक्षा जास्त खर्च करण्याची संधी मिळेल. जर तुम्ही तुमचा वापर चतुराईने व्यवस्थापित केले तर क्रेडिट मर्यादेतील या वाढीमुळे अनेक ‘प्लस पॉइंट्स’ मिळू शकतात. तुमच्याकडे खूप जास्त क्रेडिट उपलब्ध आहे आणि तुम्ही तुमचा क्रेडिट वापर कमी ठेवल्यास, त्याचा तुमच्या सिबिल किंवा क्रेडिटवर सकारात्मक परिणाम होईल. संयुक्त अर्जदारांवर लक्ष ठेवा. ही खरोखर अशी परिस्थिती आहे जिथे तुमची चूक नसली तरीही तुम्हाला त्रास होऊ शकतो. अशा परिस्थितीत, जर तुम्ही दुसऱ्याने घेतलेल्या कर्जासाठी संयुक्त अर्ज करत असाल आणि

त्यांनी बिल उशिरा दिले असेल तर तुमचेही नुकसान होईल. ते तुमच्या अहवालातही दिसून येईल आणि सिबिल किंवा क्रेडिट स्कोअरवर विपरीत परिणाम होऊ शकेल. हे टाळण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे कर्ज आणि कार्डे वेळेवर भरली जात आहेत याची खात्री करणे आणि संयुक्त क्रेडिट अटीसाठी अर्ज करण्यापुरते मर्यादित ठेवणे.

८. तुमचे कर्ज फेडण्यासाठी तुमच्याकडे रोख रक्कम नसल्यास, तुमच्याकडे अनेक पर्याय आहेतः शिल्लक हस्तांतरण क्रेडिट कार्डसाठी अर्ज करा. तुमचे जुने कर्ज नवीन बॅलन्स ट्रान्सफर क्रेडिट कार्डवर हलवण्याचा विचार करा. क्रेडिट लाइन वाढवण्याची विनंती करा. तुमचा क्रेडिट रेशो त्वरित वाढवण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे तुमची क्रेडिट लाइन वाढवणे. जर तुम्ही वेळेवर पैसे भरत असाल आणि कर्जदाती संस्थेशी तुमचे संबंधही चांगले असायला हवेत. क्रेडिट लाइन वाढीचा तुमच्या वापर मर्यादेवर (युटिलायझेशन रेशो) कर्ज फेडण्याइतकाच सकारात्मक परिणाम होईल. कर्ज एकत्रीकरणाचा विचार करा. तुमचे फिरणारे छोटी छोटी कर्जे एकाच कर्जामध्ये एकत्रित करून, तुम्ही तुमची क्रेडिट कार्ड शिल्लक काढून टाकाल. तसेच, एक हप्ता कर्ज तुमच्या क्रेडिट वापराच्या गुणोत्तरामध्ये समाविष्ट केले जात नाही कारण ते कर्ज फिरवत नाही. तुमचे क्रेडिट स्कोअर सुधारण्यासाठी सातत्याने निरीक्षण करणे आणि कार्य करणे खूप महत्त्वाचे आहे. तुम्ही जितक्या लवकर सुरुवात कराल तितक्या लवकर तुमचे गुण वाढतील.

साभार : दैनिक लोकसत्ता

---

## बँक फ्रॉड होताच तत्काळ १९३० डायल करा; पैसे परत मिळणे शक्य

ऑनलाइन बँकिंग व डिजिटल पेमेंट लाभदायी आहे. सोबतच त्यामुळे काही वेळा नुकसानही संभवते. त्याचा सर्वात मोठा तोटा फसवणुकीशी संबंधित आहे. गेल्या काही वर्षांत ऑनलाइन किंवा सायबर फसवणूक वाढली आहे.

बँक फसवणूक झाल्यावर काय करावे ? अशा प्रकारची फसवणूक रोखण्यासाठी केंद्राने २०२० मध्ये १५५२६० हेल्पलाइन क्रमांक सुरू केला होता. २०२२ मध्ये तो बदलून १९३० असा केला. कोणत्याही प्रकारच्या बँकिंग फसवणुकीनंतर नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावरून या नंबरवर तक्रार नोंदवावी.

**कोणती माहिती देणे गरजेचे असेल ?**

तक्रारदाराला बँकेचे नाव, रजिस्टर मोबाइल क्रमांक, ट्रान्झॅक्शन आयडी, खाते क्रमांक आणि डेबिट झालेला वॉलेट आयडी, यूपीआय आयडी द्यावा लागेल. डेबिट किंवा क्रेडिट कार्डशी संबंधी फसवणुकीच्या बाबतीत कार्ड क्रमांक द्यावा लागेल. व्यवहाराचा स्क्रीन शॉट, फसवणुकीसंबंधी इतर माहिती देता येईल. परंतु पिन नंबर किंवा ओटीपी सांगू नये.




**यातून फायदा काय होणार ?**

राष्ट्रीय सायबर क्राइम रिपोर्टिंग पोर्टल, रिझर्व्ह बँक, सर्व बँका, वित्तीय संस्था, यूपीआय इत्यादी या यंत्रणेशी जोडलेले आहेत. तक्रार दाखल होताच सर्व संबंधितांना संदेश जातो. फसवणुकीनंतर एका बँकेतून दुसऱ्या बँकेशी व्यवहारात वेळ लागतो. या काळात संबंधित बँकेपर्यंत संदेश गेल्यास फसवणुकीला रोखता येते. तसेच काही वेळातच खात्यावरून कापलेली रक्कम परत खात्यावर जमा होऊ शकते. त्यामुळेच वेळीच तत्परता दाखवून तक्रार नोंदवावी.

साभार : दैनिक दिव्य मराठी

# प्रत्येक व्यवहार गूगल पे, फोन पे करत बसू नका!

आजकाल चहापानाच्या टपरीवर देखील १ रुपयापासून पुढे कितीही पैसे स्वीकारण्यासाठी वेगवेगळ्या ॲपचे स्कॅनरकोड ठेवलेले असतात. काहीजण आधुनिक टेक्नॉलॉजीला खूप अपडेट व स्मार्ट आहे हे दाखवण्यासाठी १ रूपयाची बडीशेप पुडी जरी पानटपरीवर घेतली तरी १ रुपयाचे बिलसुद्धा कोड स्कॅन करून ॲपवरून भरणारे अतिस्मार्ट महाभागही आहेत, ऑनलाईन सोय नक्कीच चांगली आहे, परंतु अगदीच अडचणीच्या वेळी पर्यायी व्यवस्था म्हणून ठीक आहे. पण असा उठसुठ स्मार्टपणा बराच महागात पडू शकतो.

१०० रुपयाची एक रोख नोट एक लाख वेळा जरी देवाण-घेवाणीत फिरली तरी तिचे मूल्य हे १०० रुपयेच राहणार आहे, कुणालाही त्या १०० रुपयातून कमिशन अथवा दलाली मिळणार नाही. पण हेच १०० रुपये जर वेगवेगळ्या ॲपमधून कॅशलेस पद्धतीने फिरले तर... प्रत्येक व्यवहाराच्या वेळी आपल्याला २.५ टक्के (कमी जास्त हा दर असू शकतो) असे कमिशन द्यावे लागेल.

याचा अर्थ असा की हेच १०० रुपये जर ऑनलाइन एक लाख वेळा फिरले तर त्यातून अडीच लाख रुपये हे फक्त कमिशन म्हणून ती सेवा देणारी कंपनी कमवत असते. पेटीएम, गूगल पे, फोन पे सारख्या कंपन्या या फक्त आपण करत असलेल्या १०० रुपयाच्या व्यवहारावर बसल्या बसल्या लाखो रुपये कमवत असतात... म्हणून ही सोन्याची अंडी देणारी कोंबडी कार्पोरेट टोळक्याना भेटली आहे. हा घोटाळा पुढील सर्व घोटाळ्याची जननीच ठरेल अथवा आतापर्यंतच्या सर्व घोटाळ्यांपेक्षा मोठा व भयंकर आर्थिक घोटाळा ठरेल कदाचित.

डेबिट कार्ड वापरताना ०.५ टक्के ते १ टक्के इतका चार्ज पैसे घेणाऱ्याला भरावा लागतो. क्रेडिट कार्ड वापरताना १.५ टक्के ते २.५ टक्के इतका चार्ज पैसे घेणाऱ्याला भरावा लागतो.

आजकाल आपण फार मॉडर्न आहोत, हे दाखवण्यासाठी पाच-दहा रुपयांच्या चहाचे पण फोन पे द्वारे जेव्हा बिल देतो तेव्हा प्रत्यक्ष जरी जेवढ्याला तेवढेच पैसे गेलेले दिसत असले तरी पेटीएम/फ्री चार्ज/जीओ मनी आणि इतर इ वॉलेटसुद्धा आपले पैसे बँकेमध्ये ट्रान्स्फर करताना २.५ टक्के ते




३.५ टक्के इतका ज्यादा चार्ज बँका घेत असतात. आपले स्टेटमेंट बारकाईने पाहिले तर हे नंतर लक्षात येते. शिवाय मेसेस चार्ज म्हणून बँक तुमचे पैसे कट करत असते.

रिझर्व्ह बँकेच्या रेकॉर्डप्रमाणे दर महिन्याला साधारण ३० लाख कोटी इतकी रक्कम भारतात फक्त एटीएममधून काढली जाते आणि या रकमेबरोबर जर थेट बँकेतून काढली जाणारी रोख रक्कम जोडली तर हीच एकत्रित रक्कम वर्षाला ७५ लाख कोटी इतकी होते आणि ही सर्व रक्कम अधिकृत आणि टॅक्स भरलेली आहे.

सर्वात महत्त्वाचे हे की सध्या भारतात फक्त ३ टक्के इतके व्यवहार इलेक्ट्रॉनिक पद्धतीने होत आहेत. असे असतानाही एवढी मोठी रक्कम समोर येत आहे. जर वर उल्लेख केलेली ७५ लाख कोटी रक्कम कॅशलेस पद्धतीने फिरत राहिली तर २ टक्के दराने ई वॉलेटची कामे करणाऱ्या खासगी कंपन्याना किती फायदा होत असेल ? चक्क वर्षाला कमीतकमी १.५ लाख कोटी सध्याच्या जमान्यातला हा सगळ्यात मोठा रहस्यमयी घोटाळा असावा. पेटीएम, गूगल पे, फोन पे इत्यादी कंपन्या चक्क १.५ लाख कोटी इतका प्रचंड नफा दर वर्षी कमाऊ शकतात.

आधुनिक टेक्नॉलॉजी अडचणीत पर्याय म्हणून वापरणे व सर्रास धोपटणे यातील हा फरक आहे. आपल्या ज्ञानाचा फायदा निश्चितच पहिल्यांदा आपल्याला व इतरांनाही होतो; पण अज्ञानाचा फायदा मात्र फक्त इतरांनाच होतो.

# क्रेडिट कार्ड नावाचा गुप्त शत्रू

कळत-नकळत वाढलेल्या ऐहिक गरजांपोटी आपल्या बजेटची ऐशीतैशी करणारा क्रेडिट कार्ड नावाचा क़र्जरूपी राक्षस खिशातून किंवा पर्समधून आपल्यासोबत फिरत आहे. त्याच्यामुळे खिशाला परवडत नसताही व बजेटमध्ये बसत नसतानाही आपण खरेदी करत सुटतो.

एका ताज्या आकडेवारीनुसार, २०२३ आर्थिक वर्षात २.९ अब्ज व्यवहारामध्ये १४ लाख करोड रुपये हिंदुस्थानी चलनाची उलाढाल झाली आहे.

आपल्याकडे जेव्हा अकाऊंटला पैसे असतात तेव्हा आपण डेबिट कार्ड वापरतो. याला एटीएम असे म्हणतो. म्हणजे ए- असतील टी- तर एम - मिळतील. म्हणजे अकाऊंटला पैसे असतील तरच हे कार्ड वापरता येईल. क्रेडिट कार्ड अगदी याच्या उलट. ते म्हणजे एनटीएम... म्हणजे एन- नसतील, टी- तरी, एम मिळतील. म्हणजे अकाऊंटला पैसे नसतील तरीही हे कार्ड वापरता येईल. म्हणजे या कार्डावर खरेदी करणे म्हणजे एक प्रकारे कर्जच नाही का? बरे १८ ते २४ टक्के असलेल्या व्याजाचा दर किंवा त्यावरील दंडाचा विचार केलात तर पठाणी व्याजाची आठवण येते. तुम्ही वेळेवर क्रेडिट कार्डची बिले भरली नाही तर क्रेडिट कार्ड देणाऱ्या कंपन्यांची चंगळच. शिवाय वेळेवर क्रेडिट कार्डचे पेमेंट नाही केले तर सिबिल स्कोर खाली गेलाच समजा. मिनिमम ड्यू फक्त भरत राहिलो तर बाकीच्या रकमेवर व्याज व दंड वाढत राहते हे कित्येकांना माहीतही नसते आणि अज्ञानापोटी आज कित्येक जण क्रेडिट कार्डच्या चक्रात गुरफटले आहेत. मला आवडणारी गोष्ट माझ्याकडे आता पैसे नसताना मला आताच घ्यायची आहे या हव्यासापोटी नकळत कर्ज वाढवून आपल्या बजेटचा बट्ट्याबोळ करण्यात काय अर्थ आहे? एकदा का क्रेडिट कार्डची सवय लागली की, विनाकारण खरेदी करायचे व्यसन लागून जाते. त्यामुळे आपल्याला जेव्हा पूर्ण खात्री असते की, क्रेडिट कार्ड वर मारलेले पेमेंट त्याच्या ड्यू डेटच्या अगोदर मला भरता येणार आहे त्याच वेळी क्रेडिट कार्डचा वापर करावा, अन्यथा हा वापर आपल्याला कर्जाच्या विळख्यात बांधून टाकतो.

याचबरोबर क्रेडिट कार्डचा स्मार्ट वापर करून स्वतःचा फायदा करून घेणारे लोकही अस्तित्वात आहेत. हे लोक आपली सर्व पेमेंट क्रेडिट कार्डवर करतात. अगदी पेमेंट ड्यू होण्याच्या आधी आपला क्रेडिट कार्डचा हप्ता भरतात व क्रेडिट कार्डचे पॉइंट्स मिळवतात. या पॉइंट्समुळे त्यांना क्रेडिट कार्ड वापरल्यामुळे आर्थिक फायदादेखील होतो. क्रेडिट कार्डचा आपण स्मार्ट वापर केला तर नक्कीच फायदा होईल.




**काय काळजी घ्याल -**

- ∗ **योग्य कंपनीचे क्रेडिट कार्ड निवडा. पैसे भरायला उशीर झाला तर किती व्याजदर लागणार याची खातरजमा करून घ्या.**
- ∗ **क्रेडिट कार्डची मर्यादा किती आहे हे जाणून घ्या.**
- ∗ **क्रेडिट कार्डचा वापर करताना आपले स्वतःचे पैसे ड्यू डेटच्या अगोदर पेमेंट करण्यासाठी उपलब्ध होणार आहेत का याची खात्री बाळगा.**
- ∗ **मिनिमम ड्यू न भरता ड्यू झालेली पूर्ण रक्कम भरून व्याज व दंड टाळा.**
- ∗ **प्रमोशनल ऑफर्स आणि क्रेडिट पॉइंट यांचा त्याची व्हॅलिडिटी संपण्याआधी वापर करा, अन्यथा ही संधी वाया जाईल.**
- ∗ **बिलिंग सायकल जाणून घेऊन खरेदी करा. म्हणजे कुठलेही व्याज न लागता जास्त कालावधीसाठी बिनव्याजी पैसे आपण वापरू शकता.**

साभार : दैनिक सामना

# या चुका टाळा; नक्की मिळेल कर्ज

मुलांचे शिक्षण, लग्न, कुटुंबातील सदस्याच्या आजारावर उपचार किंवा घरातील कोणत्याही अनपेक्षित किंवा मोठ्या खर्चासाठी एखादी व्यक्ती वैयक्तिक कर्ज घेते. आता कल्पना करा की अशा परिस्थितीत बँकेने त्याचा कर्ज अर्ज फेटाळला तर त्याच्या गरजा कशा पूर्ण होतील? अशा अनेक चुका आहेत, ज्यामुळे कर्ज मिळणे कठीण होऊ शकते. आपल्याला पर्सनल लोन घ्यायचे असेल किंवा भविष्यात कधी तरी घ्यावं लागलं तर काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवाव्या आणि त्यासाठी तयारी करावी.




**परतफेड करण्याचे मूल्यांकन करावे**

जेव्हा मोठी गरज असते आणि कुठूनही मदतीची आशा नसते तेव्हाच विचार करून कर्जासाठी अर्ज करावा. कर्जातून सहज मिळालेले पैसे किमान १० ते २४ टक्के वार्षिक व्याजासह परत करावे लागतात. त्यामुळे आपले उत्पन्न आणि अत्यावश्यक खर्च लक्षात घेऊन, आपल्याकडे व्याजासह मासिक कर्जाचे हप्ते भरण्यासाठी दरमहा पैसे उपलब्ध असतील का, याचा विचार करावा. याकडे अगोदर लक्ष न दिल्यास भविष्यात कर्जाची परतफेड करण्यात अडचण येईल आणि आपण सापळ्यात अडकत जाऊ.

कर्जाच्या अटी-नियमदेखील जाणून घ्या प्रत्येक बँक आणि कर्ज देणारी कंपनी वेगवेगळ्या व्याजदर आणि अटींवर कर्ज देते, जसे की काही कर्जाच्या अटींमध्ये, काही वेगळे शुल्क, प्रक्रिया शुल्क, प्री क्लोजर चार्ज, विलंब पेमेंट शुल्क, परतफेडीचे वेळापत्रक बदलण्याचे शुल्क इत्यादीदेखील देय असतात. त्यामुळे कर्जासाठी लागू असलेल्या सर्व अटी व शर्ती वाचणे आणि समजून घेणे महत्त्वाचे आहे.

**क्रेडिट स्कोअरकडे लक्ष द्या**

कमी क्रेडिट स्कोअरमुळे कर्ज नाकारले जाऊ शकते. जेव्हा क्रेडिट स्कोअर ७५० पेक्षा जास्त असेल तेव्हा सर्व प्रकारचे कर्ज मिळवणे सोपे आहे. उच्च स्कोअर कमी व्याजदर आणि कोणतेही प्रक्रिया शुल्क यासारख्या चांगल्या परतफेड अटींसह कर्ज मिळवण्यात मदत करते. म्हणून, कर्जासाठी अर्ज करण्यापूर्वी, आपला क्रेडिट स्कोअर तपासावा आणि त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न करावा.



**गरजेनुसार कर्ज घ्या**

मोठे कर्ज घेणे म्हणजे दरमहा जास्त व्याज आणि कर्जाच्या संपूर्ण कालावधीसाठी अतिरिक्त भार असतो. नियमानुसार मोठ्या कर्जासाठी पात्र असण्याचा अर्थ असा नाही की संपूर्ण कर्ज घेणे आवश्यक आहे. आपल्याला प्रत्यक्षात किती कर्जाची आवश्यकता आहे याचे मूल्यांकन करावे आणि ठरवावे आणि नंतर त्या रकमेसाठी अर्ज करावा.

**वारंवार नोकऱ्या बदलणे**

काही लोक दरवर्षी पगार वाढवण्यासाठी नोकरी बदलतात. परंतु यामुळे कर्ज नाकारले जाऊ शकते. कर्ज देताना बँक आपल्या नोकरीची स्थिरता पाहते. आपण कोठे काम करतो, कोणत्या पदावर आहोत, किती कमावतो आणि किती वर्षे तिथे आहोत किंवा किती वर्षे नोकरी बदलली आहे हे ते पाहतात आणि त्या आधारे अर्ज मंजूर किंवा नाकारला जातो. त्यामुळे आपल्या कामात नेहमी स्थिरता ठेवावी. त्यामुळे वर्तमान आणि भविष्यात कर्ज मिळणे सोपे होईल.

**कर्ज भरल्यानंतर अर्ज करावा**

आपल्यावर अनेक कर्ज असल्यास किंवा आधीच अनेक कर्जे घेतली असल्यास, आपला अर्ज नाकारला जाऊ शकतो. आपले सर्व क्रेडिट कार्ड पेमेंट किंवा कार लोन ईएमआय इत्यादी क्लिअर केल्यानंतरच आपण कर्जासाठी अर्ज करावा.

साभार : दैनिक दिव्य मराठी

# ‘सिबिल स्कोअर’चे महत्व

तुमचा सिबिल स्कोअर चांगला नाही, म्हणून बँका कर्ज नाकारत असतील, आमच्याकडे या. आम्ही सिबिल स्कोअर पाहत नाही, अशा आशयाची एक जाहिरात तुम्ही रेडिओवर नक्की ऐकली असेल. आजच्या या लेखाद्वारे आपण सिबिल स्कोअर म्हणजे काय आणि सिबिल स्कोअर चांगला असण्याचे महत्त्व जाणून घेऊ. ‘क्रेडिट इन्फॉर्मेशन ब्युरो ऑफ इंडिया लिमिटेड’ अर्थात सिबिल, ही भारतातील पत, मानांकन कंपनी आहे असे म्हणता येईल.

एखाद्या व्यक्तीच्या आणि संस्थेच्या कर्ज परतफेड आणि क्रेडिट कार्ड यांसारख्या कर्जासंबंधित व्यवहारांचा दस्तऐवजाचा संग्रह आणि देखरेख करण्याचे काम ही कंपनी करते. हा दस्तऐवज कंपनीला पुरविण्याचे काम सर्व वित्त पुरवठादार करतात. या माहितीचे संख्यात्मक विश्लेषण करून त्या व्यक्तीचा ‘क्रेडिट इन्फॉर्मेशन रिपोर्ट’ (सीआयआर) आणि सिबिल स्कोअर विकसित केला जातो.

क्रेडिट कार्ड हे एक प्रकारचे मर्यादेसह मंजूर केलेले आवर्ती कर्ज घेण्याचे भौतिक साधन आहे. क्रेडिट कार्डचा वापर वस्तू आणि सेवा खरेदी करण्यासाठी विहित अटी आणि शर्तींच्या अधीन केला जातो. जर क्रेडिट कार्डचा वापर व्यवस्थित केला तर तुमचा उत्तम कर्ज परतफेडीचा इतिहास (क्रेडिट रेकॉर्ड) तयार होऊ शकतो.

आजच्या लेखातून बँकेच्या चुकीमुळे आणि कर्जदाराच्या अज्ञानामुळे ‘सिबिल रेकोर्ड’ कसा खराब झाला, हे एका सत्य घटनेच्या आधारे पाहू. कर्जदाराची ओळख लपविण्यासाठी अर्थात कर्जदाराचे नाव बदलले आहे. अजय, वय ३५ वर्षे, हे नियमित क्रेडिट कार्ड वापरत होते. देय तारखांच्या आधी देय रक्कम बँकेला देत असत. दहा वर्षांपूर्वी काही आर्थिक समस्या निर्माण झाल्याने काही काळ ते देय तारखांना बँकांना देय रकमेची परतफेड करू शकले नाहीत. परिस्थिती अधिक बिकट झाल्याने त्यांना क्रेडिट कार्डच्या रकमेची उशिरादेखील परतफेड करणे शक्य झाले नाही. परंतु अजय पैसे देण्यास इच्छुक असल्याने त्यांनी बँकेशी संपर्क साधला आणि सुरुवातीच्या वाटाघाटीनंतर औपचारिक पत्राद्वारे समझोत्यासाठी अर्ज केला. या अर्जात त्यांनी त्याच्यासमोरील आव्हाने तपशीलवार नमूद केली. बँकेने ‘ओटीएस’ (एकरकमी समझोता रकमेसाठी सहमती दर्शवली आणि

अजय यांनी ठरलेल्या निश्चित झालेल्या अटींनुसार रक्कम दिली. हे प्रकरण बंद झाल्याची अजय यांची समजूत होती. त्याने




पुन्हा एकदा गृहकर्ज मिळवण्यासाठी बँकेशी संपर्क साधला. बँकेने त्याच्या ‘सिबिल’ रेकॉर्डमध्ये क्रेडिट कार्ड खात्यात ‘राइट ऑफ’ (निर्लेखित) म्हणून नोंद असल्याचे सांगून त्यांना कर्ज देण्यास नकार दिला. अजय, यांना त्यांच्या ‘क्रेडिट रिपोर्ट’ मधील ही नोंद पाहून धक्का बसला. ही घटना ते २५ वर्षांचे असताना १० वर्षांपूर्वी घडली होती आणि त्यांनी औपचारिकरीत्या देय रक्कम बँकेला दिली होती. त्यांनी पुन्हा एकदा संबंधित बँकेशी संपर्क साधला आणि तक्रार केली की बँकेने समझोता केलेल्या क्रेडिट कार्ड रकमेची ‘सिबिल रेकॉर्ड’मध्ये अद्ययावत नोंद न करता ‘सिबिल रेकॉर्ड’मध्ये ‘राईटऑफ’ म्हणून नोंद करणे चुकीचे असून बँकेने या दस्तऐवजात सुधारणा करावी अशी विनंती केली. दोन प्रतिसादांमध्ये बँक अधिकाऱ्याने त्यांना ‘क्रेडिट रेकॉर्ड’ अद्ययावत करण्यास थकीत रक्कम भरण्याचा सल्ला दिला. बँकेच्या अधिकाऱ्याने प्रकरणाचा तपास न करता हे प्रकरण हाताळले आणि स्पष्ट उत्तरे दिली नाहीत. वारंवार विनंती करूनही बँकेने सुधारणा न केल्याने, अजय यांनी बँकिंग लोकपालकडे तक्रार केली. बँकिंग लोकपालांनी अजय यांनी दावा केलेल्या तथ्यांची पुष्टी करण्यास बँकेला सांगितले. बँकांनी ग्राहकांशी झालेले लिखित संप्रेषण सामायिक करण्यास सांगितले. बँकेने मान्य केले की, तांत्रिक समस्येमुळे पूर्वीचा दस्तऐवज उपलब्ध नाही, ही बाब खूप जुनी असल्याने बँक संबंधित कागदपत्रेही सादर करू शकली नाही. बँकिंग लोकपालांनी बँकेला सल्ला दिला की, बँकेने ‘सिबिल’ नोंद अद्ययावत करून बँकेने पुरविलेल्या सेवांमध्ये उणीव राहिल्याने अजय यांना झालेल्या मानसिक त्रासाबद्दल भरपाई द्यावी.

अजय यांनी बँकेशी झालेला पत्रव्यवहार सादर केल्याने

निकाल अजय यांच्या बाजूने दिला गेला. वाचकांनी या गोष्टीतून दोन धडे घेणे आवश्यक आहे. पहिली गोष्ट क्रेडिट कार्ड देय रक्कम दिल्यावर त्याची नोंद सिबिल दस्तऐवजात झाली किंवा नाही याची खात्री करणे आवश्यक होते. अजय नियमितपणे त्यांचा 'सिबिल स्कोर' तपासून बँकिंग लोकपालांकडे तक्रार करणे टाळू शकले असते.

आता 'सिबिल' बद्दल अधिक माहिती घेऊ. 'सिबिल स्कोअर' हा एखाद्या व्यक्तीच्या कर्ज फेडीचा तीन अंकी सारांश असतो. 'सिबिल' अहवालाला 'क्रेडिट इन्फॉर्मेशन रिपोर्ट' असेही म्हणतात. 'सिबिल स्कोअर' जितका जास्त तितके तुमचे कर्ज मंजूर होण्याची शक्यता जास्त असते. कर्ज देण्याचा निर्णय पूर्णपणे बँकेवर अवलंबून असतो. कर्ज आणि क्रेडिट कार्ड मंजूर करावे की नाही हे बँक ठरवत असते. 'सिबिल' कोणत्याही प्रकारे कर्ज मंजूर करायचे की नाही हे ठरवत नसतो. 'सीआयआर'मध्ये तुम्ही घेतलेल्या आणि परतफेड सुरू असलेल्या आणि परतफेड पूर्ण केलेल्या कर्जांची तपशीलवार माहिती असते. जसे की, गृह कर्ज, वाहन कर्ज, क्रेडिट कार्ड, वैयक्तिक कर्ज, ओव्हरड्राफ्ट (ओडी) सुविधा इत्यादी. 'सिबिल स्कोअर ३०० ते ९०० दरम्यान असतो. तुमचा 'सिबिल स्कोअर ७०० किंवा त्यापेक्षा अधिक असेल तर तुम्ही बँकांच्या पसंतीचे कर्ज इच्छुक समजले जाता.

काही कारणांनी तुमचा कर्जाचे हप्ते थकले आणि तुमचा 'सिबिल स्कोअर' खराब झाला तर 'सिबिल स्कोअर सुधारायचा कसा हा प्रश्न अनेकांना पडला असेल. 'सिबिल स्कोअर' विविध घटकांवर अवलंबून असतो. तुमच्या कर्जाचे हप्ते, क्रेडिट कार्डाचे हप्ते वेळेवर भरा. तुमच्या कर्जाचे हप्ते देण्याच्या तारखेची नोंद करा. नवीन क्रेडिट कार्ड घेण्याऐवजी जुन्या क्रेडिट कार्डावर व्यवहार करा. नेहमी उपलब्ध मर्यादेपेक्षा कमी रक्कम क्रेडिटवर खर्च करा. तारण कर्जे (जसे की गृह कर्ज, वाहन कर्ज) आणि विनातारण कर्ज (जसे की वैयक्तिक कर्ज, क्रेडिट कार्ड) दोन्हीचा योग्य वापर करा. तुम्ही तुमच्या पत्नी मुलांना 'अ‍ॅड ऑन' कार्ड दिले असेल तर अशा कार्डाचे हप्ते वेळेवर भरले जात आहेत याची दक्षता घ्या. स्वीकार्य 'क्रेडिट स्कोअर' राखण्यासाठी तुमच्या क्रेडिट कार्ड वापरावर नियंत्रण ठेवा. एक कर्ज फेडल्यानंतर दुसरे कर्ज घ्या. एकाच वेळी खूप कर्जे घेऊ नका. तुमच्या क्रेडिट रिपोर्टचे वार्षिक पुनरावलोकन करा. तुमच्या क्रेडिट रिपोर्ट कोणी काढला तर तुम्हाला त्या बाबतीत अवगत केले जाते. जेव्हा तुम्ही तुमचा स्वतःचा क्रेडिट स्कोअर किंवा




क्रेडिट रिपोर्ट तपासता तेव्हा ते 'सॉफ्ट इन्क्वायरी' म्हणून गणले जाते. तुम्ही तुमचा क्रेडिट स्कोअर कितीही वेळा तपासला तरीही तुमचा सिबिल स्कोअर प्रभावित होत नाही. तथापि, नवीन क्रेडिट कार्ड किंवा कर्ज अर्जाच्या वेळी बँका किंवा वित्तीय संस्थांनी तुमचा क्रेडिट अहवाल तपासला तर ती 'हार्ड इनक्वायरी' मानली जाते आणि त्याचा तुमच्या स्कोअरवर परिणाम होतो. एकाहून अधिक 'हार्ड इनक्वायरी' वारंवार केल्या गेल्यास, त्या व्यक्तीचे आर्थिक वर्तन 'क्रेडिट हंग्री बिव्हेयीअर' या सदरात मोडते, असे आर्थिक वर्तन आणि तुमच्या 'क्रेडिट स्कोअर' ला हानी पोहोचवू शकते.

'क्रेडिट इन्फॉरमेशन ब्युरो' चा 'रिझर्व्ह बँक- इंटिग्रेटेड ओम्बड्समन स्कीम २०२१'मध्ये समावेश आहे. तुम्ही क्रेडिट स्कोअरबाबत समाधानी नसल्यास, क्रेडिट ब्युरोविरुद्ध तक्रार नोंदवू शकता. जर एखाद्या व्यक्तीने पूर्वी कधीही कर्ज किंवा क्रेडिट कार्ड घेतले नसेल आणि तुमची 'क्रेडिट हिस्ट्री' उपलब्ध नसेल तर वित्त पुरवठादारांना तुमची पत आणि तुम्हाला कर्ज देण्यात असलेली जोखीम ठरवणे कठीण होते. तुमचा क्रेडिट स्कोअर तयार करण्यासाठी 'एंट्री लेव्हल क्रेडिट कार्ड' मिळवा. या क्रेडिट कार्डचा वारंवार वापर करा आणि मुदतीच्या कालावधीत सकारात्मक क्रेडिट इतिहास तयार करण्यासाठी वेळेवर पेमेंट करण्याची खात्री करा. तुमच्या बँक मुदत ठेवीवर तुम्ही तारण कर्ज घेऊन तुम्ही तुमची क्रेडिट हिस्ट्री' तयार करू शकता. हप्त्यावर फोन घेतल्याने 'क्रेडिट हिस्ट्री' तयार होते. गृहउपयोगी वस्तूसाठी कर्ज घेतल्यास या कर्जाची मुदत साधारण वर्षभर असते. या कर्जाची वेळेवर परतफेड केल्याने तुमची 'क्रेडिट हिस्ट्री' आणि क्रेडिट स्कोअर तयार करण्यात मदत होऊ शकते.

साभार : दैनिक लोकसत्ता

# एटीएम मधून विनाकार्ड काढा रोख रक्कम

समजा तुम्ही एटीएमवर रोख रक्कम काढायला गेलात आणि तुमच्या लक्षात आले की डेबिट कार्ड जवळ नाही... काही हरकत नाही. कारण विना एटीएम कार्ड तुम्हाला रक्कम काढता येईल. या सुविधेचे नाव कार्डलेस कॅश विड्रॉल असे आहे. या अंतर्गत युपीआय पेमेंट ॲपच्या मदतीने क्युआर कोड स्कॅन करून एटीएम मधून रक्कम काढता येते. त्यासाठी काही गोष्टी लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

**अशी करा प्रक्रिया...**

- युपीआय ॲप्लिकेशनमध्ये नोंदणीकृत कुणीही व्यक्ती युपीआय-एटीएमचा उपयोग करू शकते.
- सर्वात आधी एटीएम मशिनवर जाऊन UPI Cardless Cash / QR Cash हा पर्याय निवडा.
- त्यानंतर तुमची रक्कम नोंदवा आणि पुढील प्रक्रिया पूर्ण करा.
- रक्कम टाकल्यानंतर एटीएम मशिनवर एक क्युआर कोड येईल.
- हा क्युआर कोड मोबाईलमध्ये असलेल्या गुगल पे/फोन पे/पेटीएम वा अन्य ॲपच्या मदतीने स्कॅन करा.
- त्यानंतर युपीआय पिन टाका.
- प्रक्रिया पूर्ण होताच तुम्हाला रोख रक्कम मिळेल.

साभार : दैनिक सामना

---

# सायबर फ्रॉडपासून सावधान !

- **ओटीपी फ्रॉड :** स्कॅमर्स युजर्सला भूलवून ओटीपी घेतात आणि त्याचा गैरवापर करतात.
- **युपीआय मनी रिक्वेस्ट फ्रॉड :** स्कॅमर्सकडून फेक मनी रिक्वेस्ट पाठवली जाते. स्कॅमर्स कॉल करून रिक्वेस्ट प्रोसेस पूर्ण करण्यास सांगतात.
- **बँक अकाऊंट डिॲक्टिवेट :** अनेकदा कॉलवर तुमचे बँक अकाऊंट डिॲक्टिवेट होणार असे सांगितले जाते. ते होऊ नये म्हणून तुमची गोपनीय माहिती मागवली जाते. तसेच काही लिंक देऊन युजर्सना बनावट वेबसाईटवर घेऊन जातात. तिथे पण खाजगी आणि आर्थिक माहिती घेतली जाते.
- **केवायसी अपडेट :** केवायसीच्या नावाखाली स्कॅमर्स युजर्सला कॉल करतात. तुमचे केवायसी अपडेट झालेले नाही, असे सांगतात.
- **वीज बिलाचा फ्रॉड :** काही महिन्यांपूर्वी तुम्ही विजेचे बिल भरलेले नाही, असे सांगणारे फ्रॉड कॉल यायचे.

कशी काळजी घ्याल ?

● कोणत्याही वेबसाईटची वैधता तपासल्याशिवाय त्यावर भेट देऊ नका. ● अनोळखी ई-मेल, मेसेज किंवा फोन कॉलपासून सावधान. विशेष करून कुणी खाजगी किंवा आर्थिक माहिती मागितली तर शेअर करू नका वा लिंकवर क्लिक करू नका. ● कुणालाही क्रेडिट कार्ड किंवा पासवर्ड शेअर करू नका.

साभार : दैनिक सामना

---

# अशी घ्या खबरदारी...

- मोबाईलवर आलेला कोणताही ओटीपी कोणालाही सांगू नका. तसेच अचानक ओटीपी आल्यास खबरदारी घ्यावी.
- बँक खाते क्रमांक तसेच डेबिट व क्रेडिट कार्डवरील १४ अंकी नंबर पाठीमागील सीव्हीसी क्रमांक कोणालाही देऊ नये.
- काही सुविधा सुरू किंवा बंद करायच्या असल्यास बँक शाखेत जाऊन चौकशी करावी किंवा बँकेच्या अधिकृत संकेतस्थळ, संपर्क क्रमांकावरून माहिती घ्यावी.
- सोशल मीडिया, व्हॉटस्ॲपवरून आलेल्या अनोळखी लिंकवर क्लिक करू नये.
- एनी डेस्क किंवा अनोळखी व्यक्तींनी सांगितलेले ॲप स्वतःच्या मोबाईलवर इन्स्टॉल करू नये.

साभार : दैनिक पुढारी

# लवकर निवृत्त होण्यासाठी आर्थिक नियोजन धोरणे

सेवानिवृत्तीबद्दल काहीही चर्चा निघाली की, आपण आपोआप ६० वर्षे आणि त्याहून अधिक वयाचा विचार करतो. आपण आपली सेवानिवृत्ती किमान एक दशक - ५० वर्षे किंवा त्याहून अलीकडे आणू शकलो तर... अवघड किंवा अशक्य वाटते ना; परंतु योग्य नियोजन आणि अंमलबजावणी केल्यास ते नक्कीच होऊ शकते.

लवकरच्या निवृत्तीचे नियोजन करण्यासाठी तुमच्या संपत्तीचा दीर्घकालीन विचार करणे आणि आर्थिक स्थिरता सुनिश्चित करण्यासाठी स्पष्टता असणे आणि लवकर नियोजन करणे आवश्यक आहे. यामध्ये तुमची आर्थिक उद्दिष्टे ओळखणे, सध्याच्या आर्थिक स्थितीचे मूल्यांकन करणे आणि बचत, गुंतवणूक आणि खर्च यांचा समावेश असलेली सर्वसमावेशक योजना तयार करणे समाविष्ट आहे.

**प्रथम आणि सर्वात महत्त्वाचे : कॉर्पस गणना**

सेवानिवृत्तीनंतरच्या निधीची गणना करणे ही एक महत्त्वाची बाब आहे, कारण त्यातून तुम्हाला किती पैसे वाचवायचे आहेत आणि सेवानिवृत्तीसाठी किती पैसे गुंतवायचे आहेत, आर्थिक स्वातंत्र्य मिळवण्यासाठी आणि त्यानंतरची इष्ट जीवनशैली जगण्यासाठी किती पैसे लागतील, हे ठरेल.

**उदाहरणार्थ :** समजा तुम्ही ४० व्या वर्षी निवृत्त होण्याचा विचार करणारे २५ वर्षांचे आहात. २०२३ मध्ये तुमचा मासिक खर्च ४०,००० रुपये आहे. वार्षिक ६ टक्के महागाई गृहित धरून, जेव्हा तुम्ही १५ वर्षांत ४० वर्षांचे व्हाल, तेव्हा २०३८ मध्ये तुमचा मासिक खर्च अंदाजे ९५,८६२ रुपये असेल. शिवाय, तुम्ही निवृत्त झाल्यानंतरदेखील तुम्हाला महागाईचे परिणाम अनुभवावे लागतील. यानुसार, तुमच्या सेवानिवृत्ती निधीमध्ये या सर्व गोष्टी प्रतिबिंबित होणे आवश्यक आहे. तुम्हाला वयाच्या ४०व्या वर्षी वार्षिक खर्च म्हणून ११.५ लाखांची आवश्यकता असल्यास, महागाईमुळे हा खर्च तुमच्या वयाच्या सत्तरीत किंवा ऐंशीच्या काळापर्यंत आणखी वाढण्याची शक्यता आहे, म्हणून सेवानिवृत्ती निधीच्या गणनेमध्ये दरवर्षी वाढीव खर्चाचा समावेश असणे आवश्यक आहे.

**फायर (एफआयआरई) पद्धत** : लवकर सेवानिवृत्तीसाठी पैसे वाचवण्याची एक लोकप्रिय पद्धत म्हणजे एफआयआरई (आर्थिक स्वातंत्र्य, निवृत्ती लवकर) पद्धत. एफआयआरई पद्धत जास्तीत जास्त बचतीसाठी काटकसरी जीवनशैली जगण्यावर, कर्जाची लवकर परतफेड करण्यावर आणि आक्रमक गुंतवणुकीद्वारे सक्रिय परतावा निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित करते.

**वाढीस हातभार लावणारे क्रेडिट :** क्रेडिटचा उपयोग शहाणपणाने केल्यास फायदा होऊ शकतो. तुम्ही तुमच्या वाढत्या मालमत्तेला निधी देण्यासाठी क्रेडिट वापरू शकता जे दीर्घकाळ संपत्ती निर्माण करण्यात मदत करेल आणि अशा प्रकारे तुम्हाला आर्थिकदृष्ट्या अधिक स्वतंत्र बनवेल. दीर्घकालीन बचत योजनांमध्ये मुदतीपूर्वी पैसे काढण्याऐवजी ज्यामध्ये व्याजाचे नुकसान होऊ शकते, आपत्कालीन परिस्थितीत तरलता निर्माण करण्यास क्रेडिट मदत करू शकते.

तुमच्या गरजा आणि आकांक्षा पूर्ण करण्यासाठी गृहकर्ज, वाहन कर्ज, ग्राहक टिकाऊ कर्ज किंवा वैयक्तिक कर्ज यासारखे कर्जामध्ये विविध पर्याय आहेत.

**गुंतवणूक करा - तुमचे पैसे तुमच्यासाठी काम करू दे**

निवृत्तीसाठीचा कॉर्पस तयार करू पाहणाऱ्या व्यक्तींसाठी विविध प्रकारचे गुंतवणुकीचे पर्याय उपलब्ध आहेत. जर तुम्ही उच्च जोखीम मार्गाने संपत्तीमध्ये जास्त वाढ करू पहात असाल, तर शेअर बाजारातील गुंतवणूक हा तुमच्याकडे असलेल्या पर्यायांपैकी एक पर्याय आहे. तुम्ही थेट शेअर्समध्ये किंवा आयपीओद्वारे किंवा म्युच्युअल फंडांमध्ये सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन (एसआयपी) द्वारे गुंतवणूक करू शकता.

**आर्थिक सल्लागार नेमताना काय विचारात घ्यावे ?**

तुमच्या लवकर सेवानिवृत्तीची योजना करण्यासाठी आर्थिक सल्लागार नियुक्त करताना, त्यांची पात्रता आणि अनुभव, फी संरचना, गुंतवणूक तत्त्वज्ञान आणि जोखीम व्यवस्थापनाचा दृष्टिकोन विचारात घेणे महत्त्वाचे आहे. तुमची अनन्य ध्येये, जोखीम सहनशीलता आणि आर्थिक परिस्थिती यांचा : विचार करणारी वैयक्तिकृत सेवानिवृत्ती योजना विकसित करण्यासाठी एक चांगला आर्थिक सल्लागार तुमच्यासोबत काम करू शकेल आणि तुम्हाला तुमची सेवानिवृत्तीची । उद्दिष्टे साध्य करण्यात मदत करण्यासाठी सतत समर्थन आणि मार्गदर्शन प्रदान करेल. आजच्या व्यस्त जीवनात आणि जगात, तुम्हाला छंद किंवा तुम्हाला नेहमी करायच्या होत्या अशां गोष्टींसाठी कदाचित वेळ मिळणार नाही; परंतु योग्य वयात लवकर निवृत्ती घेतल्याने तुम्हाला हवा तसा वेळ मिळेल.

साभार : दैनिक पुण्यनगरी

# आर्थिक फसवणूक कशी टाळाल?

स्मार्टफोनचा वापर हा आधुनिक जीवनशैलीचा एक अविभाज्य भाग बनला आहे. देशात होणाऱ्या बँकिंग व्यवहारांपैकी ५० टक्क्यांहून अधिक व्यवहार स्मार्टफोन किंवा इंटरनेट बँकिंगच्या माध्यमातून होत सतर्क आहेत. आपल्यापैकी बरेच जण युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस (यूपीआय)', गूगल पे, क्यूआर कोड यांसारख्या देयकांचा वापर रोखीच्या व्यवहारांसाठी करतात. खरे तर, स्वतःला अद्ययावत ठेवणे आणि बदलत्या युगात आपण शर्यतीत मागे राहणार नाही त्याची काळजी घेणे ही काळाची गरज आहे.

डिजिटल बँकिंगचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे बँकेत जाण्यापासून सुटका करणारे आणि पाकिटात कमी रोकड बाळगावयास लावणारे आहे. डिजिटल मंच हे सोयीचे असले तरी जागरूक नसलेल्या निष्पाप वापरकर्त्याची आर्थिक फसवणूक करणाऱ्यांसाठी कुरण बनले आहे. या मंचाचे अनेक वापरकर्ते फसवणूक करणाऱ्यांच्या क्लृप्त्यांना बळी पडले आहेत. परिणामी कष्टाने कमावलेला पैसा जागरूकता न बाळगण्याने गमावावा लागला आहे. दिवसेंदिवस सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ होताना दिसत आहे. डिजिटल जगात असे असंख्य मार्ग आहेत, ज्याद्वारे तुम्ही तुमची गोपनीय माहिती एखाद्या दुव्या (लिंक) द्वारे, किंवा कॉलद्वारे उघड केल्याने आर्थिक फसवणुकीला आमंत्रण देत असता. फसवणूक होण्यास दोन मुख्य घटक कारणीभूत आहेत, एक म्हणजेच फसवणूक करण्याची संधी आणि तुमच्या व्यवहारांवर पाळत ठेवण्याची कमतरता होय.

आर्थिक फसवणुकीत मुख्यत्वे खोटे दावे (बँकेतून बोलत आहोत), सत्य लपविणे (तुमची केवायसी असताना देखील केवायसी केलेले नाही म्हणून खाते बंद होईल), पोकळ आश्वासने (तुमच्या जुन्या एका पॉलिसीची मुदतपूर्ती झाली असून विमा कंपनीला तुम्हाला या पॉलिसीचे १० लाख द्यायचे आहेत यासाठी तुमची ओळख पटविणे अनिवार्य आहे.) यासारख्या फसव्या कृतींचा समावेश होतो.

फसवणूक करणारी व्यक्ती ज्याची फसवणूक करायची आहे, अशा व्यक्तीशी खालीलपैकी एक किंवा अनेक गोष्टी करतात.

* असत्य हे सत्य म्हणून सांगितले जाते ( वर उल्लेख केलेले दहा लाखांचे उदाहरण). ज्याची फसवणूक करायची त्याला फसवणूक करणाऱ्याच्या अस्तित्वाबद्दल शंकासुद्धा मनात येत नाही.
* पूर्तता न होणाऱ्या गोष्टी सत्य म्हणून सांगणे.
* इतर कोणत्याही फसव्या कृतीत गुंतविणे.
* कायद्याने विशेषतः फसवणूक म्हणून घोषित केलेली कोणतीही कृती न करणे.

फसवणुकीमुळे व्यक्ती आणि व्यवसायांना अनेक संधी गमावाव्या लागतात. तसेच फसवणुकीमुळे आर्थिक नुकसानाव्यतिरिक्त मानसिक आणि शारीरिक आघात होऊ शकतो. ज्या मार्गांनी या मंचाच्या वापरकर्त्यांची फसवणूक केली जाते त्या तंत्राबद्दल जाणून घेऊ.

**फिशिंग :** फिशिंग म्हणजे कोणत्याही प्रकारची संवेदनशील किंवा वैयक्तिक माहिती जसे की 'लॉगिन' साठी लगणारी माहिती (लॉगिन आयडी आणि पासवर्ड) बँक खात्याचा तपशील आणि क्रेडिट/डेबिट कार्डाचा तपशील किंवा अगदी वैयक्तिक ओळख पाटविण्यासाठी लागणारी माहिती (जसे की, तुमची जन्मतारीख, पॅन, आधार क्रमांक) फसव्या मार्गाने मिळवण्याचा प्रयत्न आहे.

**विशिंग :** व्हॉइस किंवा व्हीओआयपी फिशिंग म्हणजेच 'विशिंग' होय. ही एक इलेक्ट्रॉनिक फसवणूक युक्ती आहे, जी व्हॉईस ईमेल, व्हॉइस ओव्हर आयपी, लँडलाइन किंवा सेल्युलर टेलिफोनद्वारे केली जाते. 'विशिंग' हे 'फिशिंग' चे टेलिफोन स्वरूप आहे, जेथे फसवणूक करणारे वापरकर्त्याला फोन कॉलवर दुसरे कोणीतरी असल्याचे भासवून संवेदनशील माहिती आमिष दाखवून उघड करण्यास सांगतात. ही खासगी माहिती फसवणुकीसाठी केली जाते.

**स्मिशिंग:** 'एसएमएस फिशिंग', म्हणजेच 'स्मिशिंग'. यामध्ये वापरकर्त्याला ट्रोजन हॉर्स, व्हायरस किंवा इतर मालवेअर त्याच्या सेल्युलर फोन किंवा इतर मोबाइल डिव्हाइसवर डाउनलोड करण्यास भाग पाडून फसवले जाते. यात संवेदनशील माहिती उघड करण्यासाठी युक्ती वापरकर्त्याला 'एसएमएस' संदेशाच्या माध्यमातून पाठवलेले फसवे दुवे (लिंक) समाविष्ट असू शकतात.

आज आपण गणपत पाटील, (वय ६२) यांची फसवणूक कशी केली आणि त्यांना बँकेतून त्यांचे पैसे कसे परत मिळू शकले, हे जाणून घेण्याचा प्रयत्न करू. पाटील यांनी त्यांची मुदत ठेव वैद्यकीय कारणासाठी मुदतपूर्व बंद करून त्यांच्या बचत बँक खात्यात पैसे जमा करण्यासाठी बँकेशी संपर्क साधला. बँक अधिकाऱ्याने त्याला असे कळवले की, त्यांची मुदत ठेव आधीच बंद झाली असून खात्यात केवळ २०१ रुपये शिल्लक आहेत. पाटील यांना हे ऐकून धक्का बसला. कारण, त्यांनी याआधी बँकेशी मुदत ठेव बंद करण्याबाबत संपर्क केला नव्हता.

ते पूर्णपणे खचले आणि वारंवार बँकेकडे या बाबतीत पाठपुरावा केला. सतत पाठपुरावा करूनही त्यांना बँकेकडून समाधानकारक प्रतिसाद मिळाला नाही. अखेर त्यांनी बँकिंग लोकपालाकडे ऑनलाइन तक्रार दाखल केली.

बँकिंग लोकपालांनी केलेल्या चौकशीत या प्रकरणातील पुढील तथ्ये आढळून आली. पाटील यांनी सांगितले की, त्यांना एका व्यक्तीचा कॉल आला होता ज्यामध्ये असे म्हटले होते की, मी बँकेतून बोलतो आहे आणि केवायसी तपशील अद्ययावत करण्यासाठी आपल्याशी संपर्क केला आहे. तोतया बँक अधिकाऱ्याने पाटील यांना त्यांचा पॅन आणि जन्म तारीख विचारली. पाटील यांनी बँकेतून आला असल्याचा विश्वास ठेवून तपशील सांगितला. पाटील यांनी, त्यांच्या मोबाईल क्रमांकावर आलेला ओटीपी त्या तोतया बँक अधिकाऱ्याला व्यक्तीला दिला. फसवणूक करणाऱ्याने इंटरनेट बँकिंग सुविधा कार्यान्वित केल्याचे निदर्शनास आले आणि फोन केलेल्या तारखेला खात्याशी जोडलेला मोबाईल क्रमांक बदलला. असे केल्याने फोन करणाऱ्या व्यक्तीला खात्याच्या व्यवहाराचा तपशील जसे की ओटीपी आणि शिल्लक रक्कम त्याला त्याच्या अद्ययावत मोबाइल क्रमांकावर प्राप्त झाले. ३ ते ४ दिवसांनंतर फसवणूक करणाऱ्याने वैध ओटीपीसह इंटरनेट बँकिंगद्वारे खात्यात लॉगिन केले (जे नवीन मोबाइल क्रमांकावर वितरित केले गेले) आणि मुदत ठेव मुदतपूर्व बंद करून रक्कम पाटील यांच्या बचत बँक खात्यात जमा केली. यानंतर, फसवणूक करणाऱ्याने पाटील यांच्या बचत खात्यातून २०१ शिल्लक ठेवून उर्वरित रक्कम दुसऱ्या खात्यात हस्तांतरित केली.

**लोकपालाचा निर्णय काय?**

बँकेने बँकिंग लोकपालांना ग्राहकाचे वर्तन निष्काळजीपणाचे होते आणि त्याची वैयक्तिक माहिती फोन करणाऱ्याला सांगितल्याने झालेल्या नुकसानीसाठी तो स्वतःच जबाबदार आहे. यामुळे बँकेला दोषी धरण्यात येऊ नये हे समजाविण्यासाठी बँकेने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. पाटील यांची साक्ष नोंदविताना बँकिंग लोकपाल यांनी असे निरीक्षण नोंदविले की, खाते उघडण्याच्या वेळी ग्राहकाने इंटरनेट बँकिंग सुविधेचा पर्याय निवडला नव्हता. ग्राहकाने बँकेत येऊन मुदत ठेवीमध्ये पैसे गुंतविले होते. म्हणजे शाखेत फॉर्मवर स्वाक्षरी करून मुदत ठेव (एफडी) केली होती. या फसव्या व्यवहारांपूर्वी . ग्राहकाने कधीही इंटरनेट बँकिंग चॅनलद्वारे कोणताही व्यवहार केला नव्हता. वारंवार विचारणा करूनही बँकेने ग्राहकाच्या तक्रारीला प्रतिसाद दिला नाही. वरील तथ्ये लक्षात घेऊन लोकपालांनी बँकेला मुदतठेव पुनर्संचयित करण्याचा आदेश दिला.

हे 'फिशिंग' हल्ल्याचे प्रकरण होते, ज्यामध्ये फसवणूक करणारा स्वतःला बँक अधिकारी म्हणून दाखवून ग्राहकांचा विश्वास मिळवू शकतो आणि फसवणूक करण्यास यशस्वी होतो. 'फिशिंग' हल्ल्यांमध्ये, ग्राहक ई-मेलला बळी पडू शकतात आणि पैसे गमावू शकतात. फसवणुकीला बळी पडू नये म्हणून काय करायला हवे ?

खात्यातून केलेल्या व्यवहारांबद्दल त्वरित सूचना प्राप्त करण्यासाठी एसएमएस बँकिंग सुविधेचा पर्याय निवडा.

- तुमच्या मोबाईल / ईमेलवर नियमितपणे आलेले मेसेज वाचण्याची सवय लावा.
- तुम्ही फसव्या फोनला प्रतिसाद दिला नाहीत तर नक्कीच आकाश कोसळणार नाही. केवायसी तपशील अपडेट करण्यासाठी उपलब्ध पद्धती/पर्यायांची खात्री करण्यासाठी बँक शाखेशी चौकशी करा.
- कॉल/मेलवर प्रतिसाद देण्याची घाई करू नका. बँकांच्या टोल फ्री क्रमांकावर कॉल करून सत्यता पडताळू शकता.
- बँकेचा संपर्क क्रमांक / ग्राहक सेवा फोन नंबर तिच्या अधिकृत संकेतस्थळावर / स्रोतांद्वारे मिळवा.
- खाते लॉगिन संदर्भातील गोपनीय माहिती, कार्डसंबंधित माहिती, पिन, पासवर्ड, ओटीपी, जन्मतारीख, आधार क्रमांक कोणालाही देऊ नका. ओटीपी कोणालाही देऊ नका.
- ओटीपीच्या पावतीवरील संदेशातील मजकूर वाचा, जो खात्यातून केलेल्या व्यवहारासंबंधी माहिती मिळविण्यासाठी 'ट्रिगर' म्हणून कार्य करतो.
- केवायसी कागदपत्रे अज्ञात किंवा अनोळखी व्यक्तीला देऊ नका.
- शंका असल्यास, केवळ त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रदान केलेली संपर्क माहिती वापरून व्यक्ती किंवा संस्थेशी (ईमेलमध्ये दावा केल्याप्रमाणे) संपर्क साधा.
- अनपेक्षित ईमेलद्वारे सूचित केल्यावर कोणतीही वैयक्तिक, लॉगिन किंवा आर्थिक माहिती प्रविष्ट करू नका.
- बँकेच्या वेबसाइट / बँकेच्या मोबाईल बँकिंग अनुप्रयोगांना भेट द्या आणि सूचना काळजीपूर्वक वाचा.

अत्यंत सावधगिरी बाळगूनही तुम्ही अजाणतेपणी किंवा जाणतेपणी अशा कृत्यांना बळी पडल्यास, कृपया खालीलप्रमाणे कृती करा;

- अशा घटनेची तत्काळ बँकेला तक्रार करा. शिवाय डिजिटल मंचावर कोणत्याही प्रकारचे व्यवहार करताना अत्यंत काळजी घ्या आणि स्वतःच्या संपत्तीचे रक्षण करा.

साभार : दैनिक लोकसत्ता

# कर्ज काढण्याआधी तपासा या ५ गोष्टी

आर्थिक अडचणीत अनेकजण कर्जाचा पर्याय निवडतात. झटपट कर्ज देणाऱ्या बँका किंवा खाजगी वित्तीय संस्थांना संपर्क करतात. कालांतराने लक्षात येते की, तुमची फसगत झाली आहे. तुम्हाला अधिक रक्कम दीर्घकाळ भरावी लागणार आहे. नीट माहिती न घेता घाईघाईत कर्ज काढल्याने मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे कर्ज काढण्याआधी या ५ गोष्टींची शहानिशा करून घेतली पाहिजे.

**१) आपल्या आर्थिक स्थितीचा अंदाज घ्या :-** मासिक मिळकत किती आहे. घरखर्च आणि इतर गोष्टींसाठी किती पैसे लागतात, अचानक संकट आल्यास जवळ किती पैसे खिशात असले पाहिजेत. आदी गोष्टींची आधी पडताळणी करा. मगच किती कर्ज काढायचे, हे निश्चित करा.

**२) कर्जाची मुदत लहान असू द्या :-** दीर्घमुदत कर्जात व्याजापोटी अधिक नुकसान होते. १० वर्षे मुदतीसाठी ९.७५% व्याजदराने कर्जाच्या रकमेच्या ५७% इतके व्याजच द्यावे लागते. १५ वर्षांच्या अवधीसाठी हीच रक्कम ९१% तर २० वर्षांसाठी १२८% इतकी होते.

**३) 'ईएमआय' मुळे ताण वाढता कामा नये :-** ● मासिक हप्त्यामुळे इतर खर्चाचे नियोजन बिघडता कामा नये किंवा त्यावर ताण पडता कामा नये, याची काळजी घ्या. ● घर किंवा कार खरेदीसाठी मोठे कर्ज काढले तरी ईएमआय मासिक मिळकतीच्या १५% पेक्षा अधिक नसावा, याची काळजी घ्या.

**४) स्वाक्षरी करण्यापूर्वी नियम, अटी वाचा :-** कर्ज करारावर स्वाक्षरी करावी लागते. त्यात नियम, अटी, शर्ती, व्याजदर, लागणारा दंड, मुदतपूर्व परतफेडीचे नियम आदी माहिती दिलेली असते. काही माहिती क्लिष्ट स्वरूपात असू शकते. यातील काही बाबी समजल्या नसतील तर विचारून घ्या. ही माहिती नीट वाचून घ्या.

**५) कर्जाचा विमा काढण्यास विसरू नका :-** अचानक झालेला अपघात किंवा कर्ज काढणाऱ्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास कुटुंबावर ताण येऊ शकतो. त्यामुळे कर्ज काढताना त्याचा विमाही काढा. संकटकाळात कर्जाची फेड विमा कंपनी करते.

साभार : दैनिक लोकमत

---

# वर्षभरात किती वेळा बँक स्टेटमेंट तपासावे?

बँक स्टेटमेंट म्हणजे आपल्या खात्यात ठराविक कालावधीत झालेल्या व्यवहारांची नोंद. त्यात व्यवहारांचे थोडक्यात वर्णन असते. बँक स्टेटमेंटमध्ये ठेवी, शुल्क, पैसे काढणे आणि एखाद्या कालावधीची सुरूवात आणि शेवटची शिल्लक याची माहिती असते हे स्टेटमेंट तपासण्याचेही काही फायदेही आहेत. तरी वर्षातून किती वेळा बँक स्टेटमेंट तपासायचे असा प्रश्न पडतो.

बहुतांश बँक ग्राहकांना या प्रश्नाचे उत्तर माहिती नाही. सामान्यतः ग्राहक बँक स्टेटमेंट तेव्हाच तपासतात, जेव्हा त्यांना ते कुठे तरी द्यायचे असते. पण ही सवय चुकीची आहे. आपण दरमहा आपले खाते स्टेटमेंट तपासले पाहिजे. या लेखाच्या माध्यमातून नियमित अंतराने बँक स्टेटमेंट तपासण्याचे काय फायदे आहेत ते पाहू या...

**बँकांनी कापलेले शुल्क समजते**

आपल्याला माहिती नसलेल्या विविध व्यवहारांवर बँका ठराविक रक्कम आकारू शकतात. उदाहरणार्थ काही बँका खात्याचा तपशील, डुप्लिकेट पासबुक जारी करणे, वार्षिक डेबिट कार्ड इत्यादींवर काही रक्कम कापली जाते. बँकेने विनाकारण कोणतेही शुल्क कापले असेल. तर त्याची माहिती तुम्हाला बँक स्टेटमेंटमध्ये मिळेल.

**फसवणूक किंवा घोटाळ्याची माहिती कळते**

हल्ली सर्रास बँक घोटाळे होतात. बँका तुम्हाला प्रत्येक व्यवहाराची माहिती एसएमएसद्वारे देतात. परंतु अनेकवेळा मेसेज येत नाहीत. अशावेळी तुमच्या बँक खात्यातून रक्कम गहाळ झाली असेल तर त्याची माहिती बँक स्टेटमेंटवरूनच कळते. तुमची फसवणूक झाली असेल तर बँकखात्याचे स्टेटमेंट पुरावा म्हणून वापरता येऊ शकते.

**गुंतवणुकीसाठी मदत होण्याची शक्यता**

दर महिन्याला बँक खाते तपासल्यास प्रत्येक खात्यातील शिलकीच्या रकमेचा आढावा घेता येऊ शकतो ही शिल्लक रक्कम अन्यत्र गुंतवून तुम्ही अतिरिक्त उत्पन्नही मिळवू शकता.

**खर्चाचा मागोवा घेता येतो**

बँकेचे स्टेटमेंट पाहिल्यामुळे विनाकारण खर्च नियंत्रित करणे शक्य होते. उदाहरणार्थ रेस्टॉरंटची बिले, ऑनलाईन शॉपिंग इत्यादी सहजपणे आपल्या बँक स्टेटमेंटवरील खर्च दर्शवू शकतात. त्याद्वारे खर्चाचा मागोवा घेणे शक्य होते.

साभार : दैनिक महाराष्ट्र टाईम्स

# 'टीडीएस' साठी ई-प्रमाणपत्र

काही करदात्यांचे उत्पन्न करपात्र अधिक मर्यादिपेक्षा नसताना आणि सार्वजनिक न्यासासारख्या करदात्यांचे बहुतांश उत्पन्न करमुक्त असताना प्राप्तिकर कायद्यातील उद्गम करकपातीच्या (टीडीएस) तरतुदीनुसार त्यांच्या उत्पन्नातून सक्तीची .. करकपात केली जाते. अनिवासी नागरिकांच्या बाबतीत त्यांचे सर्व मुख्य उत्पन्न परदेशातून मिळालेले असतानाही भारतात मिळालेल्या उत्पन्नातून करकपात करावी लागते. त्यामुळे - अशा करदात्यांना प्राप्तिकर विभागाकडून - कापला गेलेला कर परत मिळविण्यासाठी वर्षभर थांबून प्राप्तिकर विवरणपत्र दाखल करून तो मिळवावा लागतो. यात विलंबदेखील होण्याची शक्यता असते. याखेरीज ज्यांचे उत्पन्न करपात्र नाही, अशा करदात्यांकडून एक तर प्राप्तिकर जमा करणे योग्य नसताना जमा केला जातो. काहींचे उत्पन्न निम्न करदरात करपात्र असताना त्यांच्याकडून अधिक कर वसूल होणे योग्य नाही म्हणून अशा करदात्यांना न्याय देण्यासाठी कमी किंवा शून्य दराने करकपात करण्याची परवानगी देणारे 'प्रमाणपत्र' प्राप्तिकर विभागामार्फत जारी करण्याची तरतूद कायद्यांतर्गत उपलब्ध आहे. पगार, मुदत ठेवींवरील व्याज, लाभांश, रोख्यांवरील व्याज, घरभाडे, व्यावसायिक किंवा तांत्रिक सेवांसाठीचे शुल्क, स्थावर मालमत्तेचे अनिवार्य संपादन केल्यावर दिलेली नुकसानभरपाईची रक्कम यासारख्या उत्पन्नाबाबत हे प्रमाणपत्र मिळू शकते.

**पारदर्शक ई-प्रक्रिया**

पूर्वी प्रत्यक्ष संपर्काने होणारी ही प्रक्रिया तेवढी पारदर्शक नव्हती व करदात्यांना असे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी प्राप्तिकर विभागाचे खेटे मारावे लागत होते. तथापि, आता या करदात्यांच्या या मागणीच्या सुलभतेसाठी प्राप्तिकर विभागाने ई-प्रक्रिया अंतिम केली असून, ती पूर्णतः कार्यान्वितही झाली आहे. त्यामुळे आता करदाते कमी किंवा शून्य 'टीडीएस'साठी (उद्गम करकपात) पात्र असल्यास, हे प्रमाणपत्र मिळवू शकतात.

**कधी निघणार अर्ज निकाली ?**

प्राप्तिकर विभागाला, ज्या महिन्यात सर्व बाबतीत पूर्ण असलेला अर्ज प्राप्त झाला आहे, त्या महिन्याच्या अखेरीपासून ३० दिवसांच्या आत मूल्यांकन अधिकाऱ्याने १९७ अंतर्गत अर्ज निकाली काढणे बंधनकारक आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ करिता असे प्रमाणपत्र करदात्यास आवश्यक असेल, तर १५ मार्च २०२४ पूर्वी अर्ज करावा, असे आवाहन प्राप्तिकर विभागाने केले आहे. नंतर अर्ज दाखल झाल्यास प्रमाणपत्राच्या तारखेनंतरचेच प्रमाणपत्र मिळू शकेल पूर्ण वर्षाचे नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

**प्रक्रियेसाठी आवश्यक कागदपत्रे**

प्राप्तिकर अधिकारी करदात्याच्या अंदाजे उत्पन्नावर असणारा देय कराची पडताळणी करतील, याखेरीज मागील तीन वर्षांचा देय कर, विद्यमान दायित्व व आगाऊ करभरणा या निकषांवर आधारित विद्यमान व अंदाजित करदायित्व निश्चित करतील. करदात्याला मागील चार वर्षांतील प्राप्तिका विवरणपत्र भरण्याची अट आहे. या सर्वांच्या आधारे मूल्यांकन अधिकारी प्रमाणपत्र जारी करायचे की नाही हे ठरवू शकतात. प्रमाणपत्र जारी करायचे असेल, तर ते विशिष्ट कालावधीसाठीच असते. या सुविधेचा करदात्यांनी जरूर लाभ घ्यावा.

**प्रमाणपत्र मिळविण्यासाठी..**

प्राप्तिकर संचालनालयाच्या अधिसूचचेनुसार प्रथम करदात्याला 'ट्रेसेस' (www.tdscpc.gov.in) वर 'पॅन' सह नोंदणी करणे आवश्यक आहे. लॉग-इन केल्यानंतर, कलम १९७ अंतर्गत शून्य किंवा कमी 'टीडीएस' प्रमाणपत्र मिळविण्यासाठी फॉर्म १३ पूर्ण भरून व डिजिटलसह सहीचा वापर करून तो दाखल करणे आवश्यक आहे. त्यासाठी पुढील प्रक्रिया करणे आवश्यक आहे.

१) ट्रेसेसमध्ये लॉग इन करा आणि स्टेटमेंटस्/फॉर्म टॅब अंतर्गत फॉर्म १३ साठी विनंती निवडा

२) फॉर्म १३ मध्ये मागितलेली सर्व माहिती योग्य तपशील भरा.

३) योग्य कागदपत्रे अपलोड करून डिजिटल स्वाक्षरी किंवा ईव्हीसी वापरून फॉर्म दाखल करा.

४) पुढील प्रक्रिया स्वयंचलित असेल. करकपात न करणाऱ्याची वा कमी दराने करण्याची परवानगी देणारे 'प्रमाणपत्र' जे व्यक्ती करकपात करीत आहे, तिला परस्पर विभागामार्फत दिले जाईल.




साभार : दैनिक सकाळ

# ज्येष्ठांनी कर कसा वाचवावा?

वार्षिक व्याज देणारी मुदत ठेवी असो किंवा तिमाही, अर्धवार्षिक तत्त्वावर व्याज देणारी मुदत ठेवीचा प्रकार असो, यावर प्रत्येक आर्थिक वर्षात मिळणाऱ्या व्याजावर कर भरावाच लागतो. हा कर गुंतवणूकदारांच्या कराच्या स्लॅबनुसार आकारला जातो.

कर बचत मुदत ठेवीतून ज्येष्ठ नागरिक कर सवलत मिळवू शकतात. ज्येष्ठांनी कर बचतीसाठी कर बचत योजनेत किती पैसे ठेवावेत, हे जाणून घेऊ.

कर बचत ठेवी आपल्याला प्राप्तिकर अधिनियम १९६१ च्या कलम ८०सी नुसार दीड लाखापर्यंत कर वाचविण्यास मदत करते. या ठेवीवर मिळणारे व्याज हे करपात्र असते. अर्थात आपण ज्येष्ठ नागरिक असाल तर काही सवलतीमुळे कर बचत ठेवीच्या माध्यमातून करमुक्त परतावा मिळवण्याचा एक मार्ग आहे. हे तंत्र कसे काम करते आणि संपूर्णपणे करमुक्त परतावा मिळवण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांनी किती गुंतवणूक करायला हवी, हे जाणून घेऊ. दरमहा व्याज देणारी किंवा वार्षिक व्याज देणारी मुदत ठेव असणारी योजना असली तरी आपल्याला प्रत्येक आर्थिक वर्षात मिळणाऱ्या व्याजावर कर भरावा लागतो. ज्येष्ठ नागरिकांना दिलेल्या काही सवलती वगळता हे व्याज गुंतवणूकदारांच्या टॅक्स स्लॅबनुसार करपात्र असते.

### ज्येष्ठांच्या ठेवीवरील कर कपातीचे नियम

ज्येष्ठ नागरिक किंवा ६० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वयोगटातील लोकांना प्राप्तिकर कायदा ८०सी नुसार दीड लाखापर्यंत कर बचत करण्याची सवलत आहे. शिवाय ते प्रत्येक आर्थिक वर्षात अतिरिक्त ५० हजारांपर्यंत कर कपातीचा दावा करू शकतात. प्राप्तिकर अधिनियम १९६१ च्या कलम ८० टीटीबी नुसार एकूण उत्पन्नाच्यामध्ये हा अतिरीक्त बचत देणारा कायदा आहे. हा कायदा कर बचत मुदत ठेवीवर मिळणाऱ्या व्याजांवर लागू होतो. लक्षात ठेवा, प्रत्येक आर्थिक वर्षात ५० हजारांची मर्यादा ही बँकेत जमा असलेली रक्कम म्हणजे बचत खाते असो किंवा मुदत ठेवी असो, पोस्टातील बचत योजना किंवा बँकिंग व्यवसायात असलेल्या सहकारी बँक असो तेथील ठेवींवर मिळणाऱ्या व्याजावर हा नियम लागू होतो. म्हणजे को-ऑपरेटिव्ह सोसायटी बँक, सहकारी बँक भूमीविकास बँक आदी. कलम ८० टीटीबी पासून कमाल फायदा मिळवण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांनी अशी गुंतवणूक करावी की त्यातून मिळणारे व्याज हे ५० हजारांपेक्षा कमीच राहील किंवा आसपास राहील. अर्थात, बहुतांश ज्येष्ठांचे जीवन हे प्रामुख्याने व्याजावर मिळणाऱ्या पैशावर अवलंबून असते. त्यामुळे ५० हजारांची मर्यादा ही पुरेशी राहू शकत नाही.

### किती गुंतवणूक हवी?

कर बचतीचा फायदा घेण्यासाठी आपण केवळ दीड लाखापर्यंतच गुंतवणूक करू शकता; पण सर्व पैसा एकाच ठिकाणी गुंतवण्यापेक्षा त्याची विभागणी करा आणि दरवर्षी टप्प्याटप्प्याने कर बचत योजनेत गुंतवणूक करा जेणेकरून पूर्णपणे करसवलत मिळेल. हे तंत्र कसे काम करेल, हे जाणून घेऊ! सर्व कर बचत मुदत ठेवीचा कालावधी हा पाच वर्षे निश्चित असतो. आपण दरवर्षी कर बचत मुदत ठेव खरेदी केली, तर त्याची मॅच्युरिटी दरवर्षी एक वर्षाने पुढे जाईल. सध्याच्या काळात अनेक नामांकित बँका ज्येष्ठ नागरिकांसाठी कर बचत मुदत ठेवीवर ७ ते ७.७५ टक्के व्याज देत आहेत. यानुसार ८० टीटीबीनुसार ५० हजारांची वार्षिक सवलतीची मर्यादा ओलांडली जाणार नाही, अशारितीने पाच वर्षांसाठी गुंतवणूक योजना आखावी लागेल. हे गणित समजून घेण्यासाठी आगामी काळात ७ टक्के व्याज मिळत राहील आणि हाच दर पुढेही सुरूच राहील असे आपण गृहीत धरले आहे.

उदा. ज्येष्ठ नागरिक कर बचत मुदत ठेवीवर ७ टक्के व्याजदर दिले जात आहे. याप्रमाणे १ लाख २० हजार ५४६ रुपये गुंतवले असतील, तर त्यावर तिमाहीच्या आधारावर व्याज आकारणी होते. पहिल्या वर्षाच्या अखेरीस त्यावर ८,६६२ रुपये व्याज मिळेल. ही मर्यादा ५० हजारांच्या आत आहे. त्यामुळे त्यावर कोणताही कर भरावा लागणार नाही. शिवाय बँक या स्त्रोतावर कर कपात (टीडीएस) करणार नाही. कारण ही रक्कम टीडीएसच्या आत आहे (ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवरील व्याज एका आर्थिक वर्षात ५० हजारांपेक्षा कमी असेल तर टीडीएस आकारला जात नाही) दुसऱ्या वर्षी १,२९,२०९ रुपयांना (पहिल्या वर्षाचे व्याज आणि मूळ रक्कम) पुन्हा मुदत ठेवीत गुंतवले जाईल. आता दुसऱ्या वर्षी त्याच रकमेवर ७ टक्के दराने व्याज आकारणी होत असेल तर त्याला १७,९४७ रुपये व्याज मिळेल. यानुसार गुंतवणूकदार कलम ८० टीटीबी नुसार प्राप्तिकर कपातीसाठी दावा करू शकतो. त्यावर टीडीएसही आकारला जाणार नाही.

साभार : दैनिक पुढारी

# कार्ड स्वाईप करताय; सावधान !

सायबर गुन्हेगारांकडून विविध प्रकारे ऑनलाईन आर्थिक फसवणूकीचा प्रकार सुरूच आहे; मात्र डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड स्वाईप करताना खबरदारी घेणे तितकेच गरजेचे आहे. अन्यथा फसवणूकीलाही सामोरे जावे लागू शकते. शॉपिंग मॉल, पेट्रोल पंप, मेडिकल अशा वेगवेगळ्या ठिकाणी पॉईंट ऑफ सेल (पीओएस) यंत्राद्वारे डेबिट, क्रेडिट कार्डचा वापर करताना अधिक काळजी घेणे आवश्यक आहे.

**डेबिट/कार्ड म्हणजे काय ?**

**डेबिट कार्ड :–** डेबिट कार्डद्वारे त्याच्या बँक खात्यात उपलब्ध रकमेतून पैसे खर्च करण्याची परवानगी बँकेकडून दिली जाते. यासाठी एक विशिष्ट गोपनीय (पिन) क्रमांक दिलेला असतो. त्याचा वापर केल्याशिवाय कुठलाही आर्थिक व्यवहार पूर्ण होत नाही.

**क्रेडिट कार्ड :–** एखाद्या फायनान्स कंपनी अथवा संस्थेकडून क्रेडिट कार्ड दिलेले असते. विविध उत्पादने व वस्तू खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य ती संस्था या कार्डाच्या माध्यमातून करत असते.

**सीव्हीव्ही क्रमांक जपून वापरावा :–** डेबिट कार्ड किंवा क्रेडिट पाठीमागील बाजूस असलेला तीन अंकी क्रमांक हा त्या कार्डाचा सीव्हीव्ही क्रमांक असतो. ऑनलाईन खरेदी करताना या क्रमांकाचा वापर केल्याशिवाय आर्थिक व्यवहार पूर्ण होत नाही. त्यावेळी हा क्रमांक टाकणे अनिवार्य असते. यामुळे ज्या ऑनलाईन संकेतस्थळाद्वारे आपण खरेदी करत आहोत ते संकेतस्थळ अधिकृत असल्याची खात्री अगोदर करायला हवी.

**फसवणूक झाल्यास या क्रमांकावर कॉल करा :–** ऑनलाईन फसवणूक केली तर त्याची माहिती तातडीने जवळच्या सायबर पोलीस ठाण्याला द्यावी. त्यासाठी १९३० हा हेल्पलाईन क्रमांक किंवा शहर सायबर पोलिसांच्या ०२५३-२३०५२२६ या क्रमांकावर संपर्क साधावा. ऑनलाईन कार्डचा वापर करत खरेदी करताना किंवा कुठल्याही ऑनलाईन व्यवहार करताना फसवणूक झाल्यास या क्रमांकावर संपर्क साधून मदत मिळवावी. तत्पूर्वी आपल्या संबंधित बँकेच्या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधून माहिती द्यावी.

**अशी घ्यावी खबरदारी :–** ● तुमचा पिन क्रमांक लक्षात ठेवा, तो कोणालाही कोणत्याही स्वरूपात शेअर करू नका.

● कार्ड हरवले किंवा चोरी झाले, तर त्याची माहिती तत्काळ बँकेला कळवावी.

● व्यवहार करताना कार्डवर लक्ष ठेवा, कार्डची अदलाबदल होण्याचा व क्लोन करण्याचा धोका संभवतो.

● संशयास्पद ठिकाणी डेबिट, क्रेडिट कार्ड स्वाईप करणे टाळावे.

● ऑनलाईन व्यवहारात डेबिट कार्ड क्रमांक अथवा सीव्हीव्ही क्रमांक ही गोपनीय माहिती वेबसाईटवर सेव्ह करणे टाळा.

● एकदा तुम्ही तुमचे ऑनलाईन बँकिंग व्यवहार पूर्ण केल्यावर 'लॉग ऑफ' पर्याय निवडावा.

साभार : दैनिक लोकमत



# एटीएमद्वारे पैसे काढताय? होऊ शकते तुमची फसवणूक

## सावधान : डेबिट कार्डाची अदलाबदल करून घातला जातो गंडा

ऑनलाईन डिजिटल पेमेंटस् ॲप्लिकेशनचा अलीकडे वापर जरी वाढलेला असला तरी अद्यापही विविध बँकांच्या एटीएम केंद्रात जाऊन डेबिट कार्डाद्वारे पैसे काढणाऱ्यांचे प्रमाण फारसे काही कमी झालेले नाही. यामुळे एटीएम केंद्रांमध्ये काही भामट्यांकडून फसवणुकीचे प्रकार केले जात आहेत. एटीएममधून पैसे काढणाऱ्यांची दिशाभूल करत रक्कम पळविली जाते. एटीएम केंद्रांची आवश्यकता अजूनही लोकांना भासते कारण खिशात काही प्रमाणात रोख रक्कम ठेवण्यास प्रत्येक जण प्राधान्य देतो. यामुळे एटीएम केंद्रात फसवणुकीचे प्रकार अजूनही थांबलेले नाहीत. काही भामट्यांकडून वृद्ध आजी-आजोबा यांना हेरून त्यांची दिशाभूल करत डेबिट कार्डाची अदलाबदल करून गोपनीय क्रमांक जाणून घेत रक्कम परस्पर लांबविण्याचे प्रकार घडतात.

फसवणुकीच्या तक्रारी अधूनमधून येतात...

नाशिक शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत एटीएम केंद्रात फसवणूक झाल्याच्या तक्रारी अधूनमधून वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांकडे प्राप्त होत असतात. काही दिवसांपूर्वी नाशिकरोड भागात एका एटीएम केंद्रात यंत्रामध्ये कार्ड अडकल्यामुळे आजोबांना मदत करण्याचा बहाणा करत भामट्यांनी जुने दुसरे कार्ड हाती देत त्यांचे अस्सल कार्ड लांबवले होते. त्या कार्डाचा वापर करत २० हजार रुपये भामट्यांनी लांबविल्याची तक्रार नाशिकरोड पोलीस ठाण्यात प्राप्त झाली होती.




**अशी होऊ शकते फसवणूक :-**

**१) एटीएममध्ये पैसे अडकत आहेत**

एटीएम केंद्रात काही भामटे ग्राहक बनून प्रवेश करतात. यावेळी त्यांच्या हालचालींकडे बारकाईने लक्ष द्यायला हवे. त्यांच्याकडे काही बनावट डेबिट कार्डदेखील असतात. एटीएम यंत्र खराब आहे किंवा त्यामध्ये पैसे अडकून जात असल्याचे कारणे देत ते दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. मुळात यंत्रात पैसे वगैरे अडकत नाही, तर ते पुन्हा बँक खात्यावर जमा होतात, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

**२) कॅश बाहेर येते तेथे पट्टी तर लावलेली नाही ना?**

एटीएम यंत्रामधून ज्या ठिकाणाहून नोटा बाहेर येतात त्या ठिकाणी काही भामट्यांकडून अगोदरच नजर चुकवून एक काळी पट्टीदेखील लावली जाते. यामुळे नोटा बाहेर अर्धवट येतात पण त्या दिसत नाही, आणि लोकांना वाटते की नोटा आल्याच नाही; मात्र त्या आलेल्या असतात. पट्टीमुळे त्या लक्षात येत नाही.

**अशी घ्या काळजी**

- एटीएम केंद्रात फसवणूक टाळण्यासाठी काळजीपूर्वक हाताळणी गरजेची आहे.
- आपल्या डेबिट कार्डाचा पासवर्ड कोणालाही सांगू नये.
- एटीएममध्ये आपल्याशिवाय दुसरा कोणी व्यक्ती नाही ना याची खात्री बाळगा.
- पैसे काढतांना तेथे कुठल्याही अनोळखी व्यक्तीची मदत घेणे टाळा.
- तांत्रिक अडचणी भासल्यास बँकेने नेमलेल्या सुरक्षा रक्षकाची मदत घ्यावी.

साभार : दैनिक लोकमत

# 'लोन ॲप्स' पासून सावध रहा

## ॲप्सचा वापर करून केली जाऊ शकते फसवणूक

स्मार्टफोन वापरणाऱ्या प्रत्येकाला दररोज कर्ज देणाऱ्या ॲप्सकडून मेसेज केले जातात किंवा फोन तरी केला जातो. मात्र कोणत्याही कागदपत्रांशिवाय स्वस्तात कर्ज देऱ्याचं आमिष दाखवणाऱ्या या ॲप्सपासून सावध रहाणे गरजेचे आहे.

सध्या किरकोळ रकमेचे ऑनलाईन कर्ज देणाऱ्या जाहिराती जवळपास सर्वच सोशल मिडियावर येत आहेत. गरजू लोकांना कर्ज देणारे अनेक ॲप्स आता प्ले स्टोअरवर आहेत. हे ॲप्स गरजूंना फक्त आधार कार्डवर किंवा फक्त पॅनकार्डवर कर्ज, विना हमीदार कर्ज देतात. कर्ज देण्याची रक्कम काही हजारांपासून ते लाखो रुपयांपर्यंत असू शकते. एकीकडे कर्ज देण्यासाठी बँका भरपूर कागदपत्रे मागतात. त्यानंतर त्या कागदपत्रांची पडताळणी करतात. या प्रक्रियेत बराच वेळ आणि पैसा खर्च होतो. मात्र दुसरीकडे या ॲप्सकडून तुलनेने कमी त्रासात कर्ज मिळते. कारण यात फक्त ज्याला कर्ज हवे आहे त्याच्या बँकेचे तपशील आणि आधार कार्ड, पॅन कार्ड मागितले जाते. ही कागदपत्रे दिल्यानंतर काही मिनिटांतच कर्जाची रक्कम कर्जदाराच्या बँक खात्यात जमा होते. हे सर्व जितके सोपे आणि सहज दिसते तितकाच त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर धोका असतो. कारण इथूनच ग्राहकांच्या फसवणूकीला खरी सुरूवात झालेली असते. असे कर्ज समाजात कर्जदाराची अतोनात बदनामी तर करतेच, प्रसंगी कर्जदाराच्या आयुष्याशी खेळदेखील ठरू शकते. झटपट आणि विनासायास कर्ज मिळण्याच्या या जाळ्यात तरूणाई मोठ्या प्रमाणात अडकते आहे.

**ॲप्सचा वापर करून अशी केली जाऊ शकते फसवणूक :**

- हे लोन ॲप्स डाऊनलोड केल्यानंतर काही परवानग्या वापरकर्त्यांकडून मागितल्या जातात आणि वापरकर्ते कुठल्याही गोष्टींची शहानिशा न करता मागितलेल्या सर्व परवानग्या ॲप्सला पुरवतात. मग या ॲप्सद्वारे कॉन्टॅक्ट लिस्टसोबत फोटो, व्हिडीओ आणि लोकेशन्सवर नजर ठेवली जाते. तसेच तुम्ही वापरलेला पैसा, केलेले व्यवहार अशा सर्व गोष्टींवरदेखील नजर ठेवली जाते.
- पाच हजार रुपयांचं कर्ज घेतलं तर प्रोसेसिंग फीस आणि इतर चार्ज लावत या कंपन्या कर्जदाराच्या हातात केवळ अडीच हजार रुपये टेकवतात. मात्र परतफेड करतेवेळी कर्जदाराला सात दिवसांत पाच हजार रुपये द्यावे लागतात.
- सात दिवसांत घेतलेले कर्ज फेडायचे असते, परंतु पाचव्या किंवा सहाव्या दिवसापासूनच ॲप्सकडून पैसे मागण्यासाठी तगादा लावला जातो.
- परतफेडीच्या ठरलेल्या मुदतीपेक्षा उशीर झाला तर प्रत्येक दिवसाच्या दंडाची रक्कम खूप मोठी असते. त्यामुळे कर्जदार जी रक्कम कर्ज म्हणून घेतो त्या रकमेपेक्षा व्याजाचा एक हप्ता मोठा असतो आणि कर्जदाराने संपूर्ण पैसे परत केले तरीदेखील ते पैसे मागत असतात. पुढे ते कर्जदाराच्या मोबाईलमधून कर्जदाराच्या जवळच्या नातेवाईकांचा मोबाईल नंतर घेऊन त्यांना कर्जदाराचे मॉर्फ केलेले अश्लील फोटो पाठवून कर्जदाराची बदनामी करतात.
- हे ॲप्स डाऊनलोड करताना कर्जदाराकडून कॉन्टॅन्ट आणि मेसेंजरची परवानगी मागितली जाते. त्यामुळे हे ॲप्स कर्जदाराची सगळी कॉन्टॅक्ट लिस्ट चोरी करतात.
- वसुलीच्या वेळी कर्जदाराचे फोन कॉलला प्रतिसाद दिला नाही तर कर्जदाराच्या कॉन्टॅक्ट लिस्टमधील प्रत्येकाला कर्जदार फ्रॉड असल्याचा मेसेज जातो. वसुलीसाठी शिवीगाळ आणि धमकीदेखील दिली जाते.
- हे ॲप्स वापरकर्त्यांचा पर्सनल डेटा चोरून तो विकून भरपूर पैसा कमावतात. अनेक कर्जदारांवर धमक्यांच्या फोनला, बदनामीला कंटाळून आत्महत्या करण्याची वेळ येते.

**काय काळजी घ्यावी ?**

- अनोळखी ॲप्स डाऊनलोड करू नका.
- डाऊनलोड केलेल्या अनोळखी ॲप्सना तुमच्या मोबाईलच्या कॉन्टॅक्ट लिस्टचा तसेच फोन गॅलरीचा ॲक्सेस देऊ नका.
- धमक्या आल्यास घाबरून न जाता सायबर पोलिसांकडे तक्रार नोंदवा.

साभार : दैनिक दिव्य मराठी

# महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँक्स् परिषद २०२३-२४ सहकार परिषद वृत्तांत

**(शनिवार, २७ व रविवार २८ जानेवारी २०२४)**

प्रधानमंत्री मा.ना. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली व केंद्रीय सहकार मंत्री मा. ना. अमित शाह यांच्या मार्गदर्शनानुसार देशात सहकार क्षेत्राच्या माध्यमातून विकास घडवून आणण्यासाठी अनेक सकारात्मक पावले उचलण्यात आली आहेत. या नुसारच महाराष्ट्र राज्यातील सहकार क्षेत्राच्या विकासासाठी केंद्र सरकार आवश्यक ते सर्व सहकार्य करणार आहे, असे प्रतिपादन केंद्रीय सहकार राज्यमंत्री मा.ना.बी.एल. वर्मा यांनी केले.

दि नाशिक जिल्हा नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन नाशिक आयोजित दादासाहेब गायकवाड सभागृह, नाशिक येथे दोन दिवसीय महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँक परिषद २०२३-२४ चे आयोजन करण्यात आले होते.

सहकार परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मा.ना.बी.एल. वर्मा बोलत होते. यावेळी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण तथा आदिवासी विभाग राज्यमंत्री व सहकार परिषदेच्या स्वागताध्यक्षा मा.ना.डॉ. भारती पवार, राज्याचे सहकार मंत्री मा.ना. दिलीप वळसे-पाटील, राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री तथा पालकमंत्री मा.ना. दादाजी भुसे, खासदार मा.श्री.हेमंत गोडसे, महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त व निबंधक मा.श्री. अनिल कवडे, एनसीयुआय, नवी दिल्ली या संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. दिलीप संघाणी, नॅफकब, नवी दिल्ली या संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. ज्योतिंद्र मेहता सहकार परिषदेचे अध्यक्ष व निमंत्रक मा.श्री. विश्वास ठाकूर यांच्यासह राज्यातील विविध नागरी सहकारी बँकांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, मुख्य कार्य. अधिकारी, सरव्यवस्थापक वरिष्ठ पदाधिकारी असे २ हजारांहून अधिक प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

केंद्रीय राज्यमंत्री मा.ना. बी.एल. वर्मा म्हणाले की, सहकारातून समृद्धी घडवून आणण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने स्वतंत्र सहकार विभागाची निर्मिती करण्यात आली आहे. या विभागाच्या माध्यमातून सामान्य जनतेला आर्थिक आधार मिळण्यासाठी मदत होत आहे. राज्यात सहकार विभागाला येणाऱ्या अडचणी समजून घेऊन त्यावर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकार नेहमीच प्रयत्नशील राहणार आहे.

आज सहकार क्षेत्र आपल्या अपेक्षेच्या पलीकडे विकासात्मक वाटचाल करत आहे. कोट्यवधी शेतकरी, वंचित, मागास, दलित, गरीब आणि उपेक्षित माता-भगिनींच्या विकासाचा मार्ग मोकळा करण्याचे काम करत आहे. त्याद्वारे माननीय पंतप्रधान यांच्या स्वप्नातील सर्वांचे स्वप्न पूर्ण होत आहे. 'सबका साथ-सबका विकास-सबका विश्वास' प्रत्येकाच्या प्रयत्नातून हे ध्येय साध्य केले जाऊ शकते.

माननीय पंतप्रधान मा.ना. नरेंद्रजी मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आदरणीय सहकार मंत्री मा.ना. अमितभाई शाह यांच्या दूरदृष्टी आणि अथक परिश्रमाने सहकारी बँकांना त्यांच्या व्यवसायात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी आणि सुलभतेला चालना देण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. सहकाराच्या तत्त्वांनुसार काम करणाऱ्या नागरी सहकारी बँकांनी कोट्यवधी लोकांचा आर्थिक समावेश करण्यात आणि समाजाच्या तळागाळापर्यंत आर्थिक प्रगतीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

नागरी सहकारी बँकांना अजूनही त्यांच्या पूर्ण क्षमतेने काम करायचे आहे आणि त्यासाठी त्यांना करावे लागेल.

०१. आर्थिकदृष्ट्या अधिक मजबूत व्हावे लागेल.

०२. आधुनिकीकरण करावे लागेल.

०३. एक मजबूत ब्रँड बनण्यासाठी आम्हाला आमची क्षमता वाढवावी लागेल.

०४. अधिकाधिक लोकांना सभासद करून आपला व्यवसाय वाढवावा लागेल.

या परिषदेत झालेल्या चर्चेतून सहकारावर आधारित विकासाचे मॉडेल मांडता येईल, त्यानुसार काम करून सहकारी बँका आपला व्यवसाय, आर्थिक ताकद आणि आधुनिकता वाढवून सध्याच्या आव्हानांना तोंड देऊ शकतील, समृद्धी आणण्यात यशस्वी होतील, अशी आशा आहे.

मा.ना.डॉ. भारती पवार आपल्या स्वागताध्यक्षीय भाषणात म्हणाल्या की, या दोन दिवसीय परिषदेच्या माध्यमातून सहकार क्षेत्रातील बँकांना येणाऱ्या अडचणी व सूचना यावर उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. बँकिंग क्षेत्रात डिजिटलायझेशनमुळे खूप मोठे सकारात्मक बदल झाले आहेत. सहकारातून समृद्धी यातूनच नागरी सहकारी बँकांना आर्थिक पाठबळ देऊन सक्षम करण्यासाठी केंद्र सरकारच्या सहकार मंत्रालयाची मदत होत आहे. आतापर्यंत साधारण २८ कोटी जनधन योजनेची बँक खाती उघडण्यात आली आहेत. याचा खूप लाभ होत आहे. तसेच नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला अडचणीतून बाहेर काढण्यासाठी सहकार्य करावे.

महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा.ना. दिलीप वळसे पाटील म्हणाले की, देशामध्ये विशेषतः महाराष्ट्रामध्ये सहकार व सहकारी संस्थांची उज्ज्वल अशी परंपरा असून या संस्थांनी सहकार क्षेत्राच्या माध्यमातून देशाच्या विकासामध्ये मोठे योगदान दिलेले आहे. सध्या जगामध्ये आर्थिक तसेच माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. आजच्या युगामध्ये डिजीटायझेशन ही काळाची गरज आहे. सहकारी संस्थांच्या भवितव्याच्या दृष्टीने सर्वच संस्थांनी आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारणे आवश्यक असून त्यासाठी भांडवल उभारणी खूप महत्त्वाची आहे. संस्थेचे संचालक व कर्मचारी यांनीही या तंत्रज्ञानाची माहिती घेऊन प्रशिक्षित होण्याची गरज आहे. आर्थिक साक्षरतेचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन आर्थिक क्षेत्रात काम करणाऱ्या सहकारी संस्थांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. महाराष्ट्र हे देशातील सहकारी संस्थांची संख्या व योगदान या दृष्टिकोनातून अग्रगण्य राज्य आहे. राज्यातील विकासामध्ये सहकारी बँका, पतसंस्था, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, साखर कारखाने, सूतगिरण्या, दुध संस्था अशा अनेकविध ५६ प्रकारच्या संस्थांनी राज्यातील जनतेला समृध्द करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. ग्रामीण भागामधून शेती व ग्रामीण विकासाच्या अनुषंगाने आवश्यक असणारा पत, वस्तु व सेवा पुरवठा याबाबत विशेषत्वाने काम करण्यात येत आहे. राज्यातील पतसंस्थांमध्ये ठेवीदारांच्या ठेवींना संरक्षण मिळण्यासाठी राज्य शासनाने योजना तयार केली आहे. राज्य शासन यामध्ये १०० कोटी इतकी रक्कम देणार असून या संस्थांच्या बळकटीकरणासाठी केंद्र सरकारचेही योगदान मिळाल्यास या ठेवींना संरक्षण देण्याच्या रकमेमध्ये वाढ करणे शक्य होईल. या अनुषंगाने केंद्र सरकारने या व्यवस्थेसाठी किमान १०० कोटी रुपये द्यावेत, अशी मागणी या सहकार परिषदेच्या निमित्ताने करतो आहे.

परिषदेचे मुख्य आधारस्तंभ खा. हेमंत गोडसे म्हणाले की, सर्वसामान्य माणसाच्या जगण्याचा पर्याय म्हणजे सहकार आहे हे सहकार धुरीणांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध केले आहे. तीच परंपरा आपण पुढे नेत आहोत हे निश्चितच अभिमानास्पद आहे. नाशिक येथे संपन्न होत असलेली ही सहकार परिषद भारताच्या सहकार चळवळीला नवी दिशा देणारी ठरणार आहे हे मी अभिमानाने नमूद करतो.

नाशिकचे पालकमंत्री मा.ना. दादाजी भुसे म्हणाले की, सर्वसामान्य माणसाचे जगणे सुखकर व्हावे यासाठी महाराष्ट्रातील व देशातील सहकाराचे ज्ञान असणाऱ्या व्यक्तींनी सहकाराची सुरूवात केली, त्याचे आज वटवृक्षात रुपांतर झाले आहे. त्याचप्रमाणे सहकार क्षेत्राच्या चळवळीत महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर राहिला आहे, राज्यातील असे एकही गाव किंवा खेडे नाही जिथे सहकार क्षेत्राचा स्पर्श झालेला नाही. सहकारी बँकांनी आपल्या व्यवस्थापन प्रणालीत आमूलाग्र बदल केले असून हे बदल आजही सातत्याने सुरू आहेत, ही बाब कौतुकास्पद आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रीयकृत बँकाच्या दर्जात्मक बँकिंग सेवांप्रमाणेच नागरी सहकारी बँकादेखील एटीएम टेलीबँकिंग, इंटरनेट बँकिंग, कोअर बँकिंग, मोबाईल बँकिंग आदी सेवा देण्यात अग्रेसर आहेत. स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अंगीकार करणे नागरी सहकारी बँकांसाठी अत्यावश्यक झाले आहे. सहकार परिषदेच्या माध्यमातून नागरी सहकारी बँकाच्या विकासाला हातभार लागावा, तसेच सहकार चळवळ जनसामान्यांपर्यंत पोहचण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावेत. या सहकार क्षेत्राला पाठबळ देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही देतो.

यावेळी कार्यक्रमादरम्यान प्रधानमंत्री मा.ना. नरेंद्रजी मोदी व केंद्रीय सहकार मंत्री मा.ना. अमितभाई शाह यांनी महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँक परिषदेला दिलेल्या शुभेच्छा संदेशाचे सादरीकरणाद्वारे वाचन करण्यात आले.

सहकार परिषदेचे निमंत्रक मा. विश्वास ठाकूर म्हणाले की, या परिषदेसाठी राज्यातील ३६ जिल्ह्यांमधील २७२

तालुक्यांमधून लोक आले आहेत. 'सहकारातून समृद्धी' हा या परिषदेचा उद्देश आहे. नागरी सहकारी बँकांची वाटचाल अतिशय मजबूत असून बँकांच्या विकासात्मक वाटचाल उत्तम आहे. बँकांच्या ठेवी, कर्ज व नफ्यात भरघोस वाढ झाली असून नागरी बँका ह्या ग्रामीण व शहरी भागातील अर्थकारणाचा नवा पर्याय ठरला आहे. नाशिकमध्ये संपन्न होत असलेली सहकार परिषद बँकिंग क्षेत्रातील नव्या आव्हानांचा सामना करण्यासाठीच्या प्रयत्नांचा भाग आहे.

सहकार परिषदचे अध्यक्ष मा. अजय ब्रम्हेचा म्हणाले की, सहकार विभागाची काही अपप्रवृत्तींनी वाट लावली असून या प्रवृत्ती मात्र उजळ माथ्याने वावरत आहेत. त्यांच्यावर कठोर कारवाईची तरतूद करावी अशी अपेक्षा यांनी व्यक्त केली. तसेच नागरी सहकारी बँकांना शिस्त लावणे व पारदर्शक जाणीवेतून कामकाज करण्याची गरज असल्याचे प्रतिपादित केली.

एनसीयुआय, नवी दिल्ली या संस्थेचे अध्यक्ष मा. दिलीप संघाणी म्हणाले की, 'सहकार से समृद्धी तक' ही केंद्र सरकारची घोषणा अत्यंत चांगली असून त्यामुळे देशाच्या विकासाला चालना मिळणार आहे. परंतु रिझर्व बँक ऑफ इंडिया म्हणजेच आरबीआयचे काही कठोर नियम आहेत. त्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारने चर्चा करून त्यातून तोडगा काढणे गरजेचे आहे. राष्ट्रीयकृत बँकांना अनेक सोयी सुविधा मिळतात, त्या नागरी सहकारी बँकांना देखील मिळाल्यास या बँकांना ऊर्जितावस्था प्राप्त होईल आणि या बँका बंद पडणार नाहीत, नागरी सहकारी बँकांना स्वायत्तता मिळाल्यास त्यांची विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू होईल. यासाठी बँकिंग क्षेत्रातील भेदभाव दूर करावेत, असेही ते म्हणाले.

नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑप बँक्स् अॅण्ड क्रेडिट सोसायटी, नवी दिल्ली या संस्थेचे अध्यक्ष मा. ज्योतिंद्र मेहता म्हणाले की, सहकारी बँकिंग क्षेत्राची रचना हळूहळू बदलत आहे. ग्रामीण पातळीवर क्षेत्रात प्रत्येक गावामध्ये नागरी बँकांची आवश्यकता भासू लागली. आहे कारण याच बँका खऱ्या अर्थाने शहरी आणि ग्रामीण विकासासाठी मोठ्या प्रमाणावर योगदान देतात. विशेषतः कोणतेही गावात एक लाखाचे कर्ज देण्यासाठी नागरी सहकारी बँका नेहमीच तयार असतात. या उलट इतर बँकांचे मात्र नियम कठोर आहेत, असेही ते म्हणाले. छोट्या छोट्या बँका मोठे कार्य करीत असल्याने या बँका बंद होऊ नये म्हणून त्यांना सोयी देणे गरजेचे सोयी सुविधा सवलती देणे गरजेचे आहे त्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी प्रयत्न व्हावेत.

यावेळी सहकार परिषदेचे अध्यक्ष व निमंत्रक मा.श्री. विश्वास ठाकूर यांचा सहकार परिषदेच्या यशस्वी आयोजनाबद्दल विशेष सन्मान मा.ना. बी.एल. वर्मा यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच सहकार भारतीच्यावतीने मा.श्री. विवेक जुगादे यांनीही सहकार परिषदेच्या उत्कृष्ट आयोजनाबद्दल मा.श्री. विश्वास ठाकूर यांचा सन्मान केला.

उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचलन मा.श्री. वसंतराव खैरनार व मा.डॉ. सुलभा कोरे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन असोसिएशनच्या संचालिका व परिषदेच्या समन्वयक मा.डॉ. शशिताई आहिरे यांनी केले.

या सहकार परिषदेमध्ये सहकारी बँकिंग क्षेत्रातील विविध विषयांवरील एकूण ६ परिसंवादांचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादांमध्ये सहभागी झालेल्या तज्ज्ञ मान्यवरांनी आपले विचार मांडले.

**०१) परिसंवादाचा विषय : नागरी सहकारी बँकांपुढील आव्हाने**
**शनिवार, २७ जानेवारी २०२४**

**अध्यक्ष - मा.श्री. सत्यनारायण लोहिया,** अध्यक्ष-मराठवाडा अर्बन को-ऑप. असो.लि:- नागरी सहकारी बँकांवर कितीही आव्हाने आली तरी त्यावर मात करण्यासाठी सामाजिक, विश्वासार्हता, टिकवणे महत्त्वाचे आहे. विश्वासार्हता हाच आमचा प्राण आहे. सर्व संचालक, पदाधिकारी कर्मचारी यांची ही जबाबदारी आहे. सामाजिक चारित्र्य राखणेही तितकेच महत्त्वाचे आहे. पवित्र काम आम्ही करत आहोत. नियम कितीही कठोर होऊ द्या. त्यांचा स्वीकार करून आम्ही विश्वासार्हतेच्या बळावर १००% टिकून राहू नाहीतर अधःपतन होईल.

**वक्ते - मा.श्री. शैलेश कोतमिरे,** अपर आयुक्त-मा. सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे :- नागरी सहकारी बँकांनी काळाच्या वेगाबरोबर बदलले पाहिजे. सक्षमता वाढवणे गरजेचे आहे. डिजिटलायझेन डिजिटल व्यवहार १३ हजार कोटी डिजिटल व्यवहार मार्च २०२३ अखेर होते. २०२४ अखेर १६ हजार कोटी घेतील असा अंदाज आहे. तसेच UPI व्यवहार २६ कोटी रोज होतात. १०० कोटीचे व्यवहार मार्च २०२४ मध्ये होतील. नागरी सहकारी बँकांचे डिजिटल व्यवहार गतीमानतेने झाले पाहिजे. आजकाल खेड्यापाड्यात क्युआर कोड पान टपरीवरदेखील आहे. सहकारी बँकांनी बंदिस्त व्यवहार करण्यापेक्षा उच्च तंत्रज्ञानाची मदत घेऊन बँकिंग करावे. फिजिकल टू डिजिटल असा प्रवास करावा. स्वायत्तता व स्वातंत्र्याचा स्वीकार करावा.

**वक्ते – मा.श्री. रविंद्र दुरुगकर,** अध्यक्ष–विदर्भ अर्बन बँक्स को–ऑप. असो. लि., नागपूर :– सहकारात युवा पिढी, सक्षम पिढी निर्माण करणे आपल्यासमोर आव्हान आहे. युवा पिढीचा सहकारात नगण्य सहभाग आहे. युवापिढीला सहकारात आणणे गरजेचे आहे त्याकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे. सन २०२८–३० मध्ये या ठिकाणी बसलले २५% लोक निवृत्त होणार आहेत. त्यासाठी सहकारात नवीन पिढी निर्माण करणे हे क्रमप्राप्त झाले आहे.

भविष्यातील तंत्रज्ञानाची आव्हाने पेलण्याची ताकद आपल्यात निर्माण होण्यासाठी बँकिंग साक्षरतेचा प्रसार करण्यासाठी संघटित प्रयत्नांची आवश्यकता आहे. सहकार क्षेत्र मजबूत करायचे असेल तर कमकुवत बँकेचे दुसऱ्या सुदृढ बँकेत विलीनीकरण करून सशक्त बँक निर्माण केली पाहिजे.

**मॉडरेटर (नियंत्रक) : मा. रुपा देसाई–जगताप,** संचालिका–अंबरनाथ जयहिंद को–ऑप. बँक लि., अंबरनाथ, जि. ठाणे

**०२) परिसंवादाचा विषय : अम्ब्रेला ऑर्गनायझेशन आणि सहकारी बँका**

**शनिवार, २७ जानेवारी २०२४**

**अध्यक्ष – मा. श्री. ज्योतिंद्र मेहता,** अध्यक्ष–नॅफकब, नवी दिल्ली :– सहकाराच्या मुळाशी आपण जोडले गेलो आहोत. येणाऱ्या नव्या शतकाची गरज म्हणजे अम्ब्रेला ऑर्गनायझेशन आहे. नव्या पिढीला सहकारात आणण्यासाठी व त्याला कृतीशील दिशा देण्यासाठी या सहकार परिषदेच्या आयोजनाचा हेतू आहे. अम्ब्रेला ऑर्गनायझेशनची सुरूवात आम्ही यशस्वीपणे केली आहे. नव्या शतकाकडे आपल्याला जायचे आहे. त्यासाठी काही बँकांनी गुंतवणूकही केली आहे. अम्ब्रेलाच्या माध्यमातून नागरी सहकारी बँकांना आर्थिक आधार, तंत्रज्ञान सुविधा, ट्रेझरी सपोर्ट, गुंतवणूक सल्ला, क्षमता विकास, सेल्फ रेग्युलेटरी ऑर्गनायझेशनसाठी बळ दिले जाईल. यात आता फक्त आपण भारताचे आर्थिक मॉडेल म्हणून याला जगासमोर आणणार आहोत.

**वक्ते – मा.श्री. शरद गांगल,** अध्यक्ष–दि ठाणे जनता सहकारी (टीजेएसबी) बँक लि., ठाणे :– अम्ब्रेला ऑर्गनायझेशन आपल्याला मिळालेलं वरदान आहे. या विषयातील तज्ज्ञ त्याला दिशा देऊ शकतात कारण त्यांच्याकडे तशाप्रकारच्या साधनसामुग्रीची उपलब्धता असते. सभासद म्हणून आपण मागणी करायला पाहिजे. टिअर–१, टिअर–२ च्या बँकांपासून सर्व्हिस देण्यासाठी अम्ब्रेला ऑर्गनायझेशनने सुरूवात करावी. सॉफ्टवेअरच्या आधुनिकी–करणासाठी विशेष लक्ष द्यावे. धोरण तयार करावे. टीअर–३ व टीअर–४ बँकांना नेतृत्त्व विकास व ग्राहक सेवेविषयी प्रशिक्षण द्यावे. मूल्य निर्धारण केंद्र सुरू करावे.

**वक्ते – मा. ॲड. सुभाष मोहिते,** अध्यक्ष–पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असो. लि., पुणे

आज बँकिंग स्पर्धेत व्याजाची जीवघेणी स्पर्धा सुरू आहे. ठेवीचे व्याज भिन्न आहे, कर्जाचे व्याज तेच आहे. स्मॉल फायनान्स बँका जनतेपर्यंत पोहोचल्या आहेत. छोटे ग्राहक स्मॉल फायनान्स बँकांनी आपल्याकडे ओढले आहेत. तुमचा रिटेल ग्राहक त्यांनी नेला आहे. परंपरागत बँकिंगला आपण महत्त्व देत आहोत. नव्या पिढीला बँकिंगकडे आणण्यासाठी प्रयत्न करत नाही. नव्या पिढीला आकर्षित करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाशिवाय तुम्हाला पर्याय नाही. त्यासाठी तुम्हाला सक्षमता वाढवावी लागेल किंवा मदतीसाठी तुमच्या पाठीमागे कोणी उभे राहिले पाहिजे यासाठी अम्ब्रेला ऑर्गनायझेशन आहे.

**वक्ते – मा. श्री. प्रंचित पोरेड्डीवार,** अध्यक्ष–दि गडचिरोली जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि.

अम्ब्रेला ऑर्गनायझेशन ही बँकांना अडचणीच्या काळात मदत करणारी एक मध्यवर्ती संस्था आहे. याला रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व केंद्र सरकारचा संपूर्ण पाठिंबा आहे. कर्मचाऱ्यांना आधुनिक प्रशिक्षण देण्याचे कामही यातून होणार आहे. पाच हजार कोटींची बँक टेक्नोलॉजीवर सहज खर्च करू शकेल पण १०० कोटींच्या बँकेवर मर्यादा येतात. त्यासाठी मदत, डाटा सेंटर, डिझायनींग साठी मदत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व केंद्र शासन, गंभीरपणे काम करत आहे, याची ही प्रचिती आहे त्यांना सहकारातून समृद्धी आणायची आहे.

**मॉडरेटर (नियंत्रक) : मा.श्री. वसंतराव खैरनार,**
संचालक–गोदावरी अर्बन को–ऑप. बँक लि., नाशिक

**०३) परिसंवादाचा विषय : बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट व नागरी सहकारी बँका**

**रविवार, २८ जानेवारी २०२४**

**अध्यक्ष – मा.श्री. मिलिंद काळे,** अध्यक्ष–कॉसमॉस को–ऑप. बँक लि., पुणे :– कुठलाही कायदा त्रासदायक असतो, अडचणीचा असतो ही मानसिकता बदलायला हवी. त्या कायद्याच्या उपयुक्ततेविषयी, सकारात्मक विचार करावा. कायद्यातून संस्थेच्या हिताचा विचार केलेला असतो याची जाणीव प्रत्येकाने ठेवावी. बँकेचा मुख्य कार्यकारी अधिकारी हा

व्यवस्थापनाच्या सोयीचा असावा असा अनेक ठिकाणी विचार असतो. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने ठेवीदारांच्या सभासदांच्या हिताच्यादृष्टीने कायदे केले आहेत. ते समाजहिताच्या दृष्टीनेही महत्त्वाचे आहेत. कुठलीही बँक अडचणीत येणं म्हणजे भागभांडवलाला धक्का लागणे असते. त्यासाठी बँकेच्या व्यवहारात पारदर्शकता राखणे दिवसेंदिवस जबाबदारीची नवी जाणीव निर्माण करणारे आहे.

**वक्ते - मा.श्री. जयवंत जालगांवकर,** अध्यक्ष-दापोली अर्बन को-ऑप बँक लि., दापोली:- रिझर्व्ह बँकेने दिलेल्या नियमांचे पालन करणे आपल्याला बंधनकारक आहे. ८ वर्ष संचालक पदावर असावे असा कायदा केला आहे. मी माझी बँक चालविण्यास सक्षम आहे हा आत्मविश्वास प्रत्येकाने निर्माण करणे गरजेचे आहे. रिझर्व्ह बँकेने किती कायदे केले तरी भय बाळगण्याचे कारण नाही. त्यासाठी प्रत्येक संचालकाने आत्मपरीक्षण करावे. आर्थिक शिस्त राखावी.

**वक्ते - मा.श्री. लक्ष्मण संगेवार,** उपाध्यक्ष-नांदेड मर्चंटस् को-ऑप. बँक लि., नांदेड :- लहान बँकांनी सुदृढीकरणासाठी आपल्या व्यवस्थापनात बदल करायला हवेत. आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमांचे पालन करणे गरजेचे आहे. आर्थिक नियोजन करून बँकेला तंत्रज्ञान कुशल कसे करता येईल. यासाठी व्यवस्थापनाने प्रयत्न करणे बँकेच्या हिताचे आहे.

**वक्ते - मा.श्री. आनंद कटके,** जिल्हा उपनिबंधक, नागरी सहकारी बँक विभाग, मा. सहकार आयुक्त व निबंधक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, पुणे :- बँकिंग क्षेत्रातील तज्ज्ञांनी एकत्र येऊन हा कायदा केला आहे. सहकारात सक्षम स्पर्धा निर्माण व्हावी आणि त्या अनुषंगाने नागरी सहकारी बँका गतीमानतेने कार्यरत रहाव्या हा या कायद्याचा उद्देश आहे. बँकांचे लायसन्स रद्द होत आहेत. त्याविषयी प्रत्येकाने आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. नागरी सहकारी बँकांच्या व्यवस्थापनात कमतरता काय आहेत? बँकांची आर्थिकस्थिती सुधारण्यासाठी काय करता येईल? हा विचार करायला हवा.

**मॉडरेटर (नियंत्रक) : मा.श्री. अजय ब्रम्हेचा,** अध्यक्ष-दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप. बँक्स् फेड. लि., मुंबई

**०४) परिसंवादाचा विषय : केंद्रीय सहकार मंत्रालय; सहकाराची नवी दिशा :-**

**रविवार, २८ जानेवारी २०२४**

**अध्यक्ष - मा. श्री. अतुल खिरवडकर,** मुख्य कार्यकारी अधिकारी-नॅशनल अर्बन को-ऑप. फायनान्स ॲण्ड डेव्हलपमेंट कार्पोरेशन लि., नवी दिल्ली

बँकिंगमध्ये आम्हाला सकारात्मक बदल हवाय असे सांगण्याचा प्रयत्न सहकार मंत्रालय करते आहे. सहकार मंत्रालयामुळे परिस्थितीत आमूलाग्र बदलली ही वस्तुस्थिती आहे. मी अंब्रेला ऑर्गनायझेशनचा मुख्य कार्यकारी अधिकारी झालो. त्याचा मोठा फायदा कुठला असेल तर रिझर्व्ह बँकेच्या वरिष्ठांशी काही मुद्यांवर थेटपणे चर्चा करता आली.

सहकारी बँक क्षेत्राला खात्री देतो की, रिझर्व्ह बँकेचा दृष्टिकोन निश्चितपणे बदलतो आहे. 'यु विल बी सॅरो' अर्थात सेल्फ रेग्युलेटरी ऑर्गनायझेशन आहात. ज्याला आपण घरचा वैदु देखील म्हणू शकतो. रेग्युलेशनचे बरेसचे विषय पुढील पाच सहा वर्षांत अंब्रेलाकडे येणार आहेत. त्यामुळे मंत्रालय आता खंबीरपणे अंब्रेला ऑर्गनायझेशनच्या मागे उभी आहे. अंब्रेला ऑर्गनायझेशनमध्ये असलेली आताची मंडळी मोठे व्यावसायिक आहेत. सर्वात मोठा फायदा आपल्याला होणार आहे. तुम्हाला कुठल्या ना कुठल्या विषयांकरिता कुणाची तरी मदत हवी असते. असे २७ विषय आहेत ज्यामध्ये सेक्टरला आपल्याला मदत करता येणार आहे.

**वक्ते - मा.प्रा. संजय भेंडे,** अध्यक्ष-नागपूर नागरिक सहकारी बँक लि., नागपूर :- केंद्रीय सहकार मंत्रालय सक्षमतेने काम करत आहे. सहकारातून समृद्धी हा नारा देऊन देशातील सहकारातील प्रश्नांचा गांभीर्याने विचार करण्यात येत आहे व ते सोडवण्यासाठी गतीमानतेने प्रयत्न सुरू आहेत. अडीच वर्षाच्या कालावधीत अनेक परिवर्तन आपण अनुभवतो आहोत.

छोट्या बँकांना हात देणाऱ्या संस्था ह्या नागरी बँका आहेत. देशाच्या बँकिंग क्षेत्रात योगदान वाढावा यासाठी-माझी बँक उत्कृष्टच असेल जनसामान्यांना सेवा देणारी बँक असेल. संपूर्ण सहकार क्षेत्र विकसित गतीमान, प्रगतीशील होण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे.

**वक्ते - मा.श्री. अविनाश जोशी,** माजी अधिकारी-रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया :- सहकारी क्षेत्र सक्षम, बळकट, पारदर्शी आणि विश्वस्ताचे भूमिकेतून काम करणारे संचालकांच्या हाती असावे हीच या नव्या मंत्रालयाची अपेक्षा आहे. नागरी सहकारी बँकांना कुठलाही आधार नाही. पैशाचा आधार नाही. अम्ब्रेला ऑर्गनायझेशनसारखी संघटना उभी राहिली ती सहकार मंत्रालयाच्या पाठिंब्यामुळे. ती आपल्याला भांडवल असो, तंत्रज्ञान असो मानव संसाधनाशी संबंधित विषय असोत त्याला

ती निश्चितच सहकार्य देईल. आपण सहकाराची ७ मूलतत्त्वे सोबत घेऊन आपला व्यवसाय करायचा आहे. हा व्यवसाय करत असतांना व्यापारी बँकांपेक्षा अनेक प्रकारच्या अडचणी आहेत. मनुष्यबळाची गरज अपुरी पडते. ती टिकवणे अवघड आहे हे काम प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करण्याचे काम सहकार मंत्रालय करणार आहे. नागरी सहकारी बँका व ग्रामीण सहकारी पतसंस्था यातून आर्थिक सहकार निर्माण झाला आहे.

**मॉडरेटर (नियंत्रक) : मा.श्री. हेमंत धात्रक,** संचालक-नासिक मर्चंटस् को-ऑप. बँक लि., नाशिक

**०५) परिसंवादाचा विषय : सहकार चिंतन व शाश्वत मूल्यांची विश्वासार्ह परंपरा :-**
**रविवार, २८ जानेवारी २०२४**

**अध्यक्ष - मा.श्री. अनिल कवडे (आयएएस),**
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे

सहकाराची फार मोठी परंपरा आपल्याला आहे. येणारा काळ हा आधुनिक तंत्रज्ञानाचा, तीव्र स्पर्धेचा आहे. या काळाची आव्हाने स्वीकारण्यासाठी आपण सक्षम आहोत का? यात आपण टिकणार का? समृद्ध होणार का? अशी आव्हाने आपल्यासमोर आहेत.

सहकार किंवा बँकिंग व्यवस्था रोजचा जीवन व्यवहार हा मूल्य व्यवस्थेवर आधारीत आहे. आजच्या भौतिक, गतीमान जीवनशैलीत या मूल्यांची जोपासना करणे गरजेचे आहे. नागरी सहकारी बँका ह्या सर्वसामान्यांचे जीवनमान उंचावणारी साधने आहेत. त्यातून जनतेचे जीवनमान उंचावण्यास मदत होत असते. त्यासाठी सहकारी संस्थांनी आर्थिक शिस्त पाळणे महत्त्वाचे आहे हा सामाजिक जाणिवेचाच भाग असून त्यात प्रत्येकाने योगदान देणे कर्तव्य आहे. त्यासाठी जीवन व्यवहारात पारदर्शकता आणणे महत्त्वाचे आहे. कुठलीही प्रतिष्ठा आपण करत असलेल्या कामातून निर्माण करावी. सहकाराचा पाया हा सद्भावना, सुविचार व सुसंवादात आहे. श्रद्धा व निष्ठा हा सहकाराचा पाया आहे. कुठलीही संस्था प्रामाणिकपणा सचोटी या बळांवर टिकत असते त्यासाठी परंपरेकडून सहकार धुरीणांकडून आलेला वारसा आपण जपावा.

**वक्त्या - मा.सौ. वैशाली आवाडे,** संचालिका-जवाहर सहकारी बँक लि., हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर उदारीकरणामुळे जग जवळ आले, आंतरराष्ट्रीय बाजारपेठ निर्माण झाली. आज तरुण पिढी सहकारात येत नाही. भांडवलशाही अर्थ-व्यवस्थेमध्ये सहकाराची अर्थव्यवस्था टिकवणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी सहकाराची मूलतत्त्वे सोबत घेऊन सभासदांचा आर्थिक विकास करणे महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर संस्थेचा आर्थिक विकासही महत्त्वाचा आहे. पुढच्या शतकाचे सहकारातले व्हिजन आपण ठेवले पाहिजे सहकारापुढे अनेक आव्हाने आहेत. संस्थेला झालेल्या नफ्याची वाटणी समप्रमाणात सभासदांना झाली पाहिजे.

सभासदांना प्रशिक्षण, गुड गर्व्हनन्स या गोष्टींचा विचार करणे महत्त्वाचे आहे. कॉसमॉस बँक, सारस्वत बँक या सहकारातील बँका आदर्श म्हणून समोर आहेत. त्यांची दूरदृष्टी किती महत्त्वाची होती हेही आपण लक्षात घेतले पाहिजे. त्या बँका बदलत्या अर्थकारणाला सामोरे गेल्या. काळाची मागणी आपण ओळखली पाहिजे. कोरोना पूर्वीचा काळ व कोरोना नंतरचा काळ अशी अर्थकारणाची विभागणी आपण करू शकतो. आर्थिक परिवर्तन, लोकसंख्या हे प्रश्न आहेत. जागतिकीकरण, व्यावसायीकरण हा प्रश्न आहे. स्पर्धेशी आपण सामर्थ्याने सामना करायला हवा. ग्राहकांसाठी नवनवीन योजना पोहोचवायला हव्यात. तरुणांना सहकारात आणा.

**वक्ते - मा. श्री. श्रीराम देशपांडे,** संचालक-जळगांव जनता सहकारी बँक लि., जळगांव

सहकाराचा मुख्य उद्देशच सर्वसमावेशक विकास हा आहे. समाजातील मोठ्या समूहाला आवश्यक वस्तू आणि सेवा माफक दरामध्ये उपलब्ध करून देणे हा सहकारी संस्थांचा उद्देश असतो. सभासदांना आर्थिक शिस्तीची सवय लावून आर्थिक उन्नतीचा पर्याय उपलब्ध करून देणे हे सुद्धा सहकाराचे एक उद्दिष्ट आहे. अनेक व्यक्तींनी एकत्र येऊन आणि आर्थिक संसाधनांची सामूहिक उभारणी करून सर्वांच्या गरजांची पूर्तता करण्याचा प्रयत्न सहकारात होत असतो. भांडवली आणि अर्थ केंद्रित व्यवस्थेत सर्वसामान्य माणसाच्या हिताची जोपासना करण्याचा प्रयत्न सहकाराद्वारे केला जातो. सहकारी संस्थांच्या आधारे सभासदांना आवश्यक पुरेसे भांडवल, त्यांच्या वस्तू आणि सेवांना बाजारपेठ, सहज सोपे तंत्रज्ञान, स्वस्त सुलभ वित्त पुरवठा, आवश्यक भौतिक संसाधनांची उपलब्धता आणि सरकारी मदत व प्रोत्साहने उपलब्ध होऊ शकतात. सभासदांच्या सामूहिक विकासासाठी या सर्व घटकांची आवश्यकता असते आणि सहकारी संस्थांद्वारे याची पूर्तता होऊ शकते. यामुळेच सहकारातील सभासदांना आपला सामूहिक, शाश्वत व समावेशक विकास करून घेणे शक्य होते.

**वक्ते – मा.श्री. सिताराम आडसुळ,** संचालक–अभ्युदय को–ऑप. बँक लि., मुंबई

अस्तित्त्वाचे आव्हान, मोठमोठ्या बँकांशी स्पर्धा करण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे. त्यासाठी काही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. प्रामुख्याने आपल्या बँकेतील संचालक मंडळ नेतृत्त्व खंबीर असायला हवे. एकजिनसी, एकदिलाने काम करणारे पाहिजे. उत्तम व्यवसाय व्यवस्थापन हवे यामुळे आर्थिक भविष्य उत्तम लाभेल. आपण जो पैसा घेतो तो उधार–उसनवारीने घेतलेला असतो. आपला पैसा हा नफ्यातून शिल्लक राहिलेला आपला असतो. या पैशाचे आपण ट्रस्टी आहोत. त्याचा विनियोग उत्तम झाला पाहिजे. आधुनिकीकरणाची कास धरली पाहिजे. आधुनिक तंत्रज्ञानाचा, डिजिटल बँकिंगचा स्वीकार केला पाहिजे. अधिकारी, कर्मचारी वर्ग प्रशिक्षित असला पाहिजे. ग्राहक वर्गाला सेवा उच्च दर्जाची असावी, ग्राहक समाधानी असावा.

'कस्टमर केअर' असा शब्द आता रूढ झाला आहे व आता तर कस्टमर डिलाईट ग्राहकांचे समाधान ही संकल्पना आली आहे. ग्राहकांना जपणे संस्थेच्या हितासाठी आहे. आजचं जग ग्राहकाभोवती फिरत आहे. ज्याचे ग्राहक जास्त ती संस्था श्रीमंत, सबल असे मानले जाते. माझा ग्राहक, माझा कर्मचारी वर्ग, माझा व्यवसाय सांभाळण्याचा प्रयत्न करावा. सहकाराची मूलतत्त्वे जपून संस्थेचा विकास व प्रगती करावी.

**वक्ते – मा.श्री. अजय मुंदडा,** अध्यक्ष–यवतमाळ अर्बन को–ऑप. बँक लि., यवतमाळ

सहकार शाश्वत ठेवायचा असेल तर सहकारी संस्थांनी आपली ध्येयधोरणे व नियम निश्चित करणे आवश्यक आहे. अनेक लोकांनी संसाधनांनी पछाडलेला भारत कुठे डिजिटल क्रांती करू कणार? असा प्रश्नही निर्माण केला होता. आजचं युग तंत्रज्ञानाचे युग आहे, रोख व्यवहाराच्या जागी डिजिटल व्यवहारामध्ये भारत जगामध्ये पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे. भारताबद्दल गरिबी व अशिक्षितपणा अशी सर्वांसमोर छाप होती. त्यामुळे आर्थिक साक्षरता अतिशय आवश्यक आहे. ज्याप्रमाणे बँकांमध्ये बदल होत आहे, बँकिंग परिस्थिती ही बदलली त्याचप्रमाणे लोकांमध्येसुद्धा बदल होत जातात हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे आपला जो ग्राहक आहे तो अधिकाधिक आर्थिक साक्षर कसा करता येईल व त्यांचेसाठी जनजागृतीचे कार्यक्रम कसे घेता येईल याचाही विचार व्हावा. आर्थिक साक्षरता म्हणजे काय? आर्थिक साक्षरता म्हणजे पैसे सांभाळण्याची क्षमता. अधिक माहितीपूर्ण आर्थिक निर्णय घेण्याची क्षमता, पैसे आणि कर्जाचे प्रभावी व्यवस्थापन, बजेटची प्रभावी निर्मिती इत्यादी आर्थिक साक्षर होण्याचे फायदे आहेत. हे बोलण्यामागे एकच उद्देश आहे, ग्राहकाला आता केंद्रस्थानी ठेवावे लागेल.

**मॉडरेटर (नियंत्रक) : मा.श्री. विश्वास ठाकूर,**

अध्यक्ष, न्युबा, नाशिक व निमंत्रक–महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँक्स् परिषद २०२३–२४

**०६) परिसंवादाचा विषय : डिजिटल क्रांतीचे फलित–व्यापार, व्याप्ती, वर्तमान :–**
**रविवार, २८ जानेवारी २०२४**

**अध्यक्ष – मा. श्री. रवीकिरण मंकीकर**

चेअरमन–आरकेएम कन्सल्टंटस्, मुंबई

नव्या पिढीला सहकारात आणण्यासाठी आपल्याला खूप कष्ट लागतील. सर्व सुविधा आता मोबाईलवर हव्या ही मागणी आहे. त्यासाठी ते देण्यासाठी आम्ही सक्षम आहोत का? त्यांचे इन्फ्रास्ट्रक्चर आमच्याकडे आहे का? हा विचारही महत्त्वाचा आहे. कमीत–कमी वेळात ग्राहकाला कर्ज देण्याची सुविधा उपलब्ध करून द्यायला हवी. यात खाजगी बँका आघाडीवर आहेत कारण त्यासाठी त्यांनी यंत्रणा उभी केली आहे. त्यातून निर्णय घेण्यास ते विलंब लावत नाही. तंत्रज्ञानाचा वापर करून Customer Evalution करण्याची गरज आहे त्याचा फायदा Customer Eco System असल्याने कर्ज वसुलीला ही अडचण येत नाही.

बँकांनी दिवसभरात किती व्यवहार होतात आणि त्यातील किती डिजिटल होतात यावर लक्ष ठेवावे त्यातून मनुष्यबळाची गरज किती हे लक्षात येते. डिजिटल क्रांतीचा उपयोग पेमेंट बरोबर डिजिटल बिझनेस ऑपरेशन्ससाठी आपण लक्ष दिले पाहिजे.

**वक्ते – मा.श्री. मिलिंद आरोलकर,** संचालक–महाराष्ट्र अर्बन को–ऑप. बँक्स् फेड. लि.

आपण सर्वच सहकाराच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक समावेशन (इन्क्लुजन) साठी अनेक वर्ष आपण कार्यरत आहोत. सहकार ही आपली Value system आहे आणि बँकिंग हा व्यवसाय आहे. यासाठी आपल्या व्यावसायिक दृष्टिकोन ठेवावा लागेल कारण समोर आव्हाने आहेत. त्याला सहकारी बँकिंग अपवाद नाही. पुढील ५ वर्षांत बँकिंगमध्ये काय

बदल होतील. ग्राहकांच्या काय गरजा असतील, त्यांच्या कुठल्या प्रकारच्या सेवा देणे गरजेचे आहे; या मानसिकतेचा आपण विचार करावा.

अनेक गोष्टी बदलतात २५ वर्षांपासून जो आपला ग्राहक आहे तो आज ५० वर्षांचा झालेला आहे. पुढील १० वर्षात तो साठीचा होईल. युवा ग्राहक जो आज आर्थिक सक्षम आहे तो नागरी सहकारी बँकांकडे येतोय का? तो जर आपल्याकडे आला नाही तर आपण बँकिंगच्या स्पर्धेतून बाहेर जाऊ. यासाठी डिजिटल क्रांतीकडे जावे लागेल. डिजिटल क्रांती ही उद्याची गोष्ट नाही ती आजची गोष्ट आहे.

**वक्ते – मा. श्री. अजय निकुंभ,** आय.टी. कन्सल्टंट, सायबर सुरक्षा तज्ज्ञ

मोबाईल बँकिंग आपण सुरू केले आहे त्याचबरोबर युपीआय सर्व्हरला पर सेकंद दहा हजार ट्रान्सेक्शन होत असतात. हे डिजिटल क्रांतीच्या यशस्वीतेचे प्रतिक आहे. एटीएमची क्रांती आपण बघतोच आहे. निओ बँकेचा उल्लेख झाला. फक्त एका व्यक्तीवर बँकिंग करता येत आहे. सेंट्रल बँक डिजिटल करन्सी (CBDC) ची सुविधा काही बँकांनी सुरू केलेली आहे.

आर्टिफिशल इंटेलिजन्स, मशिन लर्निंगमध्ये क्रांतीची सुरूवात झाली आहे. अमेरिकेत क्रेडिट सोसायटी कर्ज देतात ते ॲग्रीमेंट चेक करण्यासाठी बराच कालावधी लावतात. पुण्यातील एका कंपनीने आर्टिफिशल इंटेलिजन्स, मशिन लर्निंग सॉफ्टवेअर तयार केले आहे. ॲग्रीमेंट ३ मिनिटांत चेक होते. दिवसभरात ५०० हून अधिक ॲग्रीमेंट चेक होतात, लोन डिस्बर्स होतात या वेगाने डिजिटल क्रांतीची वाटचाल सुरू आहे. त्यासाठी सुरक्षित राहणे गरजेचे आहे.

**वक्ते – मा.श्री. विवेक जुगादे,** संचालक–शिक्षक सहकारी बँक लि., नागपूर

कोरोनानंतर डिजिटलायझेशनला खऱ्या अर्थाने वळण मिळाले. डिजिटलायझेशनमुळे देशाची गंगाजळी वाढली व त्याचा उपयोग देशाच्या विकासात्मक गतीला होत आहे. त्यामुळे देशाचे आधुनिक चित्र समोर आले आहे. जगात आज भारत तरुण देश मानला जातो. भारतातील तरुण पिढीचे सरासरी वय २७.२ वर्ष इतके आहे. त्यामुळे तरुण पिढीला सहकार क्षेत्रात आणणे आपल्यासर्वांची जबाबदारी आहे. तसेच सहकारी बँकांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तरुण पिढीपर्यंत जास्तीत–जास्त वेगाने कसे पोहचता येईल यासाठी प्रयत्न करावे. युवा पिढीला बँकेच्या संचालक मंडळात सामावून घ्यावे व त्यांचे विचार जाणून घ्यावे व त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे, ही सहकाराची गरज आहे.

**वक्ते – मा. श्री. राजन सोनटक्के,** मुख्य कार्यकारी अधिकारी–अकोला अर्बन को–ऑप. बँक लि., अकोला

बँका कॉम्प्युटराईज्ड झाल्या ती डिजिटल क्रांतीची सुरूवात होती. नंतर डाटा एकत्रीकरण (कन्सॉलिडेशन) सिस्टिम आली.

बँकेचे संचालक, अधिकारी, कर्मचारी यांनी बँकेच्या आधुनिकीकरणात पुढाकार घेतला पाहिजे. राष्ट्रीयकृत बँकेत ठरलेल्या साच्यात मी नोकरी केली. इथे त्याबाहेर आहे डिजिटल बँकिंगमध्ये सुरक्षितता हा महत्त्वाचा विषय आहे. ज्येष्ठ नागरिक, तरुण वर्ग हेही बँकेचे ग्राहक आहेत. तंत्रज्ञानाचा स्वीकार हा बँकेचा मुख्य आधार आहे ही जाणीव ठेवणे गरजेचे आहे. ज्येष्ठ नागरिकांशी संवाद आणि संपर्काच्या माध्यमातून बँकांशी जोडून घ्या. तेही डिजिटलचे ग्राहक होतील. आव्हानांचा सामना करण्याची जिद्द निर्माण करा.

आज अनेक बँका सीबीएस प्रणालीवर कार्यरत असून डिजिटल टुल्स आणि प्लॅटफॉर्मने सहकारी बँकांमधील कामकाजाची कार्यक्षमता वाढवली आहे. अनेक मॅन्युअल प्रक्रियांच्या ऑटोमेशनमुळे त्रुटी कमी झाल्या आहेत, वेग वाढला आहे आणि सेवा गुणवत्ता सुधारली आहे.

**मॉडरेटर (नियंत्रक) : मा.श्री. अशोक तापडीया,**

संचालक–बिझनेस को–ऑप. बँक लि., नाशिकरोड

या सहकार परिषदेचा समारोप सोहळा रविवार २८ जानेवारी २०२४ रोजी संपन्न झाला. याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त व निबंधक मा.श्री.अनिल कवडे आणि कॉर्पोरेट कन्सल्टंट व अर्थतज्ज्ञ मा. श्री. उदय तारदळकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

**मा. श्री. उदय तारदळकर,** कॉर्पोरेट कन्सल्टंट व अर्थतज्ज्ञ

सहकाराला १०४ वर्षांची मोठी परंपरा आहे. आपण काही जागतिक उदाहरणे घेतली तर जागतिक सहकारामध्ये अमूल सारखी अशी संस्था आहे जी सहकारातून पुढे आली. महाराष्ट्रात बँकांव्यतिरिक्त विविध सहकारी संस्थांनी मोठ्या प्रमाणावर सुबत्ता दिली आहे. अशा सहकाराचे महत्त्व आपण जेव्हा ठेवतो तेव्हा पुढे जातांना आपणापुढे आव्हाने आहेत.

भारत हा तरुणांचा देश आहे. या तरुणाईला जास्तीत जास्त डिजिटल व्यवहारच करावेसे वाटतात आणि आपण जर डिजिटल व्यवहारात मागे पडलो तर मग आपले काही खरे नाही. या सगळ्या स्पर्धेमध्ये तर त्यादृष्टीने जर विचार केला तर आपण काही आकडेवारी बघू UPI ची एकूण आपले जे नियामक आहे रिझर्व्ह बँक आहे यांच्या मनात काय आहे आणि आपण काय केलं पाहिजे. अर्बन को-ऑप. बँक म्हणून साधारण ऑक्टोबर २०१९ मध्ये एका महिन्यात UPI द्वारे १ अब्ज व्यवहार झाले होते आणि हे ऑक्टोबर २०१९ म्हणजे कोरोनाच्या आधी म्हणजे सर्व ऐच्छिक व्यवहार होते आणि साधारण फेब्रुवारी २०२० मध्ये एका दिवसात UPI द्वारे ५ कोटी व्यवहार झालेत. आपल्याकडे ५ महिन्यांपासून कोरोनाची लागण झाली. या सगळ्यामध्ये एक लक्षात आलं की, जे वॉलेट्स वापरतात त्यांना साधारण १ टक्का शुल्क त्या UPI व्यवहारात लागू झाले अर्थात त्यासाठी ग्राहकांसाठी कुठलाही बोजा आजपर्यंत आलेला नाही.

नागरी सहकारी बँकांसमोर मोठ्या समस्या आहेत त्या समस्यांवर मात करण्यासाठी आपण काय करणार हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. त्याकरिता स्वयंशिस्त महत्त्वाची आहे ती आपल्याकडे ठेवलीच पाहिजे. प्रशासन आणि व्यवस्थापन यांची सांगड घातली गेली पाहिजे. आर्थिक स्थिती गंभीर होऊ नये म्हणून आपल्या सगळ्या कर्मचाऱ्यांना विश्वासात घेऊन पुढे गेलं पाहिजे. अम्ब्रेला ऑर्गनायझेशन थोड्या दिवसांत पूर्णपणे कार्यरत होईल त्याचा एकूण फायदा कसा करून घ्यायचा? आपण कमी पडतोय की भांडवल कमी पडते आहे म्हणून ते घेण्यापेक्षा सुदृढीकरणासाठी जास्त करून घ्यायचे आणि हे सुदृढीकरण करतांना आपण जबाबदारीने काम केले पाहिजे.

रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शनानुसार २०२५ पर्यंत बँकांचे २५% व्यवहार धनादेशाद्वारे होतील. तरुणाईला डिजिटल व्यवहार करायचे आहेत. २०२५ पर्यंतची अल्पवेळ लक्षात घेता डिजिटल प्लेटफार्मवर स्वार होणे आता गरजेचे आहे. भारतीयांची २०२३ मध्ये २९.३० लाख कोटींची गुंतवणूक होती. त्यापैकी १०.२६ लाख कोटी रुपये मुदतठेवीत होते. यामुळे ठेवींकडे कल कायम आहे. व्याजदर कमी होणार असल्याने सहकारी बँकांपुढे आव्हान आहे. नॉन बँकिंग फायनान्स कंपन्या सहकारी बँकांच्या स्पर्धक आहे. कर्मचाऱ्यांना कौशल्य प्रशिक्षणातून वाढवावे लागेल. डिजिटल क्रांतीत आपल्याला झोकून द्यावे लागेल.

**मा.श्री. अनिल कवडे (आयएएस),** सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

सहकाराची मुहूर्तमेढ महाराष्ट्रात रोवली असून तिने विविध क्षेत्रात पाळेमुळे रोवली आहेत. गृहनिर्माण संस्थांपासून ते पाणी वाटप संस्थांपर्यंत हे क्षेत्र विस्तारले आहे. सहकारी बँका आज आघाडीवर आहेत. मात्र बँकांच्या संचालकांनी आहे तेथेच न थांबता आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे.

सहकारी बँकांच्या प्रतिनिधींनी आपण जेथे आहोत, तेथे समाधानी आहोत असे म्हणून चालणार नाही. तंत्रज्ञानाची कास धरून मार्गक्रमण करण्याची गरज आहे. जीवनाचा प्रत्येक अध्याय हा सहकारावर अवलंबून आहे. आपल्या भौतिक प्रगतीत सहकाराचा मोठा वाटा असल्याने विसरून चालणार नाही. 'जो जे वांछिल, तो ते लाभो' हे सहकाराचे उद्दिष्ट आहे. अनेकांचे दुःख दूर करण्याची ताकद सहकारात आहे. राज्यातीलच नव्हे तर जगभरातील सहकाराचा पाया सद्भावना, सत्कर्म व संवादातून जात असतो.

प्रत्येक संचालक हजारो ठेवीदारांच्या हिताशी निगडित असतो. आम्ही कुठे चुकतो व काय केले पाहिजे याचा अभ्यास केल्याशिवाय पुढे जाता येणे अवघड असते. नागरी सहकारी बँकांनी कासा, सीडी रेशो यासारखे रेशो सांभाळले पाहिजे. कामात सहजता, सुलभता, पारदर्शकता कशी येईल हे पहावे. मध्यमवर्गीय आपल्यासाठी संधीच्या रूपात उपलब्ध आहे. त्याला कर्ज द्यायला हवे. त्यांनाही समृद्धीकडे नेता येईल.

महाराष्ट्रातल्या जेवढ्या नागरी सहकारी बँका आहेत त्या सर्वांचे क्यूआर कोड सगळ्यांकडे गेले पाहिजेत. राज्यातल्या सर्व नागरी बँकांचे क्यूआर कोड लोकांकडे गेले पाहिजेत. त्या माध्यमातून त्यांचं तुमच्याकडे करंट अकाउंट, सेव्हिंग अकाउंट आलं पाहिजे. त्यांचा एक ट्रॅक रेकॉर्ड तयार केला पाहिजे. त्यांचा कर्ज पत मर्यादा आणि पत ठरविण्याच्या दृष्टिकोनातून मी अनेक बँकांमध्ये बघितलं की सीडी रेशो आपला ६० ते ७० टक्के पाहिजे. आजही आपण किती ठेवी गोळा केल्या यावर चर्चा करण्यात अर्थ नाही. बँकेची नफा क्षमता, कर्ज देणं, व्याजाचं उत्पन्न वाढवणं महत्त्वाचे आहे. जर नुसते डिपॉझीट गोळा केले आणि ते कर्ज म्हणून वितरीत केले नाही तर त्याचा काही उपयोग नाही. आधी सांगितल्याप्रमाणे ५० टक्के २५ लाखांच्या आंत पाहिजे मी म्हणेल ते तुमच्या माध्यमातून जर द्यायचं असेल तर छोट्या माणसांपर्यंत आपण जाणं, त्यांना सभासद करून घेणं, त्यांचे जॉइंट लायबिलीटी ग्रुप तयार करणे आणि त्यांना कर्ज देणे

हे गरिबी हटाओ मधला महत्त्वाचा मुद्दा आहे. तुमच्या माध्यमातून तो व्हायला पाहिजे. आपल्या संपूर्ण व्यवस्थेमध्ये कर्ज देण्याच्या, गरजांची पत तपासण्याच्या सगळ्या पद्धतींमध्ये आपल्याला सहजता कशी आणता येईल, सुलभता कशी आणता येईल, पारदर्शकता कशी आणता येईल, परिणामकारता कशी आणता येईल, विश्वासार्हता कशी आणता येईल हे आपण बघण्याची फार मोठी गरज आहे.

**मा.श्री. विश्वास ठाकूर,** अध्यक्ष व निमंत्रक

सहकार परिषदेच्या निमित्ताने नाशिकमध्ये सहकाराचा कुंभमेळा भरला होता. नागरी सहकारी बँकांचे प्रश्न सोडविण्यासाठी संघटीतपणे एकत्र आले होते. त्यातून सहकाराची खरी ताकद लक्षात येते. नागरी सहकारी बँकांच्या आधुनिकीकरणासाठी काय करता येईल तसेच व्यवस्थापनातील नवनव्या बदलांचा स्वीकार करण्यासाठी काय संधी आहेत? त्यावरही परिषदेत अभ्यासपूर्ण चर्चा झाली. त्याचा उपयोग नागरी सहकारी बँकांना होईल व सहकारी बँकांच्या प्रगतीला गतीमानता येईल.

नागरी सहकारी बँकांसाठी कौशल्य, ज्ञान, अनुभव यांची सांगड घालून बँकिंग क्षेत्राचे क्षितिज विस्तारता येईल व ग्राहकांना उत्तम सेवा कशी देता येईल. या विषयी प्रत्येकाने सजग राहण्याचे तंत्रज्ञानाचा अवलंब करून मनुष्यबळाचा वापर योग्य पद्धतीने करण्यासाठी प्रशिक्षण कार्यशाळांच्या माध्यमातून बँकांनी प्रयत्न करावेत; ती काळाची गरज आहे.

सहकार क्षेत्रातील आव्हानांची चर्चा होणे गरजेचे असून त्यावर उपाय शोधून त्याचा विकासासाठी कसा वापर करता येईल त्यावर प्रत्येकाने जाणीवपूर्वक योगदान द्यावे. नागरी सहकारी बँकांचा विकास हा सामूहिक प्रयत्नांतून होत असल्यामुळे तो शाश्वत विकासाचा मार्ग आहे.

सहकार परिषदेच्या निमित्ताने सहकार परिषदेचे अध्यक्ष अजय ब्रम्हेचा यांनी केंद्र/राज्य सरकार व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडे नागरी सहकारी बँकांचे प्रलंबित असलेले प्रश्न/अपेक्षा यांच्या ठरावाचे वाचन केले व उपस्थितांनी त्यास अनुमोदन दिले.

'अर्थवेध' या स्मरणिकेच्या मुखपृष्ठाचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. समारोप सोहळ्याचे सूत्रसंचलन डॉ. स्मिता मालपुरे-वाकेकर यांनी केले. सहकार परिषदेच्या निमित्ताने कॉसमॉस को-ऑप. बँकेचे मिलिंद गाडगीळ यांनी 'सहकाराची हास्य गॅलरी' हा बँकिंग क्षेत्रावर आधारीत मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर केला. तसेच 'महाराष्ट्राची लावणीधारा' हा सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला.

सहकार परिषदेत महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांच्या सहभागी झालेल्या प्रतिनिधींना सहभागपत्र व भेटवस्तू देण्यात आली.

सहकार परिषदेसाठी प्रायोजक म्हणून दीपक बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स कॉसमॉस को-ऑप. बँक लि., सारस्वत को-ऑप. बँक लि., रिलायन्स इंडस्ट्रिज लिमिटेड, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि., सिक्युअर टेक आय टी सोल्युशन्स प्रा.लि., ईएसडीएस सॉफ्टवेअर सोल्युशन्स, सीआयओ न्युज, स्टेट बँक ऑफ इंडिया, सिडको, महाराष्ट्र, विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक, रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ, महाराष्ट्र शासनाचा सहकार विभाग यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सहकार परिषदेच्या निमित्ताने भारतातील विविध माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या तसेच बँकिंग क्षेत्रातील आधुनिकीकरणासाठी लागणाऱ्या उत्पादनांचे अनेक स्टॉल्स उभारण्यात आले होते.



# सभासदांसाठी महत्त्वाच्या सूचना

०१) सभासदांनी नाव, पत्ता, मोबाईल, दूरध्वनी, ई-मेल इत्यादी बदलले असतील तर त्यांनी बँकेच्या मुख्य कार्यालयातील शेअर्स विभागात/ नजीकच्या शाखेत लेखी स्वरूपात कळवावे.

०२) ज्या सभासदांनी के.वाय.सी. नॉर्म्सची पूर्तता केलेली नसेल त्यांनी आपला अद्ययावत फोटो, फोटो आयडी, पॅनकार्ड व आधारकार्डची सेल्फ अटेस्टेड झेरॉक्स प्रत बँकेस देऊन सहकार्य करावे.

०३) ज्या सभासदांनी अद्याप वारसाची नोंद केली नसेल त्यांनी वारस नोंदीचा अर्ज बँकेकडे द्यावा.

०४) ज्या सभासदांनी आपले भाग दाखले (शेअर्स सर्टिफिकेट) घेतले नसतील त्यांनी बँकेच्या कामकाजाच्या वेळेत ती मुख्य कार्यालयातून घेऊन जावीत.

०५) सभासदांचे ओळखपत्र/शेअर सर्टिफिकेट गहाळ झाल्यास बँकेला लेखी कळवावे.

०६) सुधारित पोटनियमानुसार प्रत्येक सभासदाचे बँकेत चालू/बचत खाते असणे आवश्यक आहे.

०७) बँकेकडून जलद सेवा मिळण्याच्यादृष्टीने बँकेत येतांना पासबुक, ठेव पावत्या व इतर आवश्यक कागदपत्रे बरोबर आणावीत.

०८) सभासद/ग्राहकांच्या खात्यातील रकमेच्या सुरक्षेच्यादृष्टीने तसेच बँकेच्या विविध नवीन योजनांची माहिती सभासद ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याच्यादृष्टीने बँकेमार्फत ग्राहकांना एसएमएस पाठविण्यात येतात. तरी सभासद ग्राहकांनी त्यांचे अद्ययावत मोबाईल व व्हॉट्सॲप क्रमांक संबंधित शाखांमध्ये खाते क्रमांकासह लेखी कळवून नोंद करून घ्यावी.

०९) बँकेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सर्व सभासदांना विनंती की, आपले सर्व व्यवहार विश्वास को-ऑप.बँकेतूनच करावे. तसेच आपले नातेवाईक, मित्र यांचेही खाते विश्वास को-ऑप.बँकेत उघडण्यासाठी आग्रह धरावा.

१०) बँकेत ठेवलेल्या रु.५ लाखापर्यंतच्या ठेवींना ठेव विमा महामंडळाद्वारे विम्याचे संरक्षण देण्यात आलेले आहे.

११) कर्ज मिळविण्यातील विलंब टाळण्यासाठी कर्ज मागणी अर्जातील संपूर्ण माहिती अचूक भरावी तसेच त्यासोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडावी म्हणजे कर्ज मंजूर होणे सुलभ होईल.

१२) आपण कर्जदार असाल तर आपली कर्जफेड वेळेवर व मुदतीत करा. ज्या कारणासाठी कर्ज घेतले असेल, त्यासाठीच त्याचा विनियोग करा.

१३) आपण कर्जाने घेतलेल्या वस्तूंची कागदपत्रे (उदा. वाहनाची स्टॅम्प रिसिट, बिल, विमा, आर.सी. बुक इत्यादी) त्वरित बँकेत जमा करा.

१४) बँकेस नजरगहाण करून दिलेल्या मालाची यादी दरमहा ५ तारखेच्या आत बँकेत सादर करावी.

१५) नियमितपणे कर्जफेड केल्यास त्याचा लाभ आपल्यासारख्या अन्य गरजू सदस्यांना होईल, हे नेहमी लक्षात असू द्या. आपले कर्ज जर थकित असेल तर थकित कर्ज व व्याजाची रक्कम बँकेत भरणा करून थकबाकी कमी होण्यासाठी सहकार्य करावे.

१६) आपण ज्यांना जामीन आहात, ते कर्जदार वेळचेवेळी कर्जाचे हप्ते भरतात किंवा नाही त्याकडे कृपया लक्ष द्या.

१७) नवीन एटीएमकार्डसाठी आपली मागणी खाते उघडतानाच नोंदवा.

१८) आपले एटीएम कार्ड क्रमांक व पिन क्रमांक इत्यादी माहिती गुप्त ठेवा.

१९) एटीएम कार्ड हरविल्यास बँकेला त्वरित संपर्क साधून माहिती द्यावी.

२०) आपल्या मोबाईलवर/ई-मेलवर आलेला वन टाईम पासवर्ड (ओ.टी.पी.) कुणालाही सांगू नये. बँक अशी माहिती कधीही विचारत नाही.

२१) आपली स्वाक्षरी केलेला कोरा चेक कधीही व कोणासही देऊ नये.

२२) चेकची रक्कम, दिनांक व स्वीकारकर्ता यांची नेहमी नोंद स्वतःकडे ठेवावी.

२३) खात्यात भरावयाचा चेक नेहमी क्रॉस करावा तसेच बँकेचे व्यवहार शक्यतो स्वतः करावे.

२४) आपल्या खात्यातील दिलेले चेक परत जाणार नाही, याची काळजी घ्या. कारण चेक न वटणे, हा शिक्षापात्र गुन्हा आहे.

२५) तुमचे चेकबुक, जमा स्लीप व पासबुक सुरक्षित ठिकाणी ठेवावे.

२६) कोणत्याही अनोळखी व्यक्तीला बँकेत खाते उघडण्यासाठी ओळख देऊ नये, हे जबाबदारीचे काम आहे.

२७) बँकेतून रोख रक्कम काढताना रक्कम मिळाल्यावर सदरची रक्कम बरोबर असल्याची खात्री करावी.

२८) बँकेत असताना तुमचे पैसे पडल्याचे सांगणाऱ्या व्यक्तीमुळे लक्ष विचलित होऊ देऊ नका.

२९) पैसे मोजण्यासाठी अनोळखी व्यक्तीची मदत घेऊ नका. तसेच आपल्यावर कोणी पाळत ठेवत नाही ना, याची खातरजमा करा.

३०) पासबुकात जमा व नावे नोंदी व्यवस्थित झाल्याची खात्री करावी. काहीही शंका असल्यास शाखाधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

३१) आपल्या खात्यावर नियमित व्यवहार करा. १० वर्ष व्यवहार नसलेल्या बँकेतील कोणत्याही खात्यातील रकमा (दि डिपॉझिट एज्युकेशन व अवेअरनेस फंड स्कीम २०१४) (डीफ) योजनेअंतर्गत रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई यांचेकडे वर्ग केली जातात.

३२) आपल्या बहुमोल सूचना व तक्रारी लेखी स्वरूपात सूचना पेटीत किंवा संचालकांकडे द्याव्यात.

# विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक - शाखा विस्तार

| क्र. | शाखेचे नाव | पत्ता | दूरध्वनी/मोबाईल क्रमांक/ईमेल | सुट्टीचा दिवस | दैनंदिन कामकाजाची वेळ |
|---|---|---|---|---|---|
| १ | सावरकरनगर शाखा<br>स्थापना : २५ मार्च १९९७ | तळमजला, विश्वविश्वास पार्क, स्वा.सावरकरनगर, गंगापूर रोड, नाशिक-४२२ ०१३. | (०२५३) २३०५६००/०१/०२ २३४१५०८. ७०३०९१२०२९<br>snbranch@vishwasbank.com | नाही | सोमवार ते शुक्रवार : सकाळी ९ ते रात्री ९ । कॅश काउंटर : सकाळी ९ ते रात्री ८<br>शनिवार : सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ । कॅश काउंटर : सकाळी ९.३० ते सायंकाळी ५<br>रविवार : सकाळी ९.३० ते दुपारी ३ । कॅश काउंटर : सकाळी ९.३० ते दुपारी २.३०<br>लंच टाईम : दुपारी १ ते १.३० |
| २ | रविवार कारंजा शाखा<br>स्थापना : २१ मे २००० | २, रत्नमनोहर संकुल, अहिल्यादेवी होळकर पुलाजवळ, रविवार कारंजा, नाशिक-४२२ ००१. | (०२५३) २३०५६१०, २५०३९४५ ७०३०९१२०३०<br>rkbranch@vishwasbank.com | रविवार | सोमवार ते शनिवार : सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ ।<br>कॅश काउंटर : सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ । लंच टाईम : दुपारी १ ते १.३० |
| ३ | मुंबई नाका शाखा<br>स्थापना १७ जून २००१ | विश्वज्योती, गोविंद नगर, प्रकाश पेट्रोल पंपामागे, मुंबई नाका, नाशिक-४२२ ००९. | (०२५३) २४७१५१०, २४७२९४४ ७०३०९१२०३१<br>mnbranch@vishwasbank.com | नाही | सोमवार ते शुक्रवार : सकाळी ८ ते रात्री १०.००<br>कॅश काउंटर : सकाळी ८ ते दुपारी ३.१५ व दुपारी ४.१५ ते रात्री ९.००<br>शनिवार : सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ । कॅश काऊंटर : सकाळी ९.३० ते सायंकाळी ५<br>रविवार : सकाळी ९.३० ते दुपारी ३ । कॅश काऊंटर : सकाळी ९.३० ते दुपारी २.३०<br>लंच टाईम : दुपारी १ ते १.३० |
| ४ | एच.पी.टी.कॉलेजरोड शाखा<br>स्थापना २१ जानेवारी २००३ | शॉप नं.५७/७५/७६, वसंत मार्केट, कॅनडा कॉर्नर, एच.पी.टी.कॉलेज रोड, नाशिक-४२२ ००५. | (०२५३) २३०५६१३, २३११९५८ ७०३०९१२०३२<br>hptbranch@vishwasbank.com | नाही | सोमवार ते शुक्रवार : सकाळी ९ ते रात्री ९ । कॅश काउंटर : सकाळी ९ ते रात्री ८<br>शनिवार : सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ । कॅश काउंटर : सकाळी ९.३० ते सायंकाळी ५<br>रविवार : सकाळी ९.३० ते दुपारी ३ । कॅश काउंटर : सकाळी ९.३० ते दुपारी २.३०<br>लंच टाईम : दुपारी १ ते १.३० |
| ५ | नाशिक-पूना रोड शाखा<br>स्थापना २० जुलै २००३ | शॉप नं.१, सायरा अपार्टमेंट, अशोका चौक, पखाल रोड कॉर्नर, नाशिक-४२२ ०११. | (०२५३) २३०५६१४, २५०३५७५ ७०३०९१२०३३<br>nprbranch@vishwasbank.com | रविवार | सोमवार ते शनिवार : सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ । कॅश काउंटर : सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ । लंच टाईम : दुपारी १ ते १.३० |
| ६ | खुटवडनगर शाखा<br>स्थापना १५ जुलै २०१० | शॉप नं.२ व ३, राजश्री अॅव्हेन्यू, आय.टी.आय. अंबड लिंक रोड, खुटवडनगर, कामटवाडे, नाशिक-४२२ ००८. | (०२५३) २३७२८२८ / ७७६७००३३५ ७०३०९१२०३५<br>khutwadbranch@vishwasbank.com | रविवार | सोमवार ते शनिवार : सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ । कॅश काउंटर : सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ । लंच टाईम : दुपारी १ ते १.३० |
| ७ | इंदिरानगर शाखा<br>स्थापना १४ एप्रिल २०११ | शॉप नं.९ व १०, महालक्ष्मी एन्क्लेव्ह अपार्टमेंट, इंदिरानगर-पाथर्डीरोड, केंब्रिज शाळेजवळ, इंदिरानगर, नाशिक-४२२ ००९. | (०२५३) २३७७२८२, ७०३०९१२०३६<br>indbranch@vishwasbank.com | रविवार | सोमवार ते शनिवार : सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ । कॅश काउंटर : सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ । लंच टाईम : दुपारी १ ते १.३० |
| ८ | म्हसरूळ शाखा<br>स्थापना १५ जुलै २०१२<br>(०२ जानेवारी २०२४ पासून नविन जागेत स्थलांतर) | शॉप नं. २,३ व ४, हवा महल, आकाश पेट्रोल पंपासमोर, दिंडोरीरोड,म्हसरूळ, नाशिक-४२२००४. | (०२५३) २३०५६१५, ७०३०९१२०३७<br>mhasrulbranch@vishwasbank.com | रविवार | सोमवार ते शनिवार : सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ । कॅश काउंटर : सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ । लंच टाईम : दुपारी १ ते १.३० |
| ९ | पंचवटी शाखा<br>स्थापना १५ जुलै २०१५ | शॉप नं. ७ व ८, फ्लोरा हाईट्स, अमृतधाम, विडी कामगारनगर, के.के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजच्यापुढे, पंचवटी, नाशिक-४२२००३. | (०२५३) २९५०१५५ / ९१७५१७०१०० ७०३०९१२०३८<br>panbranch@vishwasbank.com | रविवार | सोमवार ते शनिवार : सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ । कॅश काउंटर : सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ । लंच टाईम : दुपारी १ ते १.३० |
| १० | पाथर्डी फाटा शाखा<br>स्थापना १५ जुलै २०१६ | शॉप नं.१, प्लॉट नं.५ आणि ६, सर्व्हे नं.३२४, समृद्धी अपार्टमेंट, पाथर्डी-देवळाली रोड, नाशिक-४२२ ०१० | (०२५३) २३८०८८८, ७०३०९१२०३९<br>pathardibranch@vishwasbank.com | रविवार | सोमवार ते शनिवार : सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ । कॅश काउंटर : सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ । लंच टाईम : दुपारी १ ते १.३० |
| ११ | चांदशी शाखा<br>स्थापना : ८ फेब्रुवारी २००९<br>(१६ सप्टेंबर २०१९ पासून चांदशी येथे स्थलांतर) | बंगला नं.१ए, नंदनवन हिल्स, निर्माण ग्रीन कॉटेज, मु.चांदशी, पो. मातोरी, ता.जि.नाशिक-४२२००३ | मोबा.७३५०० २१८८८, ७०३०९१२०३४<br>chandshibranch@vishwasbank.com | रविवार | सोमवार ते शनिवार : सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ । कॅश काउंटर : सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ । लंच टाईम : दुपारी १ ते १.३० |
| १२ | सातपूर शाखा<br>स्थापना ०१ जानेवारी २०२४ | १३५८, महाराष्ट्र हौसिंग कॉलनी, आनंद छाया बस स्टॉप, साई सर्कल, सातपूर, नाशिक-४२२००७. | (०२५३) २९८९००१, ८३८००१०३०१<br>satbranch@vishwasbank.com | रविवार | सोमवार ते शनिवार : सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ । कॅश काउंटर : सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ । लंच टाईम : दुपारी १ ते १.३० |
| १३ | नाशिकरोड शाखा<br>स्थापना ०१ मे २०२४ | शॉप नं. ११ व १२, हनुमंता नगर, विठ्ठल मंगल कार्यालयाच्या बाजुला लोखंडे मळा, नाशिकरोड, नाशिक-४२२१०१. | (०२५३) २९७८३६२, ८३८००१४७८३<br>nashikroadbranch@vishwasbank.com | रविवार | सोमवार ते शनिवार : सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ । कॅश काउंटर : सकाळी ९.३० ते सायंकाळी ५ । लंच टाईम : दुपारी १ ते १.३० |

**रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार बँकेचे कामकाज ग्राहकांसाठी दरमहा दुसरा व चौथा शनिवार बंद राहील.**

टिप : १) संगणकीय सॉफ्टवेअर, हार्डवेअर, मेन्टेनन्स, स्टाफ ट्रेनिंग असल्यास शनिवार व रविवार या दिवशी केंद्र कार्यालय व शाखा यांचे कामकाजात बदल होऊ शकतो.
२) बँकेचे सर्व स्टाफसाठी प्रशिक्षण असल्यास किंवा नूतन शाखेचा लोकार्पण सोहळा असल्यास शाखा व प्रशासकीय कार्यालयाच्या वेळेत बदल होऊ शकतो.

# नातं विश्वासाचं, प्रेमाचं, आपुलकीचं अविरत सेवेचं...

VISHWAS CO-OP. BANK LTD; NASHIK 27 1997 2024 SILVER JUBILEE YEAR

२७ वर्षांपासून आपल्या सेवेत...

नमस्कार,

आर्थिक पारदर्शकता, विश्वास, सेवा या त्रिसुत्रीवर उभी असलेली विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिक दि. २५ मार्च १९९७ रोजी स्थापन झाली. ग्राहकांना सर्वोत्तम, दर्जेदार व तत्पर सेवा देणे ही बँकेची वैशिष्ट्ये आहेत. त्याचबरोबर आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व आदर्श व्यवस्थापन हे बँकेचे वेगळेपण आहे. बँकेच्या १३ शाखा, १ मुख्य कार्यालय, १० हजार सभासद आणि ९०१ कोटींची उलाढाल ही बँकेच्या यशस्वितेची २७ वर्षांतील अभिमानास्पद वाटचाल.

---

## आपल्या सर्व कर्जांच्या गरजा एकाच छताखाली ...

गृहकर्ज 10.25%



सोनेतारण कर्ज 9.50%



हप्तेबंदी कर्ज 11.00%



वाहन खरेदी कर्ज 10.75%



गाळा खरेदी 10.75%



जुने वाहन खरेदी 11.00%



एलआयसी पॉलिसी 11.50%




शैक्षणिक कर्ज 10.99%



कॅशक्रेडिट 12.99%



टिप : रिअल इस्टेट कॅश क्रेडीट कर्ज १४.००%, रिअल इस्टेट हप्तेबंदी कर्ज १३.५०%
हप्तेबंदी कर्जासाठी :- ५ वर्षापर्यंत ११.००%, ५ वर्ष १ दिवस ते १० वर्षापर्यंत ११.२५% व
१० वर्ष १ दिवस ते १३ वर्ष ११.५०%
* शैक्षणिक कर्ज :- रू. १ लाखाच्या आत १२.४९%, मुलींसाठी व्याजदरात ०.५०% सुट

विश्वास बँक आपली आर्थिक उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी विविध दर्जेदार,
सुरक्षित सेवा देण्यासाठी कटिबद्ध आहे.

- पर्सनल बँकींग
- कोअर बँकींग
- विश्वास बँक ॲप (View Only)
- आर.टी.जी.एस.
- एन.ई.एफ.टी. सुविधा
- प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना
- प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना
- किशोर विश्व योजना
- ऑनलाईन टॅक्स भरणा
- लॉकर्स सुविधा
- डेली कलेक्शन
- फ्रँकींग सुविधा
- BBPS सुविधा

संस्थापक अध्यक्ष - **विश्वास जयदेव ठाकूर**

# विश्वास को-ऑप. बँक लि; नाशिक

संचयात् समृद्धीः

विश्वविश्वास पार्क, सावरकरनगर, गंगापूर रोड, नाशिक-४२२ ०१३.

फोन : (0253) 2305600 to 2305604 व्हॉटस्ॲप : 91300 20888

ई-मेल : vishwasbank@gmail.com, वेबसाईट : www.vishwasbank.com,

फेसबुक : www.facebook.com/vishwasbankofficial, इंस्टाग्राम : @vishwas_bank, ट्वीटर : @vishwas_bank




● महाराष्ट्रातील नामवंत १००हून अधिक साहित्यिकांनी गौरविलेला कथासंग्रह ●

● ३ वर्षाच्या कालावधीत १७ आवृत्त्या आणि २५०००हून अधिक खपाचा उच्चांक केलेला एकमेव कथासंग्रह ●

● बँकेमुळे लेखकाच्या आयुष्यात आलेल्या विविध स्वभावाच्या, वर्तनाच्या माणसांशी जुळवून घेत, चांगले संबंध प्रस्थापित करतांना आलेल्या अनुभवांचे कथन करणारा हा कथासंग्रह ●

# 'नात्यांचे सर्व्हिसिंग' आता हिंदीत




## विश्वास जयदेव ठाकूर लिखित...

नात्यांचे सर्व्हिसिंग मराठी बरोबरच हिंदीतही उपलब्ध झालेले आहे. नात्यांचे सर्व्हिसिंगच्या आतापर्यंत १७ आवृत्या प्रकाशित झालेल्या असून १८ व्या आवृत्तीकडे पुस्तकाची वाटचाल सुरू आहे. २५ हजारांहून अधिक प्रतींचा खप आजपर्यंत झालेला आहे. १०० हून अधिक ज्येष्ठ साहित्यिक व वाचकांनी पुस्तकावर अभ्यासपूर्ण भाष्य केले आहे.